
# प्रापंचिकांच्या प्रश्नांना श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची मार्मिक व समर्पक उत्तरे

# अमृतवाणी

– साईली




अखिल ब्रह्मांडाचा उत्पत्ति, स्थिति व लयकर्ता ब्रह्मांडनायक सगुण रूपात वेळोवेळी देह धारण करून या पृथ्वीतलावर अवतरतो, तेव्हा त्या सगुण रूपालाच आपण 'संत' किंवा 'सद्‌गुरु' असे म्हणतो. या ब्रह्मांडनायकाने उत्पन्न केलेल्या या अखिल ब्रह्मांडातील सामान्य आणि अल्पजिवी मानवाच्या आयुष्याचा दुस्तर मार्ग सुलभ, सोपा आणि सुखकर व्हावा आणि त्याच्च ब्रह्मांडनायकाने प्रदान केलेली त्याची अल्पबुद्धी ही पारमार्थिक कारणासाठी, थोडक्यात भगवंताप्रत पोहोचण्यासाठी सत्कारणी लागावी, जेणेकरून जीवनाचे अंतिम साफल्य कशात आहे, हे त्याला उमगावे आणि त्याने आपल्या आयुष्याचे कल्याण करून घ्यावे यासाठी या संत अथवा सद्‌गुरुंची सदैव धडपड चाललेली असते. हा जगत्कारण ईश्वरच आध्यात्मिक जगतातील त्याचा एकमेव 'मार्गदर्शक' असतो; किंबहुना, तोच 'आध्यात्मिक पूर्णत्वाचे स्वरूप' असतो. तेव्हा या संत-सद्‌गुरुंची मदत घेऊन परमार्थाच्या अवघड वाटेवरून, त्या संतांच्या मदतीने जीवनातील, प्रपंचातील खांच-खळगे दूर करीत, मार्ग काढीत रहाण्यातच मानवाचे अंतिम हित आहे.

वेळोवेळी या परमात्म्याने घेतलेले 'संतावतार' हे लौकिकदृष्ट्या वेगवेगळ्या जाती, धर्म, पंथाचे असले तरीही हे केवळ त्यांचे बाह्यस्वरूप असते. शेवटी अंतरंगी तो फक्त निर्गुण निराकार परमेश्वरच असतो. त्याला रंग, रूप, आकार काही नसतोच. देह धारण केल्यामुळे मात्र आपल्याला असे आढळून येते की हे अवतार कधी कधी तुमच्या-आमच्या भावभूमीवर राहून

जगातील सगळ्या वस्तूंबरोबर नि प्राणिमात्रांबरोबर तुमच्या-आमच्याप्रमाणेच आचरण करीत आहेत आणि त्याचवेळी एका अज्ञात, अपरिचित अशा स्वानंदातही विहार करीत आहेत. त्यांच्या जीवनात ज्ञान, भक्ती आणि कर्म यांचा परमोच्च विकास झालेला असतो. सर्व सिद्धी त्यांच्यापुढे हात जोडून उभ्या असतात. मनुष्य जन्मास येणे, संतांची भेट होणे व त्यांना ओळखून त्यांचा सहवास घडणे ह्या तिन्ही गोष्टी फार दुर्घट आहेत. 'संतसहवास' हा सर्व साधनांचा राजा आहे. म्हणूनच संतसमागमासारखा लाभ नाही, असे म्हटले जाते. सर्व संतांनी आपल्या वाङ्मयातून, ग्रंथांतून, अलौकिक अशा दिव्य वाणीतून "संतांची संगत धरणारी सर्व माणसे ईश्वरापर्यंत पोहोचतात", हाच संदेश वारंवार आपल्यासारख्या सामान्यजनांपर्यंत पोहोचण्यासाठी धडपड केली आहे. श्रीमत्परमहंस परिव्राजिकाचार्य श्री वासुदेवानंद सरस्वती संतसहवासाचे महत्त्व सांगताना म्हणतात :

**"सदा संतांपाशीं जावें।**
**त्यांच्या जवळी बैसावें॥१॥**
**उपदेश ते न देती।**
**तरी ऐकाव्या त्या गोष्टी॥२॥**
**तेचि उपदेश होती।**
**त्यांहीं कष्ट नष्ट होती॥३॥**
**वासुदेव म्हणे संत।**
**संगें करिती पसंत॥४॥"**

संतांच्या संगतीत सामान्य माणसे ईश्वराप्रत पोचतात; इतकेच नव्हे, तर पापी, दुराचारी, व्यसनी, त्याज्य व अयोग्य माणसेही केवळ त्यांच्या नामस्मरणाने तरून जातात. ते उपदेश देतीलच असे नाही, पण केवळ त्यांच्या सहवासाने, त्यांच्या अलौकिक मुखातून निघालेल्या वाणीमुळेही आपले परमकल्याण होते. श्री वासुदेवानंद सरस्वती यांच्या दिव्य मुखातून उद्धृत झालेल्या ह्या पंक्तींमध्ये किती खोल आणि गहन अर्थ भरलेला आहे पहा! आपल्यासारख्या सामान्यांना संतांची महती सांगताना, ते अप्रत्यक्षपणे आपल्याला हितोपदेशच करीत आहेत, असे लक्षात येते. संत किंवा सद्गुरु आपल्या भक्ताला प्रत्येक वेळी उपदेश देतीलच असे नाही. त्यांनी तो दिला नाही किंवा देत नसले तरी त्यांच्या गोष्टी मन:पूर्वक ऐकाव्या; कारण **"तेचि उपदेश होती।"** त्यामुळे कष्ट नष्ट होऊन मन:शक्ती प्राप्त होते. संतांचे वागणे समसमान कोठेही नसते, पण त्यांचा प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कृती म्हणजे सामान्यजनांना सुख-दु:खाच्या भवसागरातून तारून नेणारे सुकाणूच असते. त्यांची अधिकारयुक्त दिव्य वाणी आणि त्यांची अलौकिक कृती हाच सामान्यजनांकरिता उपदेश असतो; आणि तो त्या सद्गुरुंच्या बोलण्यातून आणि कृतीतून हळूहळू उलगडत जातो. मात्र मानवाची अल्पबुद्धी तो उपदेश तात्काळ ग्रहण करण्याइतकी परिपक्व नसल्यामुळे आपण त्यांच्या वाणीतले आणि कृतीतले मर्म कित्येकदा चट्कन समजून घेऊ शकत नाही; पण त्यांची प्रत्येक कृती आणि प्रत्येक शब्द हा कधीही व्यर्थ जात नसतो आणि फोलही ठरत नसतो. इतकेच नव्हे, तर त्यांच्या मुखातून निघालेल्या प्रत्येक अर्थपूर्ण शब्दातून सखोल अर्थाच्या गोणीच बाहेर पडत असतात. आधी 'उच्चार' आणि मग 'उच्चारामागे आचार' ही त्यांची वृत्ती असते. संतवचन कधीही नि:सार होत नसते. किंबहुना, त्यांची ही अलौकिक भव्य-दिव्य कृती आणि उक्ती हा एक प्रचंड चमत्कारच असतो. त्यांच्याकडून घडत असणाऱ्या अनेक चमत्कारांचे ते एक 'दृष्य' स्वरूप असते. त्यांची अमृताहूनही गोड असणारी वाणी ही नदीच्या उगमस्थानापासून निघालेल्या पात्राप्रमाणे, त्यांच्या दिव्य मुखातून ओतप्रोत ओसंडून दुथडी भरून अखंड वहाणारी दुसरी जीवनगंगाच असते. त्याच ब्रह्मांडनायक निर्मित नदीच्या पात्राप्रमाणेच ती अत्यंत वेगवान, ओजस्वी, तेजस्वी, प्रवाही, निखळ, स्वच्छ, ममतामय, आनंददायी, जीवनाची अनुभूती देणारी अशी जीवनदायीनी असते. नदीच्या पात्राप्रमाणेच याही जीवनगंगेचे अखंड सेवन करून प्रत्येक प्राणिमात्राने तृप्त व्हावे, यासाठी त्यांची सतत तळमळ असते. त्यासाठी त्यांना कधी प्रवचने, ग्रंथ, अभंग, श्लोक इत्यादी साधनांच्यामार्फत सामान्यजनांपर्यंत ज्ञान पोचवावे लागते; कारण ते एक त्या सामान्य जीवांना संतसमागमाचा लाभ होण्याकरिता त्यांनी निवडलेले 'माध्यम' असते. त्यांचे ज्ञान 'स्वतंत्र' असते आणि ते प्रत्यक्ष भगवंताकडून आलेले असते.

याच संतश्रेष्ठ कोटीतील श्री समर्थ सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांनी या पृथ्वीतलावर गेल्या शतकाच्या उत्तरार्धात अवतार घेऊन हेच वरील कार्य या जडजीवांच्या उद्धाराकरिता अखंड पार पाडले. संत रामदासांच्या परंपरेतील या दिव्य महापुरूषाचे चरित्रही असेच इतर संतांप्रमाणे अलौकिक, भव्य-दिव्य आणि चमत्कृतीपूर्ण आहे. सर्व संतांप्रमाणे त्यांनाही नानाप्रकारच्या सिद्धी अनुकूल होत्या; पण संतांचे श्रेष्ठत्व हे अशाप्रकारच्या चमत्कारांवर वा सिद्धींच्या सामर्थ्यावर अवलंबून नसते. इतकेच नव्हे, तर हे सिद्धींचे चमत्कार परमार्थास कित्येक वेळा बाधकच ठरतात. त्यामुळे सर्व संतांप्रमाणेच श्री गोंदवलेकर महाराजांनीही नामस्मरणाचे किंवा रामनामाचे महत्त्व सतत भक्तांना पटवून देऊन 'तीच परमार्थाची वाट ईश्वराप्रत कशी जाते' हे मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला आहे. परमार्थ साधनेत नामस्मरण, सत्संग व गुरुकृपेला अत्यंत महत्त्व आहे. गुरुवाचून ज्ञान मिळत नाही. यासाठी संतांच्या वाक्सरस्वतीची ओळख करून घेणे, हे अत्यावश्यक ठरते. कधी कधी ती श्री सद्गुरु साईमहाराजांच्या वाणीप्रमाणे **"आकारे सूत्रमय अति लहान। अर्थ गांभीर्ये अति गहन। व्यापकत्वे बहु विस्तीर्ण। संकीर्ण तरी तितुकेच॥"** अशी असते, तर कधी ती सोपी आणि सहजपणे उलगडत जाणारीही वाटते. कधी ती गूढ, गहन, संदिग्ध अशी असते, तर कधी मौनातच उत्तर सापडवून देणारी अशी असते. ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराजांची अमृतमय वाणी ही अशीच प्रवाही, प्रभावी, तेजस्वी, अतिशय सोपी, मृदू आणि आशयपूर्ण असे. अत्यंत अकृत्रिम आणि व्यवहारातील साधी, सोपी उदाहरणे देऊन आणि आशयपूर्ण व अत्यंत समर्पक अशी उत्तरे देऊन ते भक्तांच्या विविध पारमार्थिक अनाकलनीय अशा प्रश्नांची उत्तरे देत असत. परमार्थासारखा वरवर गहन आणि रूक्ष वाटणारा विषय हा नामस्मरणाने किती सुलभ होतो, हे त्यांनी भक्तांच्या मनावर बिंबविण्याचा सतत प्रयत्न केला. त्यांनी

आपल्या अभंगांतून, प्रवचनांतून अखंड नामस्मरणाची महती गाईली. ''नाम जपा रात्रंदिन। न लगे शास्त्राचे शोधन॥'' किंवा ''नाम श्वासोच्छ्वासी वसे। तेथ ब्रह्म उभे असें॥'' अशातऱ्हेच्या अनेक सुंदर वचनांतून त्यांनी सतत नामस्मरणाचे महत्त्व पटविले आहे. ''खरे नामस्मरण कोणते ?'' हे सांगताना महाराज म्हणतात,

**''आपल्या जीवनात परमेश्वरावाचून नडते असे जोपर्यंत आपल्याला वाटत नाही, तोपर्यंत आपले नामस्मरण खरे नव्हे. परमेश्वरच आपल्या जीवनाचा आधार आहे; त्याशिवाय आपण जगूच शकत नाही, अशी वृत्ती बाणल्यावर होणारे नामस्मरण तेच खरे नामस्मरण.''** 'नामसमाधी' विषयी बोलताना ते म्हणतात,

**''नाम घेत असतानाच स्वत:चा विसर पडणे म्हणजे 'नामसमाधी' होय! ही सर्वोत्कृष्ट समाधी होय!''**

महाराजांनी आपल्या प्रवचनांतून, संभाषणांतून, आपल्या वाङ्मयातून वेळोवेळी आपोआप, बोलण्याच्या ओघात भक्तांच्या शंकांचे निरसन केले. त्याचबरोबर भक्तांनी वेळोवेळी विचारलेल्या प्रश्नांनाही त्यांच्या दिव्य मुखातून तात्काळ, समर्पक आणि तर्कशुद्ध अशी उत्तरे येत असत.

**''परमार्थाचे मर्म काय असेल तर आसक्ती सोडून प्रपंच करणे. ज्याने आपल्याला प्रपंच दिला तो त्याचाच आहे असे समजून वागणे.''**

**''आपल्या मुलाला जसे आपण प्रेमाने घेतो, तो परमार्थ आणि दुसऱ्याच्या मुलाला घेतो, तो प्रपंच.''**

**''स्तोत्र म्हणजे भगवंताची पत्राने भेट घेण्यासारखे आहे. तर नाम घेणे, हे भगवंताला प्रत्यक्ष भेटण्यासारखे आहे.''**

**''आपल्याला हव्या त्या गोष्टी देण्यामध्ये भगवंताची कृपा नसून, असेल त्या परिस्थितीत आपले समाधान टिकणे, हीच त्याची खरी कृपा होय!''**

**''सत्य वस्तूला ओळखणे, हा परमार्थ, तर असत्य वस्तूला सत्य मानून चालणे, हा प्रपंच होय!''**

**''परमार्थात अहंकार मिसळला, तर प्रपंचच झाला आणि प्रपंचातील अहंकार दूर झाला, तर तो परमार्थच होय!''**

**''मी 'कर्ता', ही प्रपंचातील पहिली पायरी. तर 'राम' कर्ता आहे, ही परमार्थातील पहिली पायरी होय!''**

अशातऱ्हेच्या उत्तमोत्तम बोधपर वाक्यांनी जागोजागी नटलेली, महाराजांच्या वाणीतून अखंड ओसंडून वाहणारी ही अजोड, सुंदर, पारमार्थिक मौक्तिकावली!

महाराजांच्या या शब्दरूपी मोत्यांची ओंजळ 'अमृतवाणी' या पुस्तकाद्वारे महाराजांचे एक परमभक्त डॉ. मनोहर प्रभाकर वर्टीकर यांनी अतिशय मेहनत घेऊन महाराजांच्या भक्तांसाठी, पर्यायाने सर्वसामान्यांसाठी अर्पण केली आहे. अशा मौक्तिकावलीचा संग्रह असलेला हा ग्रंथ म्हणजे बोधामृताचा अपूर्व असा खजिनाच आहे. ते एक अप्रतिम असे ज्ञानदालनच आहे.

''अशी उत्तरे आपल्या मुखातून कशी येतात ?'' असा प्रश्न महाराजांस एका भक्ताने केला असता महाराज म्हणाले,

**''तुमच्या मनात काय आहे, हे तुम्हाला कळत नाही, इतके मला कळते. मी बोलतो कसा, माझे ज्ञान कोठून येते, हे देहबुद्धीत रहाणाऱ्यांना कळणे कठीण आहे. एखादा प्रश्न मला विचारावा, असे ज्यावेळी तुमच्या मनात येते, त्याचवेळी तो प्रश्न मला समजलेला असतो. प्रत्यक्षात तुम्ही मला तो प्रश्न विचारता त्यावेळी, अर्थातच रामरायांच्या कृपेने माझ्याकडे त्या प्रश्नाचे उत्तर तयार असते.''**

तर, हे असे संतश्रेष्ठांच्या मालिकेतील संतश्रेष्ठ ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज! त्यांच्या विलक्षण दिव्य मुखातून निघालेल्या विविध, म्हणजे प्रपंच, परमार्थ, नामस्मरण, सद्गुरु, गुरु-शिष्य, अनुग्रह, मानसपूजा, सुख-दु:ख-समाधान इत्यादी अनेक विषयांवरील प्रश्नोत्तरांचे हे विखुरलेले ज्ञानभांडार डॉ. वर्टीकरांनी महाराजांवरील अनेक पुस्तकांतून एकत्र करून भक्तांच्या लयलुटीसाठी आयते खुले करून ठेवले आहे. खरोखरच, हा खजिना प्रत्येकाने लुटावा असाच आहे.

श्री गोंदवलेकर महाराजांवरील एका पुस्तकाचे लेखक श्री. प्र. न. जोशी म्हणतात त्याप्रमाणे ''महाराजांची शिकवण ही प्रापंचिकास अतिशय बोधपर अशी आहे. साधी व सोपी तर आहेच; पण त्यात कर्मकांडाची जटिलता किंवा वेदांताची शुष्क चर्चादेखील नाही. कृत्रिम विधीनिषेध नाहीत. भगवंताच्या प्रेमावर आधारलेली ही शिकवण केवळ नामस्मरणावर, सत्संगावर उभी आहे.''

डॉ. मनोहर वर्टीकरांनी मनोगतात ही प्रश्नोत्तरे गोळा करण्याची प्रेरणा आपल्याला कशी झाली, हे फार सुंदररीतीने सांगितले आहे. महाराजांच्या मुखातून निघालेली ही 'अमृतवाणी' या अमृतकुंभात कोणीतरी एकत्र करून साठवायलाच हवी होती. महाराजांच्या कृपेने हे कार्य डॉ. वर्टीकरांच्या हातून पार पडले आहे. या अमृतकुंभातील प्रत्येक थेंब न् थेंब केवळ महत्त्वाचा आहे, असे नाही, तर तो आशयपूर्ण, सखोल, अत्यंत प्रभावी आणि 'सर्वशक्तिमान' असा आहे. परमार्थाच्या राजमार्गावरील सर्व शंकाकुशंकांचे समाधान करण्याची अगाध शक्ती त्यातील प्रत्येक थेंबात आहे. त्यातील प्रत्येक थेंब हा प्रत्यक्ष अमृताचा असून त्यात जीवनाची खरीखुरी अनुभूती भरून राहिली आहे. त्यातील प्रत्येक अमृतबिंदूचा आस्वाद आपल्यासारख्यांना घेता यावा यासाठी डॉ. वर्टीकरांनी केलेली धडपड त्यांच्या महाराजांविषयीच्या अजोड भक्तीची ग्वाही देते. या अलौकिक अशा अमृतवाणीचा, ह्या वाक्सुमनांचा गंध दाही दिशांना पसरविण्याचे जे सत्कार्य त्यांनी हाती घेतले, ते खरोखरच वाखाणण्याजोगे आहे. मात्र, या 'अमृतवाणी'चा आस्वाद घेताना महाराजांच्या दिव्य मुखातून बाहेर पडलेल्या अनेक उत्तमोत्तम बोधकथांचाही त्यात समावेश झाला असता, तर त्यात अधिक मोलाची भर पडली असती, असे वाटल्याशिवाय राहिले नाही.

## अमृतवाणीच्या निमित्ताने....

**श्रीमहाराजांचे सांगणे खरोखर अतिशय सोपे, आशयगर्भ व अमृतबिंदूंचा वर्षाव व्हावा असे असते. त्यात कृत्रिमतेचा लवलेशही नसल्याने त्याचे चटकन आकलन होते. गहन किंवा**

रूक्ष अशा वेदान्तांची प्रमेये ते इतक्या सोप्या व रंजक पद्धतीने सांगत की, त्यांच्या प्रत्येक शब्दात जीवनाची खरीखुरी अनुभूती भरून राहिल्यासारखी वाटते. उदाहरणार्थ, 'जग काय म्हणेल म्हणून वागणे याचे नाव प्रपंच, तर भगवंत काय म्हणेल म्हणून वागणे याचे नाव परमार्थ,', 'फळाची अपेक्षा ठेवून कृती करणे याचे नाव कर्म, तर फळाची अपेक्षा सोडून कर्म करणे याचे नाव कर्तव्य.' 'जो कधी चुकतो आणि कधी बरोबर येतो तो साधक व ज्याची दृष्टी रामरूप झाली तो गुरू.' 'ज्याचे हवेपण जास्त तो गरीब व ज्याचे हवेपण कमी तो श्रीमंत.' 'परमेश्वराची आवड म्हणजे भक्ती, तर विषयांची आवड म्हणजे प्रपंच.' अशा अनेक प्रभावी व चिरंतनाचा स्पर्श झालेल्या वाक्सुमनांची मुक्त उधळण त्यांच्या निरूपणात अनेक ठिकाणी विखुरलेली दिसून येते, आणि म्हणूनच त्यांचे शब्द ऐकताना आपण जीवनरसाने रसरसलेले काहीतरी अनुभवीत आहोत असे वाटते. भगवंत हाच त्यांच्या वाणीचा आधार असल्यामुळे त्यांचे बोलणे चित्तवेधक, तर्कशुद्ध व मनावर विशेष परिणामकारक होते. त्यांची सहज बोललेली वाक्ये परमार्थाची सूत्रेच बनत, हे वर दिलेल्या थोड्या उदाहरणांवरून दिसून येईल. हसतखेळत, प्रापंचिक गप्पागोष्टी करीत परमार्थाची तत्त्वे समजावून देण्याची श्रीमहाराजांची हातोटी विलक्षण होती. प्रपंचातील अगदी छोट्या छोट्या प्रसंगांतून त्यांच्या उदात्त विचारांची अमृतवाणी मनाला एकदम उच्च स्थानी नेऊन स्थिर करते.

अशाप्रकारे, प्रश्नोत्तरीचा साज चढवलेली त्यांची अतिशय प्रभावी व तितकीच मनोहारी वाटणारी अमृतवाणी सर्वप्रकारच्या वाचकांची पारमार्थिक तृष्णा शांत करून त्यांना योग्य ते मार्गदर्शन करू शकेल असा विश्वास वाटतो.

या सर्व वर दिलेल्या प्रश्नांची उत्तरे या ग्रंथात आपल्याला खचित सापडतील. हा प्रश्नोत्तरांचा संग्रह म्हणजे एक पारमार्थिक खजिनाच म्हणायला पाहिजे. डॉ. मनोहर प्रभाकर वर्टीकर यांनी अतिशय मेहनत घेऊन हा खजिना आपल्यासारख्या सर्वसामान्य जनांसाठी खुला करून दिला आहे. या खजिन्यात अनेक मौल्यवान चिजा आहेत व त्या सर्व श्रीमहाराजांनी स्वत: पारखून व अनुभव घेऊन आपल्यासाठी जतन करून ठेवल्या आहेत.

डॉ. वर्टीकर यांनी श्रीमहाराजांच्या या अमृतवाणीचा कुंभ भरून आपल्यापुढे ठेवला आहे. त्यामधील जीवनगंगा अखंड वाहणारी आहे. तिचे नियमितपणे सेवन करून प्रत्येकाने नामामृताचा पूर्ण आस्वाद घ्यावा व आपले जीवन सार्थकी लावावे.

—गोविंद सीताराम गोखले

---

या 'अमृतवाणी'चे सततं मनन व सखोल परिशीलन केल्यास लेखकाने शेवटी मनोगतात म्हटल्याप्रमाणे ''खरं तर ही प्रश्नोत्तरे श्री महाराजांच्या चरणी अर्पण करावयाचा विचार होता. पण मग वाटले, श्रींचेच पुस्तक श्रींच्याच चरणी अर्पण करण्यापेक्षा ज्याला मी 'माझा' समजतो, तो माझा देहच जर मला त्यांच्या चरणी अर्पण करता आला, तर ते जास्त योग्य नाही कां?''

हा अनुभव आपल्यापैकी प्रत्येकजण घेऊ शकेल; पण त्यासाठी त्यागाचा आणि संयमाचा सतत अभ्यास करून सद्गुरुच्या आधाराने आणि नामस्मरणाच्या सुलभ साधनाद्वारे साधकत्वाच्या दिशेने वाटचाल करणे आवश्यक ठरते. असल्या शुद्ध मनात जे भावतरंग उठतात, ते त्या व्यक्तीला इप्सित स्थळी पोहचवून देतात. यासाठी श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज म्हणतात त्याप्रमाणे ''आजच्या या दिवसापासून आपण आपल्या मुलाला जितक्या आपलेपणाने हांक मारतो, तितक्याच आपलेपणाने देवाला हांक मारायचे ठरवा आणि आत्तापर्यंत जितक्या आवडीने भगवंताचे नांव घेतले तितक्याच किंवा त्याच्याहीपेक्षा जास्त आवडीने आणि निष्ठेने नांव घ्या! मला खात्री आहे, राम तुमचे कल्याण करील!''

एकूण काय, तर सर्व संतश्रेष्ठ शेवटी एकच 'चालते-बोलते प्रत्यक्ष परब्रह्मच!' प्रत्येकाची वाणी, कृती, रहाणी-सहाणी निरनिराळी; पण शिकवण तीच आणि मानवकल्याणाचे अंतिम ध्येयदेखील तेच!

पुस्तकाचे नाव: अमृतवाणी
लेखक: डॉ. मनोहर प्र. वर्टीकर
प्रकाशक: श्री. मनोहर य. जोशी
प्रसाद प्रकाशन,
१८९२ सदाशिव पेठ,
पुणे – ४११०३०.
पृष्ठे: १६८
मूल्य: रु. ५०

## चिलीम :


निर्मळ चावडी भूमिका शुद्ध।
घोटीव आणि स्फटिकबद्ध।
मिळणीं मिळती आबालवृद्ध।
प्रेमें निबद्ध श्रीपदीं॥१९४॥
होतां गादीवर विराजमान।
बसतां तक्यास टेंकून।
चवरी चामर आंदोलन।
वीजिती व्यजन दो बाजूं॥१९५॥
माधवराव तमाखू चुरिती।
चिलीम तात्काळ तयार करिती।
देती तात्याबांचे हातीं।
तात्याबा फुंकिती आरंभीं॥१९६॥
तमाखूची ज्वाला निघतां।
तात्याबा देत बाबांचे हाता।
बाबांचा प्रथम झुरका संपतां।
मग ती भगतांस अर्पीत॥१९७॥
मग ती चिलमी संपे तोंवर।
इकडूनि तिकडे वर्तुलाकार।
भगत शामा तात्याबरोबर।
वरचेवर भ्रमतसे॥१९८॥
धन्य ती निर्जीव वस्तु परी।
काय तिचिया भाग्याची थोरी।
आम्हां सजीवां न तिची सरी।
सेवा ती खरी तियेची॥१९९॥
तपश्चर्या ही महाकठिण।
लाथां तुडविलें बाळकपण।
पुढें सोसूनि शीतोष्णपन।
अग्नींत तावून निघाली॥२००॥
भाग्यें बाबांचें करस्पर्शन।
पुनश्च धुनीमाजीं भर्जन
मागुती गैरिका उटी चर्चन।
मुखचुंबन तैं लाधे॥२०१॥

—अध्याय ३७, श्री साईसच्चरित

# ।। सामवेद ।।




– साईली




**'वे**द' हा एक अथांग असा ज्ञानसागरच होय! अध्ययनाच्या सुलभतेकरिता महर्षी व्यासांनी त्याचे चार भाग पाडले. 'सामवेद' हा या वेदांच्या मालिकेतील तिसरा वेद आहे. चारही वेदांमध्ये भगवंतांनी या वेदाला विशेष गौरविले आहे.

भगवद्गीतेच्या दहाव्या अध्यायामध्ये 'वेदांमध्ये भगवंताचे स्वरूप कोठे पहावयास मिळेल', याचे विवेचन करताना भगवान श्रीकृष्ण म्हणतात:

**वेदानां सामंवदोऽस्मि।** म्हणजे सर्व वेदांमध्ये 'सामवेद' मी आहे.

तसेच महाभारतासारख्या सुविख्यात ग्रंथामध्येदेखील महर्षी व्यासांनी– **सामवेदश्च वेदानां।** अनुशासन पर्व १४-३१७ मध्ये सामवेदाची अशीच स्तुती केलेली आहे.

त्याच्याहीपूर्वी छांदोग्य नावाच्या उपनिषदानेदेखील सामवेदाचा असाच गौरव केलेला आहे.

**वाचः ऋग्रसः ऋचः सामं रसः साम्न उद्गीथो रसः।**

वाणीचा रस 'ऋग्वेद', ऋग्वेदाचा रस 'साम', आणि

सामाचा रस 'उद्‌गीथ' आहे.

'साम' या शब्दामध्ये 'सा' आणि 'अम' असे दोन शब्द आहेत. या प्रत्येक अक्षराला प्रातिनिधिक अर्थ आहे. यावरून 'साम' म्हणजे काय, याचा बोध होऊ शकेल.

| | सा | अम |
|---|---|---|
| १. | पृथिवी | अग्नि |
| २. | अंतरिक्ष | वायू |
| ३. | द्युलोक | आदित्य |
| ४. | नक्षत्रें | चंद्र |
| ५. | आदित्याची शुक्ल प्रभा | नील काष्र्ण्य |
| ६. | वाणी | प्राण |
| ७. | चक्षू | आत्मा |
| ८. | श्रोत्र | मन |

छांदोग्योपनिषदात याच सामाबद्दल एक सुंदर संवाद आहे. हा संवाद शलावत पुत्र शिलक आणि दाल्भ्य गोत्रोत्पन्न चैकितायन यांच्यामध्ये जीवलपुत्र प्रवहण नामक प्रज्ञावंत दात्याच्या उपस्थितीत झाला. या संवादात 'स्वर्ग' ही सामाची प्रतिष्ठा असल्याचे नमूद केलेले आहे. शिलक विचारीत असलेल्या प्रश्नांना चैकितायन उत्तर देत आहे. ती उत्तरे अशी: सामाचा आश्रय 'स्वर', स्वराचा आश्रय 'प्राण', प्राणाचा आश्रय 'अन्न', अन्नाचा आश्रय 'उदक', उदकाचा आश्रय 'स्वर्ग'. यानंतर शिलक विचारतो,

''स्वर्गलोकाचा आश्रय कोणता?''

त्यावर चैकितायन उत्तर देतो,

''स्वर्गलोकाच्या पलीकडे 'साम' जात नाही. स्वर्गलोकाच्या ठिकाणी प्रतिष्ठीत असलेला 'साम' आम्ही जाणतो आणि त्याचेच सामगायनाने स्तवन करतो. सामगायनाने सर्व कामे पूर्ण होतात.''

हा छांदोग्य उपनिषदाचा एक अभिप्राय आहे. या संवादावरून सामाची प्रतिष्ठा लक्षात येते. प्राचीन काळापासून 'साम' सर्वांनाच प्रिय आहे व या प्रियत्वामुळेच सामगायक निर्माण झाले आणि इतकेच नव्हे, तर त्यांना यज्ञादि कार्यामध्ये विशेष स्थानही प्राप्त झाले. हा 'सामवेद' मुळात गायनाचा वेद आहे. प्रतिष्ठित सामगायकाच्यां तोंडून ऐकताना त्यात ऋचांचे आगळेपण जाणवते आणि वेदांना **'सामवेदोऽस्मि'** असे भगवंत का म्हणतात, याचा उलगडा होतो. सामवेदाच्या ऋचांमध्ये कर्षणशक्ती आहे. प्रत्येक ऋचा स्वरबद्ध, नादबद्ध व लयबद्ध करून वाचताना त्यातील माधुर्यामुळे वाचक त्याकडे अधिकाधिक आकर्षित होतो.

'सामवेद' मुळात लहान आहे अणि त्यात नवीन असेही विशेष काही नाही; कारण या वेदामध्ये एकूण १८७५ ऋचा असून बहुतेक सर्व ऋचा ऋग्वेदातील आहेत. त्यामुळे हा वेद जरी स्वतंत्र असला तरी त्यात फक्त ९२ ऋचा ह्या स्वतंत्र आहेत. पुनरुक्त ऋचांची संख्या २७२ आहे. या वेदाची मांडणी दोन विभागात, म्हणजेच पूर्व आणि उत्तर अर्चिकांत केलेली आहे. पूर्व अर्चिकेत ६५० ऋचा असून उत्तर अर्चिकेत १२२५ ऋचा समाविष्ट आहेत. यापुढेदेखील ह्या अर्चिकांचे विभाग करण्यात आलेले आहेत.

**सामवेदातील देवता:** सामवेदामध्ये एकूण ४५ देवतांच्या प्रार्थना किंवा मंत्र आहेत. त्यामध्ये ग्रहदेवता, अधिदेवता, लोकपाल व दिक्‌पाल असे भाग आहेत.

**ग्रहदेवता:** सूर्य, सोम, भौम, बुध, गुरु, शुक्र, शनैश्चर, राहू, केतू, शंभू, उमा, स्कंध, विष्णू, ब्रह्मा, इंद्र, यम, काल आणि चित्रगुप्त – म्हणजे एकूण १८ देवता आहेत.

**अधिदेवता–** अग्नि, वरूण, पृथ्वी, विष्णू, शक्र, इंद्राणि, प्रजापति, सर्प – एकूण ८ देवता आहेत.

**लोकपाल–** गणपती, दुर्गा, वायू, आकाश, अश्विनीकुमार, श्री, मृत्युंजय, वास्तुदेवता – म्हणजे एकूण ८ देवता आहेत.

**दिक्‌पाल–** इंद्र, अग्नि, यम, निर्ऋति, वरूण, वायू, सोम, ईशान, परमेष्ठी, विष्णू आणि विश्वेदेव – एकूण ११ देवता.

**सामवेदाचा शाखाविस्तार:** सामवेदाच्या शाखांचा विस्तार पाहिल्यास काही शतशाखा तरी उपलब्ध असल्या पाहिजेत, असे म्हटले तर वावगे होणार नाही. परंतु प्रत्यक्षात मात्र १३ शाखांची नावेच परिचित आहेत. त्या १३ शाखा पुढीलप्रमाणे:

१. राणायन, २. कौथुम, ३. जैमिनी, ४. शाट्यमुग्र, ५. व्यास, ६. भागुरि, ७. औलुण्डी, ८. गौल्गुलवी, ९. भानुमानौपमन्यव, १०. काराटि, ११. मशक-गार्ग्य, १२. शालिहोत्र, १३. वार्षगव्य

ही शाखांची नावे जरी परिचित असली तरी ह्या सर्वांच्या संहिता मात्र उपलब्ध नाहीत. वरील यादीतील केवळ पहिल्या तीन शाखांच्याच संहिता उपलब्ध आहेत. राणायनी व कौथुमी ह्या संहितांमध्ये तसा कोणताही फरक नाही. फक्त गणनाक्रम निराळा आहे. जैमिनीय शाखेमध्ये मात्र फरक आहेत.

**सामस्वरूप:** सामवेदातील ऋचा या ऋग्वेद किंवा यजुर्वेदातील ऋचांप्रमाणे म्हणण्यात येत नसून निराळ्या पद्धतीने म्हणण्यात येतात. या पद्धतीला 'सामगायन पद्धती' असे म्हणतात. यामध्ये विविध प्रकार असले तरी वेदांमध्ये ज्या पद्धतीने ऋचा म्हणाव्यात असा संकेत आहे त्यामध्ये सप्तसुरांचा समावेश आहे. नारदीय शिक्षेमध्ये या स्वरांचा उत्कृष्ट खुलासा करण्यात आलेला आहे.

अन्य वेदांच्या ऋचांप्रमाणेच या वेदातील ऋचांचे उच्चारदेखील गानपद्धतीच्या सूक्ष्म भेदांचा गुरुमुखातून परिचय करून घेऊनच म्हणाव्या लागतात. त्यामध्ये होणारी किंचितशी चूकही महान अर्थहानी व त्याहीपेक्षा सौष्ठवपूर्ण परिणामांची हानी करू शकते. ही दक्षता घेणे अभ्यासकाला आवश्यक ठरते.

**विविध सामरूपे:** सामगायनामध्ये जे विविध प्रकार आहेत त्यामध्ये खालील प्रकार मोडतात.

**ऋग्वेदातील–** वैरूप, बृहत्, गौरिवीति, रैवत, अर्क, गायत्र, श्लोक आणि भद्र

**यजुर्वेदातील–** रथन्तर, बृहत्, वैरूप, वैराज, वैरवानस, वामदेव्य, यज्ञायज्ञीय, शाक्वर, रैवत, गायत्र्य, गौरिवीत, अभिवर्त, क्रोश, सत्र्यस्पर्धि, प्रजापतेर्हृदय, श्लोक,

अनुश्लोक, भद्र, राजन, अर्क्य, इलान्द. यज्ञाच्या वेळी हे सामगायन केले जात असे.

**सामब्राह्मण :** प्रत्येक वेदाप्रमाणेच या वेदाचेही ब्राह्मण ग्रंथ आहेत.

१. ताण्ड्य ब्राह्मण (प्रौढ ब्राह्मण अगर पंचविश ब्राह्मण), २. षड्विंश, ३. सामविधान, ४. आर्षेय, ५. देवताध्याय, ६. उपनिषद् (संहिता किंवा मंत्र ब्राह्मण), ७. वंश

**सूत्रग्रंथ –** १. मशककल्प, २. क्षुद्रसूक्त, ३. लाट्यायन श्रौतसूत्र, ४. गोभिल गृह्यसूत्र

**राषायणीय शाखेची –** १. द्राह्यायण श्रौतसूत्र, २. खादिरगृह्यसूत्र, ३. पुष्पसूत्र. यापैकी पुष्पसूत्र सामअभ्यासकांना अधिक उपयुक्त ठरते.

**पूर्वार्चिका – आग्नेयकाण्ड, अध्याय १ ला**

ऋग्वेदाप्रमाणे सामवेदाचा प्रारंभही अग्निसूक्तानेच झालेला आहे. ही ऋचा ऋग्वेदाच्या ६ व्या मंडलातील १६ व्या सूक्तात समाविष्ट आहे. हीच ऋचा याच वेदात पुन्हा उत्तरर्चिकेच्या पहिल्या अध्यायात, प्रथम खंडात पहिली म्हणून समाविष्ट आहे.

**प्रथम प्रपाठक प्रथमार्ध :**

**प्रथमा दशति –**

यामध्ये अग्नीची विविध तऱ्हेने स्तुती केलेली आहे. त्याला या यज्ञाचा कर्ता, विश्वाचे ज्ञान असणारा, यज्ञकर्मकुशल, देवदूत असे संबोधिलेले आहे. तसेच तू मित्राप्रमाणे प्रिय आहेस, अतिथीप्रमाणे प्रतिष्ठीत आहेस व श्रेष्ठस्थाननिवासी आहेस, असे म्हणून अग्निदेवास हवि स्वीकारण्यासाठी यज्ञस्थानी विराजमान होण्याची विनंती केलेली आहे आणि अज्ञानरूपी अंधःकाराचा नाश होवो, अमृतत्वाची वृष्टी होवो, आम्हा मर्त्यमानवांचे दोष दूर होवोत, यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

**द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमा दशति –**

यात अग्नीची, तूच विश्वाचा ज्ञाता आहेस, अश्वाप्रमाणे वेगवान, यज्ञाचा सम्राट आहेस, दिव्य तेजाने प्रदीप्त आहेस, अजरामर आहेस, अहिंसक, सत्यरक्षक, अविनाशी व रक्षणकर्ता आहेस, अशातऱ्हेने अग्नीची स्तुती करून सोमरस प्राशन करण्यासाठी, यज्ञाच्या ठिकाणी प्रदीप्त होण्यासाठी पुन: पुन: आवाहन करीत आहेत आणि हा अग्नि आपल्या साधकांना सर्वप्रकारची समृद्धी प्रदान करो, यासाठी, तसेच शत्रूंना आपल्या तेजाने भस्म करण्यासाठी, अनेक सुखांची प्राप्ती करून देण्यासाठी, रोगनिवारणासाठी, भरपूर संपत्ती प्रदान करून पुत्रपौत्रांचे रक्षण करण्यासाठी इत्यादी अनेक कारणांसाठी अग्नीला उद्देशून प्रार्थना केलेल्या आहेत.

**प्रथम प्रपाठक द्वितीयार्ध : षष्ठी–सप्तमी–अष्टमी–नवमी दशति –**

यामध्ये अग्नीची महान, ऐश्वर्यवान, अविनाशी, दीप्तिवान, शत्रुनाशक, विश्वप्रिय, सामर्थ्यवान, ऐश्वर्यवान, गोधनाचा स्वामी, धनोत्पादक, प्रज्ञावंत, विजयी, सर्वज्ञ, ज्वालामय व पूजनीय अशी विविध तऱ्हेने स्तुती केलेली आहे. कश्यप हा अग्नीचा पिता, श्रद्धा ही माता आणि मनु हा स्तोता आहे, असे म्हटलेले आहे. यज्ञ संपन्न करण्यासाठी, यज्ञस्थानी अवतीर्ण होण्यासाठी व हवी भक्षण करण्यासाठी अग्नीला वारंवार प्रार्थना केलेल्या आहेत. तसेच अन्नप्रदान करण्यासाठी, शत्रूचा नाश करण्यासाठी, इच्छित फळ प्राप्त करून देण्यासाठी, साऱ्यांचे जीवन कल्याणमय होण्यासाठी, राक्षसांचे तेज आपल्या प्रचंड बळाने नष्ट करण्यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत व संरक्षणार्थ सोमराजा, वरूण, अग्नि, आदित्य, विष्णू, सूर्य, ब्रह्मा आणि बृहस्पति ह्या देवतांना पाचारण केलेले आहे.

**द्वितीय प्रपाठक प्रथमार्ध : प्रथमा, द्वितीया दशति –**

यामध्ये अग्नीला विविध स्तोत्रे गाऊन संतुष्ट करण्यासाठी प्रार्थना केलेली आहे. अग्नीची स्तुती करून नेहमीप्रमाणे सर्वांचे कल्याण होण्यासाठी अग्नीला प्रार्थना केलेल्या आहेत.

**पूर्वार्चिका – ऐन्द्रकाण्ड, अध्याय २ रा**

या ऐन्द्र काण्डात एकूण ३५२ ऋचा आहेत. ह्या मंत्रांची देवता **'इन्द्र'** आहे.

**तृतीया ते दशमी दशति –**

सुरुवातीला नेहमीप्रमाणे इंद्राची भरपूर स्तुती केलेली आहे. इंद्राला, देवाधिदेवाला अनेक विशेषणे लावलेली आहेत. लोकांचे कल्याण करणारा, सर्व इच्छा पुऱ्या करणारा, दानशूर, सूर्यरूपी, महापराक्रमी, सत्यरूप व पितृतुल्य, महाबाहू, सज्जनांचा पालनकर्ता, गोधनाचा स्वामी, यज्ञपुत्र, ऐश्वर्यसंपन्न इत्यादी प्रकाराने त्याला आळवून कल्याणासाठी विविध प्रार्थना केलेल्या आहेत. सर्व प्राणिमात्रांचे रक्षण व्हावे, शत्रूंचा नाश व्हावा, दीर्घकाल धन प्राप्त व्हावे, इच्छितप्राप्ती व्हावी, आकाश व पृथ्वीचे संरक्षण व्हावे, पुत्रोत्पत्तीसाठी लागणारे वीर्यतेज, सर्व विश्व पहाण्यासाठी लागणारे तेज, विश्वाच्या वृद्धीसाठी लागणारे तेज यांचे वास्तव्य शरीरात असावे व आयुष्य सुखमय, समृद्ध आणि मंगलमय व्हावे यासाठीही प्रार्थना केलेल्या आहेत.

इंद्राने यज्ञस्थानी अवतीर्ण व्हावे व स्तोत्यांनी भक्तीने दिलेल्या हविरन्नाचा स्वीकार करून संतुष्ट व्हावे आणि उत्तमप्रकारे तयार केलेला सोमरस प्राशन करावा म्हणून परोपरीने त्याची स्तुती करून आग्रहपूर्वक प्रार्थना केलेल्या आहेत.

यातील १९२ वी ऋचा ही एक ऋग्वेदातील १० व्या मंडलातील उत्कृष्ट ऋचा असून सर्व तेजांचे वास्तव्य शरीरात असावे म्हणून, म्हणजेच मित्र, वरूण आणि अर्यमन् यांचे तेज प्राप्त व्हावे म्हणून केलेली प्रार्थना आहे.

**तृतीया प्रपाठक : प्रथमा ते दशमी दशति –**

यात इंद्राच्या पराक्रमाचे वर्णन करून त्याने यज्ञस्थानी अवतीर्ण व्हावे व उत्तमप्रकारे केलेला व त्याला अत्यंत प्रिय असलेला असा सोमरस प्राशन करण्यासाठी

विविध तऱ्हेने आळविलेले आहे. प्राणिमात्रांच्या सर्व कामना पूर्ण करण्यासाठी, हितकारी फळ प्रदान करण्यासाठी, अश्वांची प्राप्ती होण्यासाठी, राक्षसांपासून संरक्षण करण्यासाठी, धनवान करण्यासाठी, आमच्या पापांचा नाश करण्यासाठी, कर्म करण्याची प्रेरणा देण्यासाठी विविध प्रार्थना केलेल्या आहेत. इंद्राच्या पराक्रमाचे वारंवार वर्णन करून, त्याने प्रसन्न व्हावे, अशी इच्छा व्यक्त केलेली आहे.

पंचमा दशति व षष्ठी दशति ऋचा ३५१ पर्यंत **तृतीय अध्याय** आहे, तर ३५२ ते ४६६ ऋचा ह्या **चौथ्या अध्यायात** मोडतात.

**चतुर्थ प्रपाठक : प्रथमार्ध प्रथमा ते षष्ठी दशति –**

यात इंद्राची, त्याच्या पराक्रमाची, त्याच्या गुणांची, त्याच्या वेगाची, ऐश्वर्याची अनेकप्रकारे स्तुती करून त्याला व अश्विनीकुमारांना यज्ञस्थानी येऊन सोमरस व हविरन्न स्वीकारण्यासाठी विनंती केलेली आहे आणि नेहमीच्या सर्व इच्छा व्यक्त करून आपल्या भक्तांना निरोगी, पुत्रपौत्र, गोवृषभादि पशू आणि सर्वप्रकारचे अन्न प्रदान करण्यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

**चतुर्थ प्रपाठक : द्वितीयार्ध सप्तमी ते दशमी दशति –**

यात इंद्राला स्तोतांनी, ऋत्वीजांनी आपला सखा मानले आहे. शत्रूंच्या नगराचा विध्वंस करणारा, नित्य तरूण, क्रान्तदर्शी, अत्यंत ओजस्वी, विश्वमान्य रूप धारण करणारा व वज्रधारक, विश्वरूपी धनाचा स्वामी, दाता, स्वर्ग आणि बळाचा स्वामी, धनसंपन्न, वर्धिष्णू, सर्वव्यापक, शीघ्रवेगी, अत्यंत प्रज्ञावंत इत्यादी शब्दांनी स्तुती करून आळविलेले आहे आणि इंद्राला यज्ञस्थानी पाचारण करून सोमरसपानासाठी विनंती केलेली आहे व त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

**पंचम प्रपाठक : प्रथमा दशति ते अष्टमी दशति –**

यामध्ये इंद्राच्या विविध गुणांचे वर्णन केलेले आहे. त्याच्या सामर्थ्य-संपन्नतेची स्तुती केलेली आहे. ''तू तुझ्या सामर्थ्याने वृत्रासुराचा, तसेच दिवोदासाचा शत्रू शंबरासुर याचा वध केलास. तू स्वर्गाचा स्वामी असून वायूप्रमाणे प्रतापवान आहेस. तू सर्वांचा आवडता आहेस. तुझ्या महान सामर्थ्यामुळे शत्रू तुला भितात.'' अशातऱ्हेने इंद्राची स्तुती करून दीर्घायुषी जीवन व सर्व पापांतून सुटका करण्यासाठी, तसेच त्याने यज्ञस्थानी येण्यासाठी प्रार्थना केलेली आहे. (या प्रथमा दशतिमध्ये फक्त आठच ऋचा आहेत.)

याशिवाय इंद्राच्या पराक्रमाच्या, सामर्थ्याच्या, स्तुती आणि प्रार्थनांशिवाय अग्नीची, उषेची, सोमाची आणि इतर देव-देवतांची भरपूर स्तुती करून त्यांना यज्ञासाठी पाचारण केलेले आहे. त्यांनी आपल्या भक्तांना अन्नसमृद्ध करावे, त्यांच्या कामना परिपूर्ण कराव्यात, शत्रूपासून संरक्षण करावे, पुत्रपौत्रादिकांनी समृद्ध करावे, युद्धात विजयी करावे अशातऱ्हेच्या इच्छा व्यक्त करणाऱ्या प्रार्थना करून यज्ञकर्त्या यजमानांनी प्रदान केलेल्या हविरन्नाचा स्वीकार करण्याची विनंती केलेली आहे.

**पंचमा दशति**मध्ये सोमाची, त्याच्या स्वादाची व गुणांची स्तुती करून मनुष्याच्या कल्याणासाठी व राष्ट्राच्या रक्षणासाठी, तसेच महान धन व बळ प्राप्त व्हावे यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

**पूर्वार्चिका – पवनकाण्ड, अध्याय ५ वा**

**नवमी दशति व दशमी दशति**

यात सोमाची विविधप्रकारे स्तुती केलेली आहे. ''तू अत्यंत स्वादयुक्त झाला आहेस, तुझी स्तुती करणाऱ्या लोकांसाठी तू या कलशामध्ये येऊन स्थिर हो व मरूत्वान इंद्रासाठी सर्व धनाचा धारक हो!'' अशाप्रकारे त्याला आळवून सर्व भक्तांच्या कामना पूर्ण करण्यासाठी, अन्न व यज्ञप्राप्तीसाठी, तसेच सर्व शत्रूंचा नाश करण्यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत. इंद्राला तुझा हा दिव्य गुणसंपन्न रस प्राप्त होण्यासाठी ''तू या पात्रांत एकत्रित हो'' अशातऱ्हेची प्रार्थनाही केलेली आहे.

**सहावा प्रपाठक : प्रथमार्ध प्रथमा दशति ते नवमी दशति –**

यात विविध तऱ्हेने सोमाची स्तुती केलेली आहे. त्याला बलवान, भाग्यवंत, बुद्धिवर्धक, मधुर, हर्षवर्धक, सर्वद्रष्टा, दिव्यगुणवंत, शुद्ध, अमृतमय, चैतन्यमय, ज्ञानवान, प्रवाहशील, सुसंस्कृत, सन्मार्गदर्शक, सामर्थ्यप्रेरक, सर्वप्रेरक, मित्रतुल्य, महान संपत्तीधारक आणि स्फूर्तिदायक अशातऱ्हेची कित्येक विशेषणे लावलेली आहेत. तसेच त्याला अभिष्टवर्धक, हिरवट रंगाचा, अत्यंत मधुर, मित्राप्रमाणे आदरणीय, दर्शनीय, अत्यंत तेजस्वी, प्रवाहशील संबोधून, तो इंद्र, ऋत्विज यांना कसा प्रिय आहे याचे वर्णन केलेले आहे. सोम हा सहस्त्रावधी धनांचा स्वामी असून, धन प्रदान करणारा आणि प्राचीन काळापासून यज्ञामध्ये उपस्थित राहणारा, सर्वांना प्रिय असणारा असा आहे. अशाप्रकारे त्याला गौरविलेले आहे आणि त्याने यज्ञस्थानी कलशात येऊन स्थिर व्हावे यासाठी विनंती केलेली आहे. त्याशिवाय नेहमीप्रमाणे संततीसाठी, संरक्षणासाठी, कल्याणासाठी, बलप्राप्तीसाठी विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

**आरण्यकाण्ड, प्रथमा दशति ते पंचमा दशति**

यात इंद्राची विविधप्रकारे स्तुती करून त्याला वज्रधारक, अनादि, अनंत, धनवान इत्यादी विशेषणांनी संबोधिलेले आहे. कल्याणाकरिता विविध प्रार्थनाही केलेल्या आहेत. **प्रथमा दशतितील ५९४ वी ऋचा** अत्यंत महत्त्वाची आहे. ती पुढीलप्रमाणे: मी अन्नदेवता किंवा अन्य देवतांच्या अगर सत्यस्वरूप ब्रह्मदेवाच्याही पूर्वी जन्म घेतलेला आहे. तो मी सर्व प्राण्यांना अतिथीप्रमाणे अन्न देऊन सर्व प्राणिमात्रांचे रक्षण करतो. जो लोभी मनुष्य दुसऱ्यांना काहीही न देता स्वत:च उपभोग घेतो त्यांना देवता स्वत: काहीही देत नाहीत, तर त्याचे वैभव स्वत: नाहीसे करतात. गीतेच्या ३ ऱ्या अध्यायातील १२ वा श्लोक म्हणजे उपरोक्त ऋचेचा गाभा आहे. सांसारिक आणि पारमार्थिक जीवांचा हा एक महत्त्वाचा आचार

आहे.

इंद्राप्रमाणेच सोमाची, अग्नीची, वैश्वानर अग्नीचीही स्तुती करून प्रार्थना केलेल्या आहेत. अग्नीच्या सामर्थ्याचे, त्याच्या तेजाचे वर्णन करून त्याला गौरविलेले आहे.

**चतुर्थ दशतितील ६१६ वी ऋचा –** यात सहा ऋतुंचा उल्लेख आलेला आहे. ही ऋचा केवळ सामवेदीय आहे. ह्या सर्व ऋतूंमध्ये रमणीयता असावी, हा या प्रार्थनेचा हेतू आहे. (वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिर हे सहा ऋतू होत.)

यापुढील ५ ऋचा म्हणजे **सामवेदीय पुरुषसूक्त** होय! ह्या सर्व ऋचा ह्या चारही वेदांमध्ये थोड्याफार फरकाने समाविष्ट झालेल्या आहेत. इतर वेदांमध्ये स्वरांची चिन्हे आहेत, तर ह्या ऋचांतील शब्दांमध्ये उच्चारांचे आकडे दिलेले आहेत. ह्या सामवेदीय ऋचा, अन्य वेदांच्या ऋचांतील स्वरांच्या चिन्हांप्रमाणेच, उच्चारांचे आकडे अभ्यासल्याशिवाय नीट म्हणता येणार नाहीत. इतकेच नव्हे, तर त्या ऋचांच्या उच्चारांचे प्रात्यक्षिक पाहिल्याशिवाय नीट पाठ म्हणताही येणार नाहीत. साम-ऋचांमध्ये अत्यंत सूक्ष्म स्वरांचा समावेश असल्याने ह्या ऋचांच्या उच्चारांचा व नादघाताचा बारकाईने अभ्यास करावा लागतो.

ह्या पाच ऋचांमध्ये अनंत मस्तके, अनंत नेत्र व अनंत पाय असलेल्या, सर्व चराचर सृष्टीला व्यापून टाकलेल्या अशा विश्वरूपी विराट पुरुषाचे वर्णन केलेले आहे. उत्पन्न झालेले आणि उत्पन्न होणारे विश्वाचे सर्व अंश या पुरुषाचेच आहेत. या पुरुषाचे सामर्थ्य म्हणजे या संसाराचा आधार आहे. या सामर्थ्यापासूनच देवत्व व ईश्वरत्व उत्पन्न होऊन वृद्धिंगत झाले. प्राणिमात्रांचे सर्व कर्म-फल-भोग याची कारणावस्था या विश्वरूपात आहे, असे सांगितलेले आहे.

या दशतिमध्ये द्यौ, पृथ्वी व गायींचीही स्तुती करून प्रार्थना केलेल्या आहेत. तसेच सूर्यदेवतेलाही त्याच्या पराक्रमाचे, तेजाचे, वेगाचे वर्णन करून गौरविलेले आहे आणि ''या विश्वातील चराचराचा तू अंतरात्मा आहे'' अशारीतीने पुन्हा त्याचा गौरव केलेला आहे.

### महानाम्न्यार्चिका

या विभागात केवळ दहाच ऋचा असून त्या केवळ सामवेदातीलच आहेत.

यात इंद्राची भरपूर स्तुती केलेली आहे. त्याला त्रैलोक्याचा स्वामी, सामर्थ्यवान, दानशील, सर्वपूज्य, त्रैलोक्यपालक, सर्व ऐश्वर्यातील सर्वश्रेष्ठ, महान दानशील, सूर्याप्रमाणे कांतिमान, सर्वज्ञ, सर्व ज्ञानांचा स्वामी, बळाचा स्वामी, सर्वसामर्थ्यांचा स्वामी, मानवांच्या मनातील द्वेषभावनांचा नाशक, ज्ञानमुक्त कर्माची प्रेरणा देणारा, सत्यस्वरूप, महान, पोषणकर्ता, स्तुतीयोग्य आणि परमश्रेष्ठ अशा विविध विशेषणांनी त्याचा गौरव केलेला आहे.

### उत्तरार्चिका, अध्याय १

उत्तरार्चिकामधील खंडात वरचेवर मागील ऋचांची द्विरुक्ती आढळून येते. म्हणून त्याची पुनरुक्ती केलेली नाही.

**प्रथम खंड –**

यात ऋत्विज्, साधकांना, देवाच्या प्रीतिसाठी यज्ञ करण्याची आणि शुद्ध होऊन पात्रामध्ये प्रतिष्ठित होणाऱ्या सोमाची स्तुती करण्याची विनंती करीत आहेत. तसेच दिव्यगुणसंपन्न देवतांची आणि दीप्तिमान परमेश्वराची स्तुती करून आमच्यासाठी पशुधन, संतती, अश्वयुक्त समृद्ध सेना, वीरता, शरीरधारक पदार्थ, औषधी यांना प्रफुल्लित करण्याची विनंती किंवा प्रार्थना करीत आहेत. तसेच कल्याणकारी सोमाची स्तुती व त्याचे वर्णन, तो नादमय आहे, मधुर आहे, वेगवान आहे, लोकरीच्या वस्त्रातून गाळलेला असून स्वादयुक्त आहे, अशाप्रकारे करून ''आम्ही तो 'मधुरस्त्रावक' नावाच्या सोमपात्रात सांठवीत आहोत'', असे म्हणत आहेत.

द्वितीय खंडात अग्नीला गौरवून, त्याला विविधप्रकारे संबोधून त्याची स्तुती केलेली आहे. तिने होतृरूपाने आमच्या यज्ञीयस्थानी येऊन दर्भासनावर स्थानापन्न व्हावे म्हणून प्रार्थना केलेली आहे. तसेच मित्र-वरूणांना, इंद्राची स्तुती करून त्यांना यज्ञस्थानी आमंत्रित करण्यासाठी केलेल्या प्रार्थनाही आहेत. इंद्र व अग्नि यांनी आपल्यावर प्रसन्न व्हावे, अशी इच्छाही प्रगट केलेली आहे. तृतीय खंडातील ऋचांपासून द्विरुक्तीचा अनुभव वरचेवर येतो. तृतीय, चतुर्थ, पंचम व षष्ठ खंडांत सामर्थ्यवान इंद्रास, सोमास, तसेच अग्नीस उद्देशून केलेली स्तुती व समस्तांच्या कल्याणासाठी विविध प्रार्थना आढळतात. ऋत्विजांनी इंद्रास, सोमास व अग्नीस वारंवार प्रार्थना करून यज्ञस्थानी पाचारण केलेले आहे.

### अध्याय ३

या अध्यायात असलेल्या सहा खंडांमध्ये सोमाची नेहमीप्रमाणेच भरपूर स्तुती करून शत्रूंच्या नाशासाठी, जगाच्या कल्याणासाठी, सामर्थ्यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत. तसेच अग्नि, इंद्र आणि वायू यांचीही स्तवने गाऊन विविध प्रार्थना केलेल्या आहेत. इंद्रदेवतेला बलाधिपती, पराक्रमी, ऐश्वर्यवान, अपराजित, सर्वजित, असीम कीर्तिसंपन्न अशी विशेषणे लावून गौरविलेले आहे.

### अध्याय ४, अध्याय ५

४थ्या अध्यायातील सहा खंडांमध्ये व ५व्या अध्यायातील सात खंडांमध्ये इंद्र व सोम यांची त्यांच्या गुणांची व पराक्रमांची विविध तऱ्हेने स्तुती केलेली आहे. अग्नीलाही केलेल्या प्रार्थना व स्तुती यात आहे. अपराजित इंद्राने दीप्तिवान, तृप्तिदायक, दुग्धमिश्रित असा दिव्यगुणसंपन्न सोमरस प्राशन करण्यास यज्ञस्थानी हजर व्हावे यासाठी, तसेच कल्याणासाठी प्रार्थना केलेल्या आहेत. तसेच सोमाची, शरीर सामर्थ्यसंपन्न, सर्वद्रष्ट्या, सुंदररूप प्राप्त झालेल्या, बुद्धिवान, संस्कारित, तेजोवान, दीप्तिमान व गतिमान अशी विशेषणे लावून, स्तुती करून सहस्त्रावधी कल्याणकारी गोष्टी आमच्यासाठी सिद्ध कर, तसेच अन्न, अश्व, गाय व धन असे सामर्थ्यसंपन्न चारही पदार्थ आम्हाला प्रदान कर, बल-यशसंपन्न कर, सुख व धन प्रदान कर, अशातऱ्हेच्या विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

### अध्याय ६, अध्याय ७

या अध्यायात सोमाला वेगवेगळ्या तऱ्हेने

गौरवून त्याची भरपूर स्तुती केलेली आहे. तसेच त्याला कलशात वेगाने येऊन स्थिर होण्यासाठी प्रार्थना केलेली आहे. याशिवाय ऋत्विजांच्या, जगाच्या कल्याणासाठी व हितासाठी पुन्हा पुन्हा प्रार्थना केलेल्या आहेत. सर्व प्रार्थनांची कमी-अधिक प्रमाणात पुनरुक्तीच आढळते.

अध्याय ७ मधल्या द्वितीय खंडातील १०४७ हे ऋग्वेदाच्या ९ व्या मंडलातील ४ थे सूक्त असून त्याला **पवमान सोमाचे पालुपद सूक्त** असे संबोधण्यात येते. यज्ञामध्ये करण्यात येणारी ही सोमाची प्रार्थना आहे. या सूक्तात एकूण १० ऋचा असून प्रत्येक ऋचेच्या अखेर ''तू आमचे कल्याण कर!'' असे पद आहे. याशिवाय सोमाबरोबरच अग्नीला, मित्र-वरूण यांना, इंद्रालाही उद्देशून केलेल्या प्रार्थना आहेत.

**अध्याय ८, अध्याय ९, अध्याय १०**

सर्व ऋचांत सोमाच्या गुणांचे वर्णन, त्याच्या कृतीची स्तुती करून पुन्हा पुन्हा त्याच त्याच प्रार्थना केलेल्या आहेत, असे आढळते. सर्व प्रार्थनांची पुनरुक्ती वरचेवर आढळते.

**दहाव्या अध्यायातील सप्तम खंडातील** ऋचांत पवमान पंचसूक्ताचा पाठ करणाऱ्यांना कोणत्या प्रकारचे फळ प्राप्त होते, त्याचा निर्वाळा दिलेला आहे. दोन्ही ऋचा ऋग्वेदातील ९ व्या मंडलातील ६७ व्या सूक्तात आढळतात. या पवमानातील ऋचा सर्वांचे कल्याण करणाऱ्या, उत्तम फळ प्रदान करणाऱ्या असल्याने मंत्रद्रष्ट्या ऋषींनी त्या संपादित करून अविनाशी सामर्थ्याची प्रस्थापना केलेली आहे. नवम खंडातील दशम व एकादश खंडातील केलेले सोमाचे वर्णन अत्यंत सुंदर आहे. अंध:काराचा नाश करणाऱ्या, हरितवर्ण, तेजाने व्यापून टाकणाऱ्या, अत्यंत सामर्थ्यवान, स्तोत्रांसाठी प्रेरणा देणाऱ्या, ग्रावन नावाच्या पाषाणांच्या सहाय्याने ठेचून काढण्यात आलेल्या, दशापवित्र पात्रातून पाझरणाऱ्या, संस्कारित, अवध्य, उदक मिसळलेल्या, अन्न आणि गोदुग्ध यांच्याशी मिश्रित केलेल्या, तसेच मनुष्यमात्रांना त्यांचे आनंदमय जीवन प्रदान करणाऱ्या, देवांना तृप्त करणाऱ्या, कर्तृत्व करणाऱ्या, सर्वांना हवासा वाटणाऱ्या, गाळून शुद्ध करण्यात येणाऱ्या, सम्राटाप्रमाणे योग्य अशा सामर्थ्यवान्, धनदात्या आणि संस्कारित सोमा.... अशारीतीने अनेक सुंदर विशेषणांनी सोमाची स्तुती करून आम्हाला कामात, तसेच इंद्रालाही आपल्या कामात स्फूर्ति प्रदान करण्यासाठी, आम्हाला सुख प्रदान करण्यासाठी, ऐश्वर्ययुक्त अन्न व पोषक जल उत्पन्न करण्यासाठी, तसेच त्याने यज्ञात लवकरच अवतीर्ण व्हावे यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

**अध्याय ११**

यातील पहिल्या चार ऋचा ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलातील १३ व्या सूक्तात आलेल्या आहेत. या चार ऋचांत (१) समिधांच्या सहाय्याने प्रज्वलित होणारा अग्नि **'सुसमिद्ध'** (२) दोन अरणींच्या गर्भात रहाणारा अग्नि **'तनूनपात'** (३) अरणीतून निर्माण होणारा नवजात अग्नि **'नराशंस'** आणि (४) अग्नीची यज्ञामध्ये स्तुति-स्तोत्रे गात असताना प्रदीप्त होणारा अग्नि **'इलाग्नि'** किंवा **'इडाग्नि'** ह्या अग्नींच्या प्रार्थना आहेत व त्यापुढे ३ ऋचांत आदित्याचे वर्णन व प्रार्थना आहेत. ह्या ऋचा ऋग्वेदाच्या ७ व्या मंडलातील ६६ व्या सूक्तामध्ये समाविष्ट आहेत.

याशिवाय यातील द्वितीय व तृतीय खंडांत इंद्राच्या पराक्रमाचे वर्णन करून सोमाकडे ऐश्वर्य प्रदान करण्यासाठी व आपल्या रसाचा वर्षाव करून आम्हाला अमरत्व द्यावे, तसेच उत्तम ज्ञान व सामर्थ्य यासाठी उत्पन्न झालेला सोम इंद्रासहित अन्य देवांनी प्राशन करावा, यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

**अध्याय १२**

यात इंद्राची, अग्नीची आणि सोमाची विविधप्रकारे स्तुती व प्रार्थना केलेल्या आहेत.

**अध्याय १३**

यामध्येही इंद्राची, अग्नीची, सोमाची स्तुती करून त्यांना गौरविलेले आहे. ऋत्विजांना, त्यांची स्तुतीस्तवने गाऊन त्यांनी सोमकांडातून, देवांना अर्पण केलेला सोम गोदुग्ध मिसळून तयार करा, असे विनविलेले आहे. यातील **चतुर्थ खंडातील** एक ऋचा ही उत्तर भारतातील सरस्वती नदीचे वैभव व तिच्या ७ नद्यांचा गौरव करणारी आहे. ही ऋचा ऋग्वेदात ६-६१-१० येथे आलेली आहे. यापुढील १४६२ वी ऋचा, म्हणजे प्रसिद्ध **'गायत्री' मंत्र** होय! १४७० वी ऋचा हा **केतूचा 'वैदिक' मंत्र** होय! हा मंत्र इतर तिन्ही वेदांत आढळतो.

तसेच यात इंद्राला व अध्वर्यूंना उद्देशून विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

**अध्याय १४ व अध्याय १५** यांमध्ये अग्नीला व इंद्राला त्यांची भरपूर स्तुती करून त्यांनी यज्ञस्थानी अवतीर्ण व्हावे व जगाचे व आमचे कल्याण करावे, यासाठी विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

**अध्याय १७ व अध्याय १८**

अध्याय १७ मध्ये अग्नीची व इंद्राची, तसेच त्यांच्या पराक्रमाची उत्तमप्रकारे स्तुती करून विविध इच्छा पूर्ण करण्यासाठी अनेक प्रार्थना केलेल्या आहेत.

१८ व्या अध्यायात सोम, इंद्र, विष्णू यांचे गुणवर्णन आहे. **द्वितीय खंडातील सहा ऋचा म्हणजे प्रसिद्ध 'विष्णूसूक्त'** होय! हे सूक्त ऋग्वेद १-२२ मध्ये आहे. भगवान विष्णूंना अभिषेकानंतर शंखोदकाने स्नान घालताना हे सूक्त म्हणण्यात येते.

तसेच जगाला कल्याणप्रद व्हाव्या अशा प्रार्थना केलेल्या आहेत.

**अध्याय १९**

या अध्यायात इंद्राची, अग्नीची स्तुती तर आहेच, त्याशिवाय अंध:काराला दूर लोटणारी 'उषादेवी' हीचेही आगमन होत असल्याचे सांगितलेले आहे. तिच्याही गौरवासाठी काही स्तवने गाईलेली आहेत आणि इच्छा पूर्ण होण्यासाठी मागणे मागितलेले आहे. त्यासाठी केलेल्या प्रार्थना आहेत. उषेचे हे वर्णन व स्तुती फारच अप्रतिम आहे.

**अध्याय २०**

यामध्ये अग्नि, इंद्र यांची स्तवने गाईलेली आहेत. विविधप्रकारे स्तुती करून त्यांना आळविलेले आहे. इंद्राने आमच्यापासून दूर जाऊ नये, दिव्यगुणसंपन्न सोमरस पिण्यासाठी तत्पर व्हावे, असे सांगून ''शत्रूंचा संहार करणाऱ्या, नेहमी विजय प्राप्त करणाऱ्या, बलसंपन्न इंद्रा, तुझी स्तुती करण्याचे व तुझ्या नामाचे चिंतन करण्याचे व्रत मी कधीही सोडणार नाही. हे इंद्रा, तूच आमचा हितकर्ता व पोषणकर्ता आहेस.'' अशारीतीने इंद्राला मनापासून आळविलेले आहे. अग्नीचीही उत्तमप्रकारे स्तुती करून आपल्या सर्व इच्छा पूर्ण करण्यासाठी विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

**अध्याय २१**

या शेवटच्या अध्यायात देवसेनेच्या अग्रभागी सदैव स्थिरपणे उभा रहाणारा इंद्र, वरूण, आदित्य आणि मरूत् आम्हास सर्वश्रेष्ठ बळ प्रदान करोत, बृहस्पति, दक्षिणा, यज्ञ, सोम व मरूत्युक्त जयशाली, देवसेनेचा इंद्र हा स्वामी आहे. त्याने आमच्या सैन्याचे सदैव रक्षण करावे, सर्व शत्रू इंद्राकडून ठार व्हावेत, त्यांचा पूर्णपणे संहार व्हावा किंवा त्यांना जाळून भस्म करावे. जो आमचा नातेवाईक असूनही आमचा द्वेष करतो आणि जो गुप्तरूपाने आम्हाला ठार मारण्याची इच्छा करतो, त्याचा सर्व देवता नाश करोत. इंद्राच्या कृपेने प्राप्त असलेल्या भक्तांनो, स्वतःच्या सामर्थ्याने पराजयापासून दूर राहून तुम्ही युद्धामध्ये सतत विजयी व्हावे, अशातऱ्हेच्या विविध प्रार्थना स्वसंरक्षणार्थ केलेल्या आहेत.

यापुढील दोन शेवटच्या ऋचा ह्या **'शांतिपाठ'** म्हणून प्रसिद्ध आहेत.

''हे विश्वदेवांनो, आम्ही केलेल्या स्तुतीमुळे तुम्ही आमच्यावर प्रसन्न व्हावे आणि आमच्या कानी सर्व सुखमय गोष्टी येतील, आमच्या नेत्रांना सर्व वस्तूंमधील चांगलेच दिसेल व आम्हाला दिलेले शरीर अत्यंत सुदृढ आणि निरोगी असून, निरोगी शरीराने व निरोगी अवयवांनी आयुष्य उपभोगण्याचा आशीर्वाद प्रदान करावा. तसेच मानवी आयुष्याची मर्यादा केवळ शतवर्षांची आहे. या मर्यादेच्या अखेरच्या अवस्थेत माणसाला म्हातारपण प्राप्त होते. आम्ही तुला प्रार्थना करतो की आमचे आयुष्य मध्येच खंडित न होवो.'' अशातऱ्हेच्या इच्छा सामवेदातील अंतिम दोन ऋचांत व्यक्त केलेल्या आहेत.

इंद्र, सोम व अग्नि ह्या देवतांच्या स्तुती व प्रार्थनांशिवाय इतरही काही देवतांना उद्देशून केलेल्या प्रार्थनाही सामवेदात आहेत. शिवाय सामवेदातील बव्हंशी ऋचा ह्या ऋग्वेदातीलच असल्यामुळे त्यांची द्विरुक्ती टाळलेली आहे.

**आपले वेद आपली पुराणे**


ठेव योजनेतील

ग्रंथ : सामवेद

लेखक : स. कृ. देवधर

प्रकाशक : **श्री. मनोहर य. जोशी**
प्रसाद प्रकाशन,
१८९२ सदाशिव पेठ,
पुणे – ४११०३०.

## श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



'श्री साईलीला'च्या वाचकांना स्मरतच असेल की **संमेलन विशेषांकात** 'जे न बोलायचे....' या सदरात 'बाबांची शिकवण' या शीर्षकांतर्गत प्रसिद्ध झालेल्या लेखात म्हटले होते की.... आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. पण शिवाजी पार्कवर ज्या पादुकांचे आगमन होणार आहे त्या पादुकांच्या प्रतिमा नसून साक्षात् श्री साईबाबांनी वापरलेली ती प्रत्यक्ष पवित्र पादत्राणं आहेत....

आता श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सतूचरित | मराठी | ३३.१५ | १२.०० |
| २. | श्री साई सतूचरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सतूचरित | हिंदी | १८.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सतूचरित | गुजराथी | २४.०० | ११.०० |
| ५. | श्री साई सतूचरित | कन्नड | १७.७५ | १०.०० |
| ६. | श्री साई सतूचरित | तेलुगु | २०.७० | १०.०० |
| ७. | श्री साई सतूचरित | तामीळ | २६.५० | १०.०० |
| ८. | श्री साई सतूचरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सतूचरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ८.२५ | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ११.५० | १०.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ७.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ७.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ७.०० |
| १७. | स्तवनमंजरी | इंग्रजी | २.०० | ७.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.०० | ७.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ७.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | ०.९५ | ७.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ३.६० | ७.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | १.२५ | ७.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | २.५० | ७.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६.८० | ७.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | १.६० | ७.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ७.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | १.६० | ७.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ७.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | २.३० | ७.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ७.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ७.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४.५० | ७.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ७.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५.२५ | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ९-५० | १०-०० |

# श्री साईभक्तांना नम्र आवाहन

शिरडी संस्थान हे देशभर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील श्री साईबाबांच्या लाखो भक्तांचे तीर्थयात्रेचे व श्रद्धेचे स्थान झालेले आहे. प्रत्येक दिवसागणिक भाविकांची वाढती लोकप्रियता या संस्थानला लाभली असून त्याची भारतातील एक प्रमुख विश्वस्तनिधि म्हणून गणना होत आहे.

गेली काही वर्षे साईभक्तांच्या सतत वाढणाऱ्या गर्दीमुळे श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या विविध सोयींवर अतोनात ताण पडत आहे. या लाखो भाविकांना शिरडीचा निवास सुखाचा व सोईचा व्हावा म्हणून श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे विद्यमान विश्वस्त मंडळ शिरडीच्या सर्वांगीण विकासासाठी अनेकविध योजना राबवित आहे.

**'साईबाबा–भक्त–निवास'** या इमारतीचे बांधकाम हाती घेऊन ५०० भाविक कुटुंबांची राहण्याची सोय करण्याच्या दृष्टीने संस्थानने पहिले पाऊल उचलले. या इमारतीचे बांधकाम आता पूर्ण झाले असून ही इमारत भाविकांना निवासाकरिता श्री साईबाबांच्या पुण्यतिथीपासून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या खोल्यांमधून भाविकांना सर्व सोयी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. माफक दरात येथे भाविकांची राहण्याची सोय करण्यात आली आहे. याशिवाय सध्या उपलब्ध असलेल्या सभागृहापेक्षा मोठे, असे २ सभागृह बांधण्यात आले आहेत. या सोयीमुळे सुमारे ३,५०० अतिरिक्त भाविकांची उत्तम व्यवस्था येथे होणार आहे. तसेच रात्रंदिवस सेवा चालू असेल असे एक खाद्य-पेयगृहही त्याच जागेत आहे.

भाविकांची प्रत्यही वाढणारी संख्या लक्षात घेऊन **मंदिर–परिसराच्या विस्तारीकरणाची योजनाही** हाती घेण्यात आली आहे. या विस्तारीकरणामुळे श्री साईबाबांचे दर्शन भाविकांना सुलभतेने व सहजतेने घेता येणार आहे. त्यांचा सध्याचा त्रास त्यामुळे कमी होईल.

विद्यमान विश्वस्त मंडळाने **स्वच्छ व मुबलक पाणी, उत्तम वैद्यकीय सेवा, हृदयरोग अतिदक्षता विभाग, सोनोग्राफी केंद्र, क्ष–किरण कक्ष, इंग्रजी माध्यमाची शाळा, कन्याशाळा, संस्थानच्या उत्पन्नात वाढ, कामात सूसूत्रीपणा** आदी योजनांना दृश्यरूप दिले असून **मंदिर–परिसराचे विस्तारीकरण, रुग्णालयाचा विस्तार,** आदी योजनाही लवकरच दृश्यरूप धारण करणार आहेत.

श्री साईबाबांच्या कृपेने व आशीर्वादाच्या बळावर संस्थानने वरील नमूद केलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. आपली मदत आम्हाला हरतऱ्हेने हवी आहे. भारताच्या उज्ज्वल धार्मिक परंपरेचे संवर्धन या प्रकल्पाकरिता 'देणगी' दिल्याने होणार आहे.

शिरडी संस्थानच्या वतीने मा. अध्यक्षा आपणाला या कार्याकरिता उदारहस्ते मदत करण्याचे विनम्र आवाहन करीत आहेत.

कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी
मु. पो.: शिरडी, तालुका: कोपरगांव,
जिल्हा: अहमदनगर.

सूचना: चेक **'श्री साईबाबा संस्थान, शिरडी'** या नावाने पाठवावेत.


# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ

प्रा. डॉ. लेखा पाठक (अध्यक्षा)
श्री. हेमराज शहा
श्री. मनोहर ना. गोगटे
श्री. ब्रिजमोहन भामशा
श्री. पृथ्वीराज रा. आदिक
श्री. शिवराम रा. शिंदे
श्री. राजीव प्र. कुलकर्णी
डॉ. एकनाथ भा. गोंदकर
श्री. प्रभाकर तु. बोरावके
श्री. भिमाशंकर व्यं. खांबेकर
श्री. बाबुराव अ. नरोडे (पाटील)
श्री. दादासाहेब श. रोहमारे (पाटील)
श्री. प्रभाकर भि. बोरावके
श्री. उत्तमराव रं. शेळके
श्री. सोपानराव मा. धोर्डे
श्री. कारभारी भि. देवकर
श्री. अनंतकुमार कि. पाटील
श्री. मोतीराम सि. पवार
श्री. प्रशांत व्यं. हिरे
प्रा. नारायण स. फरान्दे (आमदार)
श्री. अण्णासाहेब म्हस्के (आमदार)
श्री. दिलीप अ. शिंदे
श्री. गोपीनाथ ब. कोते (पाटील)
श्री. श्रीपतराव मा. जाधव
श्री. मोहन मो. जयकर
श्री. विष्णुपद श्री. बुटे
(कार्यकारी अधिकारी)

# सर्व साईभक्तांना आवाहन !

प्रिय साईभक्तांनो !

सप्रेम नमस्कार.

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपणा सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी अनेकांनी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा.

या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावरही कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे. चेक कृपया 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या नावावर असावा.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकित,
**– अरूण ताम्हणकर**
कार्यकारी संपादक
**'श्री साईलीला'**

------------------✂------------------ इथे कापा ------------------✂------------------

कार्यकारी संपादक
**'श्री साईलीला',**
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई – ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण रु. २५० (एकूण दोनशेपन्नास रुपये मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,


नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

______________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)



या भिंतीला टेकून बाबा उभे राहत असत.

## चूल :

मशिदीचिया अंगणांत। चूल एक मोठी रचीत। वरी विस्तीर्ण पातेलें ठेवीत। पाणी तें नियमित घालुनी ॥२५॥ कधीं 'मिठ्ठे चावल' करीत। कधीं पुलावा मांसमिश्रित। कधीं कणिकेचीं मुटकुळीं वळीत। वरान्नीं शिजवीत डाळीच्या ॥२६॥ हंडीप्रीत्यर्थ मुख्य परिश्रम। बाबाच आपण करीत अविश्रम। मसाला वांटावयाचेंही कर्म। करीत कीं परम मनोभावें ॥३६॥ करावया सौम्य वा प्रखर। चुल्लीमागील वैश्वानर। इंधनें हीं स्वयें खालवर। करीत वरचेवर बाबा ॥३७॥



बाबांची बसण्याची शिळा

असो हंडी शिजली पूर्ण। ऐसी नीट पारख करून। चुल्लीखालीं उतरून। मशिदीं नेऊन ठेवीत ॥४२॥ मग तें शेष सकळ अन्न। बाबा वाढीत निजहस्तेंकरून। गरीब दुबळे तृप्त करून। सुख समाधान पावत ॥४४॥

—अध्याय ३८, श्री साईसच्चरित






[illegible] एक कुमार बाबांस नेहमीं चिलमीं पुरवीत असे. मशिदीच्या एक-दोन कोनाड्यांत शेंकडों चिलमी पडलेल्या असत.

**– कै. श्री. रा. वा. मोडक**

**जाते :** तैसें संग्रहीं गव्हांचें पोतें। दळाया मशिदींत असे जातें।
पाखडावया सूपही होतें। न्यून नव्हतें संसारास ॥२३॥ **– अध्याय ७**

तो चावडीचा समारंभ।
मशिदीचिया परिसरी। उजळत दीपांच्या बहु हारी।
वास श्यामकर्ण अंगणद्वारीं। पूर्ण शृंगारीं विराजत ॥१२७॥
तात्याबा वाम हस्त धरी। म्हाळसापति दक्षिण करीं।
बापूसाहेब छत्र शिरीं। चालली स्वारी चावडीसी ॥
आघाडी घोडा तो ताम्रवर्ण। नाम जयाचें श्यामकर्ण।
घुंगुरें झणत्कारिती चरण। सर्वाभरणमंडित जो ॥१४६॥ **– अध्याय ३७**

संस्थानचा सरजाम वाढत चालला. एका भक्तानें एक सुंदर घोडा नजर केला. कांहीं भक्तांनीं पालखी पाठविली. कांहींनीं रथ पाठविला. कांहींनीं चांदीचे गंगाळ, घागर, समया व इतर लहान-मोठीं चांदीचीं भांडीं पाठविलीं. गजनीच्या, भरजरीच्या, मखमलीच्या गाद्या, तक्के, उशा आल्या. मौल्यवान् शेले व इतर वस्त्रें येऊं लागलीं. सभामंडप, तसबिरी, आरशे व हंड्या झुंबरांनीं सुशोभित झाला. जरी संस्थानचा सरंजाम इतका वाढला तरी मौजेची गोष्ट ही कीं महाराजांनीं आपला साधेपणा सोडला नाहीं व या वस्तूंचा प्रत्यक्ष स्वीकार केला नाहीं. नाहीं म्हणावयाला कांहीं विविक्षित कारणामुळें पोत्यावर बसण्याचे सोडून महाराजांनीं बसण्याकरितां गादीचा मात्र स्वीकार केला. या सरंजामाचा उपयोग मिरवणुकीच्या शोभेकडे मात्र होऊं लागला.

श्री साईबाबांच्या वेळच्या देवादिकांच्या मूर्ती




**हंडा :** कधीं मोठी कधीं लहान। हंडीचे या प्रकार दोन। तियें माजीं शिजवूनि अन्न। करवीत भोजन अन्नार्थियां ॥३१॥ पन्नास जणां पुरेसे अन्न। पुरवी जी ती हंडी लहान। जियेंत शंभर पात्रें जेवून। उरे जैं अन्न ती मोठी ॥३२॥



नोव्हेंबर – डिसेंबर १९९३ रु. ८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक





**बाबांच्या श्यामसुंदर घोड्याची समाधी :** हा घोडा बाबांचा फार लाडका होता. बाबांना एका भक्ताने हा घोडा दिला होता. श्री साईंच्या दरबारी आरतीच्या वेळी तो नमस्कार करीत असे. असा नमस्कार करायला त्याला नानासाहेब खाजगीवाले यांनी शिकविले होते. बाबांनी देहत्याग केल्यानंतर त्यांच्या समाधीला हा घोडा नमस्कार करीत असे. या घोड्याचा १९४५ मध्ये देहांत झाला.

**खंडोबा मंदिर :**

चांदभाई पाटलाच्या मेहुण्याच्या लग्नाच्या वरातीबरोबर श्री साईबाबा शिरडीला आले तेव्हा ज्या मंदिरासमोर मंदिराचे पुजारी म्हाळसापती यांनी बाबांना ''आओ साई'' असे म्हणून त्यांचे स्वागत केले, तेच हे खंडोबाचे मंदिर होय! मंदिरात खंडोबाची मूर्ती असून मूर्तीच्या उजव्या हाताला बाणाईची व डाव्या हाताला म्हाळसाईची मूर्ती आहे.





# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत नियतकालिक

वर्ष ७२ अंक ८-९

नोव्हेंबर – डिसेंबर ९३

संपादक
प्रा. डॉ. लेखा पाठक

मुखपृष्ठ
हेमंत चोणकर

अक्षर जुळवणी व ऑफसेट छपाई
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

कार्यालय
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई–४०० ०१४.
दूरध्वनी : ४१२२५६१

वार्षिक वर्गणी – रु. ५०/-,
आजीव सभासद वर्गणी – रु. १,०००/-,
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी – रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक – रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक प्रा. डॉ. लेखा पाठक, अध्यक्षा, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.


या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांविषयीची कोणतीही कायदेशीर कारवाई मुंबईच्या न्यायकक्षेतच होऊ शकते, याची कृपया नोंद घ्यावी.

संपादकीय

## पाहावा साई, बोलावा साई करावा साई, जीवे-भावे

**मा**गील अंकात आपण आपल्या इष्टदेवतेचा, आपल्या आराध्य देवतेचा, आपल्या श्रद्धास्थानाचा महिमा, त्यांचं माहात्म्य, अलौकिकत्व पाहिलं. आता आपण त्यांची भक्ती करायची, म्हणजे नेमके काय करायचे, ते पाहू....

भक्तीचं श्रेष्ठत्व प्रतिपादन करताना साक्षात् भगवान श्रीकृष्ण श्रीमद्भगवद्गीतेत अर्जुनाला सांगतात....

"जे भक्त माझी, माझ्या स्वरूपाची श्रद्धेने, भक्तिभावनेने, तल्लीनतेने, तन्मयतेने उपासना करतात, ते मला अत्यंत प्रिय आहेत."

"जे भक्त समबुद्धीने सर्व प्राणीमात्रांमध्ये, सर्वांतर्यामी, सर्वांभूती माझे दर्शन करतात, ते मला प्राप्त होतात."

"जे भक्त धन-दौलत, सुख-संपत्ती, अधिकार यांनी उन्मत्त होत नाहीत व दु:खात आपले एकाग्र चित्त विचलीत होऊ देत नाहीत, जे प्राणीमात्रांवर दया करतात, ज्यांच्या ठायी क्षमाशील वृत्ती आहे, राग-द्वेष-तिटकारा-क्रोध यांचा ज्यांना बिल्कुल स्पर्श झालेला नाही, जे कर्तव्यपरायण, कर्तव्यतत्पर असून कर्मफलाची आस धरत नाहीत, जे स्थिरबुद्धीने, श्रद्धा-भावनेने विचार व आचरण करतात, जे कशातही आसक्त होत नाहीत, जे सदासर्वदा संतुष्ट असतात, आत्मानंदी लीन असतात, ते भक्त मला अतिप्रिय आहेत."

कलीयुगात भक्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे; कारण ते पापक्षालनाचे, जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होण्याचे, मोक्षप्राप्तीचे साधन आहे.

थोडक्यात काय, तर तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे....

"पाहावा विठ्ठल, बोलावा विठ्ठल, करावा विठ्ठल, जीवे-भावे", अशी वृत्ती आपण अंगी भिनवली पाहिजे.

विठ्ठल म्हणजे सत्त्वगुणांचे मूर्तिमंत रूप. ते सत्वगुण आपल्या पाहाण्यात, बोलण्यात, वागण्यात पूर्णरूपेन भरून राहिले पाहिजेत. दिंड्या-पताका हाती घेऊन, देहभान हरपून, ब्रह्मानंदी मग्न होऊन वारकरी मंडळींची स्वयंस्फूर्त पाऊले जशी पंढरीच्या दिशेने चालू लागतात, तशी आपली भक्ती असायला हवी, मोक्षाच्या दिशेने वाटचाल करणारी.

या ठिकाणी महंमद पैगंबरांनी सांगितलेली 'खऱ्या मुसलमानाची लक्षणं' पाहाणं समयोचित ठरेल; कारण व्यापक दृष्टीने पाहता ती खऱ्या भक्तालाही लागू पडतात :

"जो दुसऱ्यांचा दुस्वास करीत नाही, जो माझ्या वचनांवर प्रेम करतो, जो दान देणं आपलं परम कर्तव्य समजतो, जो इतरांमधील दोष शोधण्याऐवजी त्यांच्यातील उत्कृष्ट गुणांचा स्वीकार करतो, जो भुकेलेल्याला अन्न देतो, आजाऱ्यांची सेवा-शुश्रूषा करतो, जो गरजवंताला मदत करतो, जो चुकलेल्याला, भरकटलेल्याला योग्य दिशा दाखवतो, दुसऱ्यांचं दु:ख पाहून जो दु:खी होतो, शरणार्थीला जो शरण देतो, मनुष्यजातीच्या कल्याणार्थ जो इतरांना प्रेरित करतो, तोच खरा मुसलमान, अर्थात्, तोच खरा भक्त होय!"

यासंदर्भात आपल्या शिष्यांना संबोधून प्रभु येशु ख्रिस्त काय उपदेश करतात तेही

पाहणे येथे स्तुत्य ठरेल. प्रभु येशु ख्रिस्त म्हणतात:

"ज्यांचं मन शुद्ध व पवित्र आहे, ते धन्य आहेत; कारण ते ईश्वराला पाहू शकतात."

"जसे प्रेम मी तुमच्यावर केले, तसे प्रेम तुम्ही इतरांवर करा!"

"दान करताना असे दान करा की उजव्या हाताने केलेले दान डाव्या हाताला कळता कामा नये."

"क्षमेची याचना करणाऱ्याला तुम्ही क्षमा केल्यास तुमचे स्वर्गीय पूर्वज तुम्हाला क्षमा करतील."

"रोगग्रस्तांची देखभाल करा, त्यांची काळजी वाहा!"

"दुसऱ्यांना दोषी ठरविण्याऐवजी स्वत:तील दोष घालविण्याचा प्रयत्न करा!"

"पूर्ण विश्वासाने प्रार्थना करा, तुमची इच्छा नक्कीच फलद्रुप होईल."

"जो धीर धरील, त्याचा नक्कीच उद्धार होईल."

"जो माझी वचने एकरूपतेने, समरसतेने ऐकेल, तो लीलया भवसागर तरून जाईल."

"जो माझ्यावर विश्वास ठेवील, तो देह ठेवल्यानंतरही अमर राहील."

"तुम्ही अनाथ नाही; मी तुमच्यासोबत आहे."

"तुम्ही जेव्हा अन्नग्रहण कराल, तेव्हा गरीब, लुळे-पांगळे, अंध यांना आधी भोजन द्या!"

भक्तीचं वैशिष्टय वर्णिताना गुरु नानक एके ठिकाणी म्हणतात:

"जे इतरांवर प्रेम करतात व हृदयांतरी ईश्वराच्या नामाचा अखंड जप करतात, ते जन्म-मृत्यूच्या रहाटगाडग्यातून मुक्ती मिळवतात व विनासायास मोक्ष प्राप्त करतात."

भक्तिविषयीचं हे सर्व विचार-मंथन पाहिले असता ह्या सर्व गोष्टींचा बोध आपले परम पूजनीय दैवत श्री साईबाबांनी आपल्या अवतार-कार्यात प्रत्यक्ष आचरणातून करविला असल्याचे त्यांच्या जीवन-चरित्रावरून आढळून येते. श्री साईमुखीची खालील आश्वासक वचने व त्यानुसार भक्तांना येत असलेले अनुभव याची साक्ष देतात.

"हे पाय पुरातन फार।<br>
जाहली तुझी काळजी दूर।<br>
पूर्ण भरवंसा ठेव मजवर।<br>
कृतार्थ लवकर होसील॥"

बाबांचे तर ब्रीदच आहे....

"मी भक्तपराधीन आहे."

बाबा नेहमी म्हणत असत....

"जयां माझी आवड मोठी। तयांचे मी अखंड दृष्टीं। तयां मजवीण ओस सृष्टी। माझियाच गोष्टी तयां मुखीं॥ आधीं मज न दिधल्यावांचून। करितां भोजन-रसप्राशन। जया माझें हें निदिध्यासन। तयाआधीन मी वर्ते। माझीच जया भूकतहान। दुजें न ज्यातें मजसमान। तयाचेंच मज नित्य ध्यान। तयाआधीन मी वर्तें॥ मीच तो तूं ऐसें पाहतां। हीच दृष्टी पुढें विस्तारतां। भूतमात्रीं ये निजगुरुता। ठाव तरिता मजविना॥ ऐसा अभ्यास करितां करितां। अनुभवा येईल माझी व्यापकता। मग तूं मजसीं पावूनि समरसता। पूर्ण अनन्यता भोगिसील॥ कोणी कोणास छद्मीं बोललें। त्यानें माझेंच वर्म काढिलें। जिव्हारीं खोचलें मज जाण॥ कोणीं कोणास दुर्वचें ताडिलें। तेणें मज तात्काळ दुखणें आणिलें। तेंच जेणें तें धैर्यें सोशिलें। तेणें मज तुष्टविलें बहुकाळ॥ ऐसा भूतमात्राच्या ठायीं। अंतर्बाह्य भरला साई। एका प्रेमावांचून कांहीं। आवडच नाहीं तयातें॥"

"जया माझें स्मरण। निरंतर आठवण मज त्याची॥"

"ध्यानांत ठेवी जो माझे बोल। सौख्य अमोल पावेल तो॥"

"माझिया प्रवेशा नलगे दार। नाहीं मज आकार ना विस्तार। वसें निरंतर सर्वत्र॥ टाकूनियां मजवरी भार। मीनला जो मज साचार। तयाचे सर्व शरीरव्यापार। मी सूत्रधार चालवीं॥"

"**अखंड माझेंहीं नाम घेतां। बेडा पार होईल तत्त्वतां। नलगे कांहीं इतर साधनता। मोक्ष हाता चढेल॥** जया माझे नामाची घोकणी। झालीच तयाचे पापाची धुणी। तो मज गुणियाहूनि गुणी। जया गुणगुणी मन्नमीं॥"

"जलस्थलकाष्ठप्रदेशीं। जनीं वनीं देशीं विदेशीं। संचलों मी तेजीं आकाशीं। एकदेशी मी नव्हें॥ जो पाहे मजकडे अनन्य। वर्णी परिसे मत्कथा धन्य। न धरी भावना मदन्य। चित्त चैतन्य लाधेल॥"

"साई साई नित्य म्हणाल। सात समुद्र करीन न्याहाल। या बोला विश्वास ठेवाल। पावाल कल्याण निश्चयें॥"

"बैस आतां सोडीं खंत। खंत न करिती विचारवंत। झाला तुझिया भोक्तृत्वा अंत। पाय शिरडींत टाकितां॥ आकंठ संकटार्णवीं बुडाला। हो कां महद्दु:खगर्तेत गढला। जो या मशिदमाईची पायरी चढला। सुखा आरूढला तो जाणा॥ फकीर येथींचा मोठा दयाळु। करील व्यथेचें निर्मूळु। प्रेमें करील प्रतिपाळु। तो कनवाळु सकळांचा॥"

वरील महान विभूतींचे भक्तिविषयीचे प्रतिपादन व आपण श्री साईबाबांची करीत असलेली भक्ती यात काही अंतर आहे का, याचं आपण आत्मपरीक्षण केलं पाहिजे. किंचितही अंतर जर नसेल, तर अगदी अत्युत्तमच व जर थोडंफार जरी अंतर असेल, तर ते दूर करण्याचा आपण आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. तेव्हाच ती साईबाबांची खरी भक्ती होईल, आपल्याला आत्मिक समाधान लाभेल व आपल्यासाठी मोक्षाचे द्वार खुले होईल.

# श्री साईबाबा आणि विषयसुख

– ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

स्वत: श्री साईबाबांच्या बाबतीत विषयसुखांचा प्रश्नच नव्हता. हेमाडपंत म्हणतात:

जिव्हाद्वारा रस चाखिती।
ऐसें समस्तां जरी भासती।
परी ते चाखिलें हें नेणती।
रसस्फूर्ति न रसनेसी॥९६॥
नयनद्वारें अवलोकिती।
पदार्थ जे जे येतील पुढती।
परी ते अवलोकिले नेणती।
स्फूर्ति देखती तेथ ना॥९८॥
बाबांचे ब्रह्मचर्यही परम कठीण।
पूर्णपण तें अपूर्व॥१००॥
कांसे कौपीन लंगोटी।
लिंग अजागलस्तन–कोटी।
केवळ मूत्रविसर्गपरिपाटी।
अवयवांपोटीं अवयव॥१०१॥
ऐसी बाबांची देहस्थिती।
इंद्रियें जरी कर्मी प्रवर्तती।
तरी तयांस विषयस्फूर्ति।
लव संवित्ती असेना॥१०२॥

– अध्याय १०

श्री साईसचरितात मात्र विषयसुखाचे धोके ठिकठिकाणी वर्णिले आहेत:

शब्दस्पर्शरूपादि विषय।
येणे मार्गे लागल्या इंद्रिय।
होईल व्यर्थ शक्तिक्षय।
पतनभय पदोपदीं॥८८॥
शब्दस्पर्शरूपादिक।
पंचविषयीं जें जें सुख।
तें तें अंतीं सकळ असुख।
परम दु:ख अज्ञान॥८९॥
शब्दविषया भुले हरिण।
अंती वेंची आपुला प्राण।
स्पर्शविषया सेवी वारण।
साहे आकर्षण अंकुशें॥९०॥
रूपविषयां भुले पतंग।
जाळूनि निमे आपुले अंग।
मीन भोगी रसविषयभोग।
मुके सवेग प्राणास॥९१॥
गंधालागी होऊनि गुंग।
कमलकोशीं पडे भृंग।
एकेका पायीं इतुका प्रसंग।
पांचाचा संघ भयंकर॥९२॥
हीं तो स्थावर जलचर पंखी।
ययांची दु:स्थिती देखोदेखी।
ज्ञाते मानवही विषयोन्मुखी।
अज्ञान आणखी तें काय॥९३॥

– अध्याय ३९

बहु खोटी ही विषयलालसा।
करी विषयासक्ताचे नाशा।
गुंतू नये या विषयपाशा।
जीविताशा असेल जरी॥१२१॥
श्रवणलालसे मरे कुरंग।
सुंदरमणिधारणें भुजंग।
तेजावलोकनं – गोडियें पतंग।
ऐसा हा कुसंग विषयांचा॥१२२॥
विषयभोगा लागे धन।
तदर्थ यत्न करितां गहन।
विषयतृष्णा वाढे दारुण।
अशक्य निवारण तियेचें॥१२३॥

– अध्याय ४७

चक्षुरादि इंद्रियनिचय।
भिन्नभिन्न हयस्थानीय।
रूपरसादि जे जे विषय।
मार्ग ते निरयप्रवर्तक॥१७८॥
यत्किंचित विषयाभिलाष।
करी पारमार्थिक सुखा नाश।
म्हणोनि त्यागा तो नि:शेष।
तरीच तो मोक्ष तुज लाधे॥१७९॥

– अध्याय ४९

श्रीमद्भगवद्गीतेत श्रीकृष्ण भगवानही विषयसुखाबद्दल हेच सांगतात:

ध्यायतो विषयान्पुंस: सङ्गस्तेषूपजायते।
सङ्गात्संजायते काम:
कामात्क्रोधोऽभिजायते॥६२॥
क्रोधाद्भवति संमोह:
संमोहात्स्मृतिविभ्रम:।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो
बुद्धिनाशात्प्रणश्यति॥६३॥

– अध्याय २

(विषयांचे चिंतन करणाऱ्या पुरुषाच्या ठिकाणी त्या विषयांविषयी संग, म्हणजे आवड, आसक्ती उत्पन्न होते. संगापासून काम, म्हणजे इच्छा अथवा वासना उत्पन्न होते. कामापासून त्याला प्रतिबंध झाला असता क्रोध उत्पन्न होतो. क्रोधापासून संमोह, म्हणजे अविवेक आणि संमोहापासून स्मृतिभ्रम, म्हणजे स्मरणशक्ती–नाश होतो. स्मृतिभ्रमापासून बुध्दीनाश आणि बुध्दीनाशापासून सर्वस्वाचा नाश होतो.)

म्हणून विषयांपासून इंद्रियांना कसे आवरावे, याचा उपायही कासवाचे उदाहरण देऊन श्रीकृष्ण भगवान सांगतात:

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वश:।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥५८॥

(कासव जसे आपले अवयव सर्व बाजूंनी आखडून घेते, त्याप्रमाणे जेव्हा स्थितप्रज्ञ पुरुष आपली इंद्रिये त्यांच्या विषयांपासून आवरून घेतो तेव्हा त्याची बुद्धी स्थिर होते.)

हेमाडपंतही श्री साईसचरितात कठोपनिषदाचा आधार घेऊन रथचालकाचा दृष्टान्त देतात:

या निजशरीराच्या रथीं।
निजबुद्धीस करी सारथी।
स्वयें स्वामी बैस रथीं।
स्वस्थचित्त ऐस तूं॥३०॥
दुर्गमरूप रसमार्गराजी।
कंठावया मग सारथी योजी।
आवरी मन–प्रग्रहांमाजी।

दशेंद्रियवाजी उच्छृंखळ॥३१॥
घोडे जरी सैरा धांवती।
लगाम राखील स्थानावरती।
तो निरखून सारथिया हातीं।
स्वस्थचित्तीं बैसें तूं॥३२॥
सारथी कुशल आणि निपुण।
तरीच घोडे चालती कसून।
तोच मनःप्रग्रहपराधीन।
होता बलहीन होतसे॥३३॥

—अध्याय १७

हे झाले परमार्थियांसाठी, जे प्रयत्नाने विषयसुख टाळतात किंवा त्यांवर ताबा मिळवितात. परंतु साधारण सांसारिक माणसाने, ज्याचा विषयांशी रात्रंदिवस संबंध येतो व जो मनाचा कच्चा आहे, त्याने हा धोका कसा टाळावा? त्याने संसाराचाच त्याग करावा का? श्री साईबाबा असे कधीच सांगत नसत. उलट एकदा नानासाहेब चांदोरकर संसाराला कंटाळून त्यातून सुटका करून घेण्यासाठी बाबांकडे आले असताना बाबा त्यांना म्हणाले:

तुझी आहे सत्य गिरा।
परी चुकतोसी वेड्या जरा।
यावद्देह तावत् खरा।
संसार आहे पाठीशी॥११॥
तो न चुकला कोणासी।
मग तूं त्या कैसा सोडिसी।
तो सोडिता न ये मजसी।
मीही त्यांत गुंतलो॥१२॥

—ह.भ.प. दासगणूकृत भक्तलीलामृत, अ. ३२

आणि प्रपंचात राहून कसे वागावे, याचा उपदेश केला.

श्री साईसचरितातही माणसाने संसारात राहून यथाप्राप्त विषयसुख तर घ्यावेच; पण त्यात गुंतून न पडता, अनीतीच्या मार्गात न सापडता, आपले कल्याण कसे साधावे, यासाठी साईबाबांनी अनेक सोपे उपाय सांगितले आहेत:

(१) एकदा नानासाहेब चांदोरकर मशिदीत बाबांजवळ बसले असताना एक श्रीमान गृहस्थ परिवारासह साईबाबांच्या दर्शनाला आला. त्यावेळी:

तयांमाजील एक नारी।
वंदू जातां बुरखा सारी।
पाहूनि सौंदर्यें अति साजिरी।
नाना निजअंतरी मोहिले॥१५३॥
लोकांसमक्ष पाहण्या चोरी।
पाहिल्यावीण राहवेना अंतरी।
वर्तावे काय कैसेपरी।
मोहाची उजरी नावरे॥१५४॥
बाबांची लज्जा मोठी अंतरीं।
म्हणोनि मुख तें न करवे वरी।
दृष्टी जाऊं लागली चांचरी।
सांपडे कातरीं तंव नाना॥१५५॥

साईबाबांच्या हे लक्षात आले; परंतु त्यांनी नानांना न धिक्कारिता किती छान उपदेश केला, तो पहा:

"नाना किमर्थ गडबडसी मनीं।
ज्याचा निजधर्म तो स्वस्थपणीं।
आचरतां आड यावें न कोणी।
कांहीं न हानी तयांत॥१५८॥
ब्रह्मदेव सृष्टी रचिता।
आपण तयाचें कौतुक न करितां।
व्यर्थ होऊं पाहील रसिकता।
'बनतां बनतां बनेल'॥१५९॥
असतां पुढील द्वार उघडें।
जावें कां मागील द्वाराकडे।
एक शुद्ध अंतर जिकडे।
तेथें न सांकडें कांहींहीं॥१६०॥
कुढा भाव नाहीं अंतरीं।
तयास काय कोणाची चोरी।
दृष्टि दृष्टीचे कर्तव्य करी।
भीड मग येथें धरिसीं कां"॥१६१॥

—अध्याय ४९

त्यावर स्पष्टीकरणार्थ हेमाडपंत खालील पुस्ती जोडतात:

मन जातीचेच चंचळ।
होऊं न द्यावे उच्छृंखळ।
होवो इंद्रियांची खळबळ।
शरीर उतावीळ होऊं नये॥१७०॥
इंद्रियांचा माहीं विश्वास।
विषयार्थ व्हावें न लालस।
हळूहळू करितां अभ्यास।
चांचल्यनिरास होईल॥१७१॥
होऊ नये इंद्रियाधीन।
तींही न सर्वथा राहती दाबून।
विधिपूर्वक तयांचें नियमन।
करावें पाहून प्रसंग॥१७२॥
रूप हा तों दृष्टीचा विषय।
सौंदर्य वस्तूचें पहावे निर्भय।
तेथें लाजेचें कारण काय।
द्यावा न ठाय दुर्बुद्धीतें॥१७३॥
मन करोनियां निर्वासन।
ईशकृतीचे करा निरीक्षण।
होईल सहज इंद्रियदमन।
विषयसेवनविस्मरण॥१७४॥

—अध्याय ४९

(२) अध्याय २४ मध्ये फुटाण्यावरून थट्टा करून अण्णासाहेब दाभोलकरांना आणखी एक उपाय ठसविला:

मनबुध्दयादि इंद्रियगण।
करूं आदरितां विषयसेवन।
करावें आधीं माझें स्मरण।
तैं मज समर्पण अंशाशें॥४६॥
इंद्रियें विषयांवीण राहती।
हें तों न घडे कल्पांतीं।
ते विषय जरी गुरुपदीं अर्पिती।
सहजीं आसक्ति राहील॥४७॥

त्याचेच पुढे हेमाडपंत स्पष्टीकरण करतात:

यत्किंचित विषयसेवनीं।
बाबा आहेत संनिधानीं।
सेव्यासेव्यता विचार मनीं।
सकृद्दर्शनीं उठेल॥५५॥
असेव्य विषय सहजचि सुटे।
व्यसनी भक्ताचे व्यसन तुटे।
असेव्यार्थी मनही विटे।
वळवितां नेहटें हें वळण॥५६॥

आणि सार सांगतात:

परी या कथेचें सार काय।
तेथेंच आपण घालूं ठाय।
पांचां पोटीं कोणताही विषय।
बाबांशिवाय सेवूं नये॥६९॥

—अध्याय २४

(पृष्ठ क्र. ९ वर)

# श्री दत्ताचे सोळा अवतार



**भा**रतीय इतिहासात आणि जनमानसात 'श्री दत्त' हे दैवत अतिपुरातन काळापासून स्थिर झालेले दिसते. निरनिराळ्या वेळी, निरनिराळ्या ठिकाणी, निरनिराळ्या भक्तांना दत्तांनी विविध रूपात दर्शन दिल्याची उदाहरणे आपल्या वाचनात आलेली आहेत. कधी ते एखाद्या मलंगाच्या स्वरूपात भेटतात, कधी फकीर बनलेले दिसतात, कधी साधू-बैरागी बनतात, तर कधी व्याघ्र, सर्प अशा प्राण्यांच्या स्वरूपात दर्शन देतात. मात्र ह्या सर्व गोष्टींचा विचार करताना एक गोष्ट जाणवते, ती म्हणजे दत्तात्रेयांचा वेष हा प्रामुख्याने यतीप्रमाणे वैराग्यसूचक आहे. माथ्यावर जटाभार, गळ्यात रुद्राक्ष माळा, अंगास भस्म, हातात दंड, कमंडलू, त्रिशूळ, डमरू, शंख, चक्र इत्यादी आयुधे, अंगावर मृगचर्म अशा वेषात दत्तात्रेय प्रामुख्याने वावरताना दिसतात. कधी कधी त्यांचे साजिरे-गोजिरे रूपही भक्तांच्या मनी स्थिरं झालेले दिसते. असो. आपल्या या लेखाचे प्रयोजन हे दत्ताच्या सोळा अवतारांची ओळख करून देणे आहे; म्हणून आता आपण सरळ मुख्य विषयाकडे वळू या.

## ॥ श्री दत्त जन्मगीत ॥

ऋतू हेमंती झुले पाळणा,
अत्रिऋषींच्या घरी
प्रगटले दत्त वसुधेवरी,
प्रगटले दत्त वसुधेवरी॥धृ.॥

त्रैलोक्याचा जो अधिनायक
रमारमण जो त्रिभूवन पालक
तोच दयाघन दत्तरूपाने –
आला अत्रिघरी॥१॥

मार्गशीर्ष तो आला बहरूनी
तिथि पौर्णिमा आली उजळूनी
नक्षत्रांची राणी रोहिणी –
अमृत कलशा धरी॥२॥

हरी-भरी ही अवघी वसुधा
फुलली होती रमणी सुगंधा
इंद्रपुरीची राणी सुमेधा –
दासी अत्रिदारी॥३॥

नृत्य-गायने दंग अप्सरा
गंधर्वाचा कंठ साजिरा
देवलोकीच्या देवमंदिरा –
आणविले भूवरीं॥४॥

श्री दत्तात्रेयांचा आश्रम सिंहाचलावर असून ते स्वेच्छाविहारी आणि स्मर्तृगामी, म्हणजे स्मरण करणाऱ्याला त्वरित भेटणारे आहेत. माहूर, पांचाळेश्वर आणि कोल्हापूर ही ठिकाणे दत्तात्रेयांची विहारस्थाने म्हणून प्रसिद्ध आहेत. या दत्तात्रेयांनी आपले अवतारकार्य पूर्ण करण्यासाठी सोळा अवतार धारण केल्याचा वृत्तांत प. पू. वासुदेवानंद सरस्वती यांनी आपल्या 'श्री दत्तात्रेय षोडशावतार' या आपल्या ग्रंथात विस्ताराने दिलेला आहे. आज त्याचीच ओळख आपण या लेखात करून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

ब्रह्मदेवाचे मानसपुत्र श्री अत्री पुत्र-प्राप्तीसाठी आपल्या पत्नीसह हिमालयात तपश्चर्या करीत होते. त्यांच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन भगवंताने कार्तिक, शु. १५, बुधवारी कृमिका नक्षत्र असताना प्रगट दर्शन दिले. त्यांचे रूप स्फटिकासारखे होते. दत्तात्रेयांचा हा अवतार **'योगीराज'** म्हणून प्रसिद्ध आहे.

पुढे अत्रीऋषींनी ऋक्षपर्वतावरील परम तीर्थावर शंभर वर्षे तप केले. त्यामुळे त्यांच्या मस्तकातून अतिशय उग्र असे तेज बाहेर पडू लागले. परिणामी सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले. सर्व देवलोकही भयभीत झाला आणि मग ब्रह्मा-विष्णू-महेश असे तीनही महादेव अत्रीच्या पुढे येऊन उभे राहिले. त्यांना पाहून अत्रीऋषींनी विचारले,

"अरे, मी एकाचेच चिंतन करीत असताना तुम्ही तिघे कोण? इथे का आलात?"

त्यावर ते तिघे देव म्हणाले,

"तुम्ही ज्या कोणाएकाचे ध्यान करता तोच आम्हा तिघांत आहे."

असं म्हणून ते तीनही महादेव एकदम गुप्त झाले आणि अत्रींच्यापुढे तप्त सुवर्णकांतीप्रमाणे तेजस्वी, हसतमुख व षडभुज असे रुप प्रगट झाले. हा दिवस कार्तिक, कृ. प्रतिपदा, गुरुवारचा होता. हा दत्तावतार **'अत्रीवरद'** म्हणून प्रसिद्ध आहे.

या अत्रीवरदाने अत्रीऋषींना वर मागण्यास सांगितले. अत्रींनी

''तुमच्यासारखा मला पुत्र व्हावा'', असा वर मागितला. त्यावर ''मी तुम्हाला तसा वर दिलेला आहे'', असे म्हणून बालरूपातील आपले स्वरूप दत्तात्रेयांनी प्रगट केले. ते दिगंबररूप मदनासारखे सुंदर आणि नीलमण्याप्रमाणे तेजस्वी होते. चंद्राप्रमाणे शीतल मुखचंद्रमा असलेले ते चतुर्भूज मनोहारी रूप होते. हाच दत्तात्रेयांचा **'स्वयंदत्त'** असा तिसरा अवतार होय! कार्तिक, कृ. द्वितीया, शुक्रवार या दिवशी हे रूप प्रगट झाले. याला 'दत्तात्रेय' असेच नाव आहे.

या मोहक पुत्राप्रमाणे आपणाला औरस पुत्र असावा, अशी इच्छा मनी धरून अत्रीऋषी पुन: तप करू लागले. उग्र तपाने त्यांच्या शरीरात कालाग्नी प्रगट झाल्यामुळे त्याचा दाह होत राहिला. तेव्हा या दाहाच्या शमनार्थ भगवान अतिशय शीतल अशा रूपाने प्रगट झाले. मार्गशीर्ष, शु. १५, बुधवार या दिवशी अनसूयेच्या पोटी आलेला हा चौथा अवतार **'कालाग्निशमन'** या नावाने प्रसिद्ध आहे.

याचवेळी रुद्राचा अंश दूर्वास, ब्रह्मदेवाचा अंश चंद्र व विष्णूचा अंश दत्त असे तीनही देव प्रगट झाले. कालाग्निशमनाच्या दर्शनास देव, ऋषी, गंधर्व इत्यादी जमा झाले होते. त्यावेळी दत्तांनी आपले बालरूप टाकून योगीजनांस प्रिय असे प्रौढ रूप धारण केले. त्यांना गर्भवास नसला तरी भक्त कामनाप्रित्यर्थ जो हा प्रौढ अवतार मार्गशीर्ष, शु. १५, गुरुवार रोजी त्यांनी धारण केला तो **'योगीजनवल्लभ'** या नावाने प्रसिद्ध असून हा दत्ताचा पाचवा अवतार म्हणून ओळखला जातो. या अवताराने आपल्या नाना लीला लोकांना दाखविल्या. योगीजनवल्लभ कधी ध्यानस्थ असत, कधी शिष्यांना उपदेश करीत. एकदा त्यांनी आपल्या शिष्यवर्गाला अरण्यरूप प्रपंचाचे दर्शन घडविले. काम हा जबडा पसरलेला सिंह, क्रोध हा रागीट सर्प, मोह हा डोह, अशाप्रकारच्या रूपकांनी लोकांना समजावण्याचा प्रयत्न केला; परंतु म्हणावी तशी लोकांची श्रद्धा दत्तवचनावर बसेना; म्हणून जनबोधासाठी त्यांनी नवी युक्ती योजण्याचे ठरविले.

दत्त आपल्या शिष्यवर्गासह एका मोठ्या सरोवराकाठी आले आणि शिष्यांची परीक्षा पाहण्याच्या हेतूने त्यांनी त्या सरोवरात उडी घेतली आणि गुप्त झाले. बरोबर आलेल्या शिष्यांपैकी कालांतराने काही शिष्य निघून गेले. काही मात्र गुरुंची प्रतीक्षा करीत तिथेच बसून राहिले. ह्या शिष्यांच्या ज्ञानाची आणि भक्तीची कसोटी पाहण्यासाठी दत्तात्रेयांनी अतिमोहक अशा दिगंबर अवस्थेतील स्त्रीचे रूप धारण केले आणि ते त्या विशाल डोहातून बाहेर आले. विवेक आणि श्रद्धा यांची कसोटी पाहणारा असा हा दत्तात्रेयांचा सहावा अवतार पौष, शु. १५, बुधवार रोजी झाला असून तो **'लीलाविश्वंभर'** या नावाने प्रसिद्ध आहे.

श्री दत्ताच्या सातव्या अवताराची कथा फार मनोरंजक आहे. गुरु एकदा फिरत फिरत बद्रिकावनात गेले. तिथे अनेक सिद्धपुरुष बसलेले त्यांना दिसले. त्यात काही दिगंबरावस्थेत होते, काही मौनी होते, काही ध्यानस्थ होते, तर काही काम-क्रोधी होते.

ह्या सर्वांची परीक्षा पहावी आणि त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणे त्यांस सन्मार्गास लावावे, या हेतूने दत्तात्रेयांनी कुमाररूप धारण केले आणि योगमुद्रा धारण करून ते सिद्धांच्या मेळाव्यात जाऊन उभे राहिले. या बालयोग्याला पाहताच त्या सिद्धांचा महंत पुढे झाला आणि त्याने त्या बालरूपी दत्ताला काही प्रश्न विचारले. दत्तांनी ह्या सर्व प्रश्नांची मार्मिक उत्तरे दिली. या छोट्याशा प्रश्नोत्तररूपी संवादात योगाचे सार आहे, म्हणून तो संवाद मुद्दाम येथे देत आहे.

**महंत (सिद्ध):** तू कोण आहेस?

**दत्त:** मी अप्रतीत रूप आहे.

**महंत:** तुझा आश्रय कोणता?

**दत्त:** मी अनाथ आहे, निराश्रय आहे.

**महंत:** तुझा योग व क्रिया कोणती?

**दत्त:** अक्रिय व चित्रयोग.

**महंत:** तुझा गुरु कोण?

**दत्त:** गुरु नाही.

**महंत:** मुद्रा कोणती?

**दत्त:** मायातीत निरंजनी.

**महंत:** पाहतोस काय?

**दत्त:** सर्वत्र दिसते ते.

**महंत:** तुझे ध्येय काय?

**दत्त:** ध्यानाच्या अभावाने जे समजावयाचे ते.

**महंत:** तुझा मार्ग कोणता?

**दत्त:** ज्या मार्गाने सुख होईल तो.

श्री दत्तांनी अशा तऱ्हेच्या उत्तरांनी आणि सिद्धी-चमत्कारांनी त्या सिद्धांचा गर्व दूर केला आणि त्यांना खरी योगदीक्षा दिली. माघ, शु. १५, गुरुवार रोजी झालेला हा **'सिद्धराज'** नावाचा दत्तात्रेयांचा सातवा अवतार होय!

या अवतारानंतर सिद्धीला कामनेची जोड नसावी, हे पटविण्याकरिता दत्तांनी रूपातीत, गुणातीत, ज्ञानयोगयुक्त असे सहज-स्थितीमधील रूप प्रगट केले. फाल्गुन, शु. १०, रविवारी प्रगट झालेला दत्ताचा हा आठवा अवतार **'ज्ञानसागर'** या नावाने ओळखला जातो.

आणखी एका प्रसंगी सिद्धांना बोध करण्यासाठी चैत्र, शु. १५, मंगळवार रोजी दत्तांनी **'विश्वंभराडवधूत'** या नावाचा नववा अवतार घेतला.

त्यानंतर वैशाख, शु. १४, बुधवार रोजी दत्तात्रेय अब्राह्मण भिक्षुरूपाने प्रगट झाले. त्यांचे हे रूप सुवर्णाप्रमाणे कांतिमान व तारुण्य मदाने परिपूर्ण असे होते. त्यांच्या अंगावर चंदनमिश्रित गंध (भस्म) होते. एका हातात भिक्षापात्र व दुसऱ्या हातात दंड होता. अशा थाटात ते शील नामक ब्राह्मणाच्या घरी श्राद्ध असताना एकदम पानावर जाऊन बसले. त्या ब्राह्मणास क्रोध आला. दोघांच्यात बराच वादविवाद झाला. ब्राह्मण रागावून दत्तांना म्हणाला,

''तू वेदांचा अधिकारी नाहीस; मग तुला वैदिक कसे म्हणावे?''

त्यावर दत्तात्रेयांनी मोठा चमत्कार घडवून

आणला. आपल्याबरोबर असलेल्या काळ्या कुत्र्याच्या मुखातून त्यांनी चारी वेद वदवून घेतले. त्यामुळे सारे चकित झाले आणि ब्राह्मण दत्तगुरुंना अनन्यभावे शरण आला. हा भिक्षावेषधारी असा दत्तगुरुंचा दहावा अवतार **'मायामुक्तावधूत'** या नावाने प्रसिद्ध आहे.

याच नावाचा आणखी एक अवतार जेष्ठ, शु. १३, शुक्रवारी प्रगट झाला. त्यावेळी त्यांचे रूप सावळे आणि सुंदर होते. मांडीवर एक सुंदर स्त्री होती. स्त्रीसह मद्य व मांस यांचे सेवन ते करीत होते. हे दृष्य पाहताच त्यांच्याभोवतीचे ब्राह्मण त्यांना सोडून गेले. तेव्हा **'मायामुक्तावधूत'** नावाचा हा अकरावा अवतार स्वत:शीच म्हणाला....

ही स्त्री म्हणजे माया. ती दुष्ट संगापासून मुक्त करते. योगाला अनुकूल आणि सुखदायक अशी ही आहे.

दत्तात्रेयांच्या बाराव्या अवताराची कथा तर फारच मनोरंजक आहे. त्याचं असं झालं....

नेहमीप्रमाणेच एकदा देव आणि दानवांचे घनघोर युद्ध जुंपले. त्यात देवांचा पराभव झाला. त्यावेळी देवगुरु बृहस्पती यांच्या सांगण्यावरून सर्व देव दत्तात्रेयांना शरण गेले. त्यावेळी दत्तांनी सर्व देवांना आषाढ, शु. १५, शनिवारी वरीलप्रमाणेच दर्शन दिले. त्यावेळी त्यांनी एक दिगंबरावस्थेतील युवती आपल्या मांडीवर घेतली होती आणि अतिप्रेमभराने तिला मिठीत घेऊन ते तिच्या ओठांचे वारंवार चुंबन घेत होते. परंतु परीक्षा पाहण्यासाठी धारण केलेल्या या रूपाला देव फसले नाहीत; ते तसेच दत्तात्रेयांना शरण गेले. दत्तांनी त्यांना अभय दिले आणि परत युद्धासाठी पाठविले. पुन्हा घनघोर युद्ध जुंपले आणि जंभासुरादि दानव देवांचा पाठलाग करीत दत्ताश्रमात आले. त्यांनी गुरुंच्या मांडीवर बसलेली ती सुंदर स्त्री पाहिली आणि तिचा मोह होऊन त्यांनी तिला पळवून नेले. त्यात सर्व दानवांचा नाश झाला. हा दत्तात्रेयांचा बारावा अवतार **'आदिगुरु'** या नावाने प्रसिद्ध आहे.

यानंतर श्रावण, शु. ८, सोमवार या दिवशी दत्तात्रेय काळ्या आवळीखाली संस्कारहीन अशा वेषात प्रगट झाले. दत्ताचा हा **'शिवरूप'** नावाचा तेरावा अवतार.

भाद्रपद, शु. १४, शुक्रवार या दिवशी कृष्ण आवळीच्या मूळाशीच दत्तांचा **'देवदेवावतार'** नावाचा चौदावा अवतार प्रगट झाला.

## मी दत्तमयी व्हावे....

श्री दत्ताचे नाम गात हे,<br>
जीवन संपून जावे....<br>
मी दत्तमयी व्हावे,<br>
मी दत्तमयी व्हावे ॥धृ.॥

अत्रितनय हा तीन गुणांचा<br>
मालक शोभे त्रैलोक्याचा<br>
चरणी त्याच्या सदा सदोदीत–<br>
तल्लीन मी व्हावे....॥१॥

सत्व-रजासह तमोगुणांचा<br>
संगम शोभे त्रैलोक्याचा<br>
झरा वाहतो सदा सुखाचा–<br>
त्यातच मी न्हावे....॥२॥

गात गात हे नाम सुखाचे<br>
आयु सरावे उरले माझे<br>
अमृतमय त्या कृपादृष्टीचे–<br>
दर्शन मज व्हावे....॥३॥

आश्विन, शु. १५, बुधवारी यदुराजास श्री दत्तदिगंबर भेटले व त्यांनी आपल्या चोवीस गुरुंपासून आपण काय काय घेतले, याचा त्याला बोध केला. दत्तांचा हा पंधरावा अवतार **'दिगंबर'** या नावाने प्रसिद्ध आहे.

त्यानंतर कार्तिक, शु. १२, बुधवार रोजी इंद्रनील मण्याप्रमाणे कांती असलेले दत्तात्रेय भक्तांच्यासमोर प्रगट झाले. हा त्यांचा **'श्यामकमललोचन'** या नावाचा सोळावा अवतार होय!

याप्रमाणे दत्तांनी सोळा अवतार घेतलेले आहेत. अर्वाचीन काळातील थोर विभूती अक्कलकोट महाराज, साईबाबा, गजानन महाराज, माणिकप्रभू, पंत बाळेकुंद्री महाराज इत्यादी संत-महात्म्ये श्री दत्तात्रेयांचे अवतार म्हणूनच ओळखले जातात.

**–श्री. गजानन कुलकर्णी**<br>
रत्नागिरी.

(पृष्ठ क्र. ६ वरून)

(३) या सर्वांपेक्षा अध्याय २० मध्ये काकांच्या मोलकरणीच्या निमित्ताने बाबांनी विषयसुख कसे भोगावे याचे अत्यंत सुंदर व मार्मिक तत्त्व पटविले आहे. ती **''आठा वर्षांची कुणब्याची पोर'' ''खायला मिळेना पोटभर। चिंधी न वेढाया बोटभर॥''** पण कोणाच्या नारिंगी साडीवर हर्षनिर्भर होऊन गोड आवाजाने गाणे गात होती.... **''काय त्या साडीचा भरजर। काय त्या साडीचा कांठ सुंदर। काय मौजेचा तिचा पदर॥''** दासगणूंना दया येऊन त्यांनी रा. ब. प्रधानांकरवी तिला एक नवीन साडी देवविली. दुसऱ्या दिवशी ती पोर ती नवीन साडी नेसून आली व आनंदाने फुगडी वगैरे खेळून नाचली. पण तिसऱ्या दिवशी त्या साडीला पेटीत ठेवून नेहमीचेच फाटके फटकूर नेसून आली; परंतु तिच्या मनात यत्किंचितही दु:ख नव्हते; तितक्याच आनंदात ती होती. जणूकाय तिने गीतेतील **'यद्दच्छालाभसंतुष्टो (अ. ४/२२)'** हे वचनच आत्मसात केले होते. सुखदु:ख हे आपल्या भावनेवर, म्हणजे मनाच्या वृत्तीवर अवलंबून असते. प्रसिद्ध ईशावास्य उपनिषदातही असाच उपदेश केला आहे.... **'तेन त्यक्तेन भुञ्जिथा मा गृध:'** (विषयांचा यथाविधी उपभोग घ्या; पण कसलीही ममता किंवा आसक्ती धरू नका.) असो.

अशाप्रकारे साईबाबांनी सर्वसाधारण माणसांना अनेक सोपे उपाय सांगितले आहेत आणि संसारात राहून कल्याणाचा मार्ग दाखविला आहे. परमार्थियांना मात्र मनाचाच विवेक राखून इंद्रियरूपी घोड्यांना आवरायला ते सांगतात; कारण तेच त्यांना मोक्षपदाला नेईल:

**ऐसा मन:समाधानपर।<br>
निग्रही दक्ष कुशल चतुर।<br>
भाग्यें लाधलिया सारथी चतुर।<br>
कैंचे दूर वैष्णवपद॥१८२॥<br>
तेंच पद परब्रह्म।<br>
'वासुदेव' अपर नाम।<br>
तेंच सर्वोत्कृष्टपद परम।<br>
परंधाम परात्पर॥१८३॥**

–अध्याय ४९

# श्री साईबाबा व तत्कालीन साधुसंत

– साईशा

नामरूपातीत, निर्गुण-निराकारस्वरूपी देवाला, ज्याचे हे निराकार, निर्गुण स्वरूप आकाशाप्रमाणे असंग आणि सागराप्रमाणे अथांग, किंबहुना वर्णनातीत आहे, ज्या परमोच्च कोटीतल्या सत्पुरुषांनी आकारास आणले आणि त्या 'अव्यक्ताला' नामाद्वारे जगात प्रगट करण्याचे कार्य केले, त्यांनाच आपण 'संत' म्हणतो. संत देवास आकारास आणतात, त्याला आकारास आणण्याकरिताच संत अवतार घेत असतात. 'संत' ही देवाची लडिवाळ लेकरेच आहेत. ते देवाचा आत्माच आहेत. श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात,

**"संतांना जो अनन्यशरण जातो त्याच्या चरणांचे मी वंदन करतो."** भगवान श्रीकृष्ण पुढे असेही म्हणतात,

**"संत म्हणजेच माझा आत्मा। संत ही माझीच सजीव प्रतिमा। संत-सप्रेमा तोच मीच॥"**

संतांची महती सांगताना आणि 'मी' म्हणजेच संत हे जगाला पटवून देताना आपल्या 'एकनाथी भागवतात' एकनाथ महाराजांच्या मुखाने प्रत्यक्ष देवच – पांडुरंगच म्हणतो,

**"प्रतिमा माझ्या अचेतन व्यक्ति।**
**संत सचेतन माझ्या मूर्ति।**
**दृढभावे केल्या त्यांची भक्ति।**
**ते मज निश्चितीं पावती॥"** किंवा

**"सोडूनि माझे पूजा-ध्यान।**
**जो संतांशी घाली लोटांगण।**
**कोटि यज्ञांचे फळ जाण।**
**मदर्पण तेणे केले॥"** किंवा

**"संत प्रत्यक्ष पुरुषोत्तम।**
**चालते-बोलते परब्रह्म॥"**

अशातऱ्हेच्या अनेकानेक उत्तमोत्तम संतवर्णनाने जागोजागी नटलेले 'एकनाथी भागवत'ही "संत म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरच" याची पुन्हा पुन्हा ग्वाही देते.

थोडक्यात, ईश्वराची पूजा म्हणजेच संतांची पूजा. इतकेच नव्हे, तर देवाला खुद्द स्वतःच्या पूजेपेक्षाही संतांची पूजाच अधिक आवडते. संत आणि ईश्वर हे एकच आहेत, वेगळे नाहीत. म्हणजेच, "संत हे निर्गुण निराकार अव्यक्ताचे भूतलावर प्रगटलेले व्यक्त स्वरूप आहे."

अज्ञानाचा नाश, अधर्माचा लोप, ज्ञानाचा उदय आणि धर्माची स्थापना करण्याकरिताच ते या जगात वेळोवेळी अवतार घेत आले आहेत. जगाच्या उद्धाराकरिता आपल्या भव्य, दिव्य, अलौकिक अशा चारित्र्याने, कार्याने, आपल्या उत्कृष्ट, उद्‌बोधक वाणीने आणि वाङ्‌मयाने संतांनी आपले अस्तित्व या भरतभूमीवर चिरकाल अबाधित ठेवले आहे.

अशा सत्पुरुषांच्या एकमेकांशी भेटी, म्हणजे परमार्थाच्या मार्गातील परमोच्च आनंदाची पर्वणीच असते.

संतचूडामणी श्री साईबाबा गेल्या शतकाच्या उत्तरार्धात या पृथ्वीतलावर देहरूपाने अवतीर्ण झाले. ते शिरडीत येण्यापूर्वी दहा-बारा वर्षे 'देवीदास' नावाचे सत्पुरुष शिरडीत वास्तव्य करून होते. दहा-अकरा वर्षाचे कोवळे, सुंदर बांधा, सतेज डोळे व मनोहर रूप असलेले देवीदास फक्त एक लंगोटी नेसून मारुतीच्या देवळात वास्तव्यास होते. ते मोठे ज्ञानी होते.

त्यानंतर 'जानकीदास' शिरडीस आले. ते महानुभावी (विद्या, बुद्धी यांनी श्रेष्ठ) असे गोसावी होते. साईबाबा शिरडीत आल्यावर ह्या तिघांची बैठक मारुतीच्या देवळाच्या सभामंडपातील ऐसपैस जागेत भरत असे. कधी कधी बाबा देवीदासांच्या संगतीत असत, तर कधी जानकीदास जेथे असतील तेथे जात किंवा बाबा असतील तेथे जानकीदास येऊन बोलत बसत. एकमेकांवर त्यांचे खूप प्रेम होते. त्यांची नित्यनेमाने बैठक होत असे. त्यांचा हा समागम सगळ्यांनाच परमसुखदायी झाला होता.

तसेच, 'गंगागीर महाराज' नावाचे पुणतांब्याचे महाप्रसिद्ध (गृहस्थाश्रमीचे पुणतांबेकर) विष्णुभक्ती संप्रदायाचे अनुयायी हे वरचेवर शिरडीस येत असत. सुरूवातीस बाबा दोन्ही हातात मातीच्या घागरी घेऊन विहिरीवरून पाणी आणताना पाहून ते आश्चर्यचकित होत. पुढे साईबाबांशी समोरासमोर भेट होताच त्यांनी

**"शिर्डीचे भाग्य किती वरिष्ठ म्हणून हे श्रेष्ठ रत्न मिळाले. आज हा खांदा पाणी वाही। परी ही मूर्ति सामान्य नाही। होते या भूमीचे पुण्य कांही। तरीच ये ठायी पातली॥"** असे उद्‌गार काढले.

सुरूवातीच्या काळात शिरडीत बाबांची भेट झालेल्या सत्पुरुषांपैकी **'आनंदनाथ महाराज'** हेही एक होत. आनंदनाथ महाराज हे अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थ महाराजांचे शिष्य होते. ते मूळचे दक्षिण कोकणातील, म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यातील कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीचे. या महाप्रसिद्ध आनंदनाथांचा कोपरगांव-मनमाड रस्त्यावर येवले गावी मठ होता. एकदा माधवराव देशपांडे, दगडूभाऊ गायके, नंदू मारवाडी व भागचंद मारवाडी हे शिरडीनिवासी बाबांचे थोर भक्त येवल्यास त्यांच्या दर्शनास गेले असता दर्शन घेऊन माघारी परतायच्या बेतात असताना गावकरी नको नको म्हणत असतानादेखील हे आनंदनाथ महाराज एकाएकी धावत येऊन त्यांच्या चालत्या गाडीत बळेच बसले आणि "मला शिरडीस यावयाचे आहे", असे म्हणून त्या मंडळींबरोबर शिरडीस आले. साईबाबांना समक्ष पाहून त्यांच्या मुखातून उत्स्फूर्त उद्‌गार निघाले,

**"अहो! हा प्रत्यक्ष हिरा आहे हिरा. आज जरी हा उकिरड्यावर पडला आहे तरी हा हिरा म्हणजे गारगोटी नव्हे."** ते पुढे असेही म्हणाले,

**"माझे हे बोल ध्यानात ठेवा! पुढे तुम्हाला या शब्दांची जरूर आठवण येईल."** असे भविष्य कथन करून ते येवल्यास परतले.

यावेळी खरेतर बाबांचे पोरवय होते; पण

ज्यांना स्वाभाविकच सर्वसिद्धी प्राप्त आहेत त्यांना श्री साईंसारख्या प्रत्यक्ष परब्रह्म्याला ओळखायला कितीसा वेळ लागणार!

परमार्थात उत्तम प्रगती साध्य केलेले पंचाण्णव वर्षांचे पंढरीचे वारकरी 'गौळीबुवा' हेही वर्षास पंढरीच्या वारीप्रमाणेच शिरडीची वारी करीत असत. बाबांवर त्यांचे अत्यंत प्रेम होते. मुखाने सदैव 'रामकृष्णहरी'चा जप चाललेला असे. सोबत एक शिष्य व एक गाढव नेहमी साथीला असे. चातुर्मासात गंगा नर्वच्या काठी आणि उरलेले आठ महिने ते पंढरपूरला वास्तव्य करीत. शिरडीस आले की अतिविनित होऊन बाबांकडे अनिमिष नेत्रांनी पहात कौतुकाने त्यांनी म्हणावे

**''हाचि तो मूर्त पंढरनाथ। अनाथनाथ दयाळ॥ रेशीमकाठी धोतरे नेसून का कोणी संत होत असतात! त्यांना कष्ट करून हाडाचे मणी आणि रक्ताचे पाणी करावे लागते. देवपण काय फुकाफुकी लाभते होय! हे जग वेडे आहे, हे पक्के ओळखून याचे देवपण लक्षात आणा.''**

सुरूवातीच्या काळात लोकांनी जरी बाबांना 'वेडा फकीर' म्हणून संबोधिले तरी त्यांचे देवत्व जाणणाऱ्या ह्या थोर सत्पुरुषांनी त्यांचे 'अलौकिक माहात्म्य' केव्हाच जाणले होते. अल्पबुद्धीच्या आपल्यासारख्या सामान्य जीवांना प्रत्यक्ष परमात्म्याच्या या स्वरूपाची ओळख निदान सुरूवातीला तरी चमत्काराशिवाय एकदम कशी पटणार! पाण्याने पणत्या पेटवण्याच्या या एका विलक्षण अलौकिक चमत्काराने बाबांचे विश्वव्यापी सार्वभौमत्व एका क्षणात लोकांना मान्य झाले.

श्री साईसचरितात ५ व्या अध्यायात भाई अलिबागकर या **श्री अक्कलकोट स्वामींच्या** निस्सीम भक्ताची गोष्ट आढळते. याकन श्री साईबाबा किंवा अक्कलकोट स्वामींच्या एकरूपतेविषयी किंवा एकात्मतेविषयी खात्री पटते. ते एकदा अक्कलकोटच्या स्वामी समर्थांच्या पादुकांची पूजा-अर्चा करावी स्वामींचे मनसोक्त दर्शन घ्यावे म्हणून अक्कलकोटला निघणार तर आदल्या दिवशी प्रत्यक्ष स्वामींनीच त्यांना स्वप्नात दृष्टान्त देऊन सांगितले,

''सद्या माझे स्थान शिरडी येथे आहे तेथेच तू प्रस्थान कर!'' या दृष्टांताची आठवण म्हणून भाईंनी १९१२ साली गुरुस्थानात गुरुपादुकांची स्थापना केली.

तसेच, श्री साईसचरिताच्या १४ व्या अध्यायात नांदेडचे एक सुप्रसिद्ध सत्पुरुष **'श्री मौलीसाहेब'** यांची कथा आली आहे. वरवर पाहाता ती कथा एका रतनशी शेठजी या पारशी गृहस्थाची आहे. ते संतती नसल्यामुळे सतत अत्यंत दुःखी असत. भरपूर पैसा असूनही त्यांना समाधान कसले ते नव्हते. श्री दासगणूंच्या सांगण्यावरून ते शिरडीस बाबांकडे आले. बाबांनी त्यांना

''अल्ला मन की मुराद पूरी करेगा'', असा आशीर्वाद दिला व पुढे म्हणाले,

''तू मला तीन रुपये चौदा आणे आधीच दिले होतेस, ते मला ठाऊक आहे. आता, बाकी राहिलेले जे तू आणले आहेस त्याची मला दक्षिणा दे!''

नांदेडला परतल्यावर शेठजींनी दासगणूंना बाबांबरोबरची सविस्तर भेटीची हकीकत सांगितली व म्हणाले,

''बाबा ३ रु. १४ आणे तू मला दिलेस, हे मला ठाऊक आहे, असे का म्हणाले ते कळले नाही.''

श्री दासगणूंनी खूप विचार केल्यावर त्यांना या वाक्याचा गूढार्थ उमगला. नांदेडचे मौलीसाहेब (यांचे वागणे व दिनचर्या एखाद्या संताप्रमाणे असे.) हमालीचा धंदा करून दैव ठेवील त्याप्रमाणे रहात असत. शेठजींचे शिरडीला जाणे ठरले तेव्हा ते शेठजींकडे गेले होते. उभयतांत खूप स्नेह होता. शेठजींनी त्यांना हार व फलपान अर्पण करून अचानक स्फूर्ती झाल्याने एक छोटासा 'खाना'ही दिला होता. त्या सर्व खर्चाची यादी मागवली असता बेरीज बरोबर ३ रु. १४ आणेच भरली.

म्हणजे, देहाने जरी संत प्रत्यक्ष एकमेकाला भेटत नसले तरी अंतर्मनाने त्यांची भेट होत असते आणि असे बिनतारी संदेश ते एकमेकाला पोहोचवत असतात. त्रिकालज्ञानी बाबा याच कोटीतले परमोच्च सत्पुरुष होते. त्यामुळे हे सर्व जाणण्यास ते समर्थ होतेच. संतांची भाषा, त्यांचे संकेत आणि त्यांचे गूढ, विलक्षण हावभाव आपल्यासारख्या क्षुद्र जीवांना समजणे सहज शक्य होईल काय!

असो. वरील उदाहरणाप्रमाणेच आणखी एक उदाहरण श्री साईसचरिताच्या ५१ व्या अध्यायात आढळते. संसारीजनांप्रमाणे संतही आपले बंधुप्रेम व्यक्त करीत असतात आणि त्यातूनच संसारीजनांना पारमार्थिक धडे किंवा शिकवण देत असतात. काहीही न सांगतासवरतादेखील एका संताला दुसऱ्या संताची भाषा, खूण, संकेत कसे समजतात, ते आता पाहू या. बाबांचे एक समकालीन संत श्रीमत्परमहंस परिव्राजिकाचार्य **'श्री वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबेस्वामी'** यांची कीर्ति ऐकून मराठवाड्यातील नांदेड या शहरातील प्रसिद्ध वकील श्री. पुंडलिकराव व काही मंडळी त्यांच्या दर्शनास निघाली. प्रातःकाळी गोदावरीच्या काठी त्यांना महाराजांचे दर्शन झाले. त्यांनी मोठ्या सद्भावाने त्यांना साष्टांग प्रणिपात केला. सहज कुशलवार्ता चालू असताना शिरडीची गोष्ट निघाली. साईबाबांचे नाव कानी पडताच महाराजांनी हात जोडून नमस्कार केला आणि म्हणाले,

**''आमचे ते निष्काम बंधू आहेत. आम्हाला त्यांच्याविषयी निस्सीम प्रेम आहे.''** असा आदरभाव व्यक्त करून त्यांनी तेथील एक श्रीफळ घेऊन पुंडलिकरावांजवळ दिले व म्हणाले,

**''तुम्ही शिरडीला जाल, तेव्हा आमच्या बंधूंच्या चरणकमळांना वंदन करून त्यांना हे अर्पण करा! त्यांना आमचा नमस्कार सांगा! म्हणा की या दीनावर कृपा असू द्या, त्याचा विसर पडू देऊ नका आणि प्रेम सतत वृद्धिंगत होऊ द्या! आठवण ठेवून हे श्रीफळ माझ्या बंधूला आदरपूर्वक अर्पण करा! आम्ही (स्वामींनी) कोणाला नमस्कार करू नये, असे आम्हाला बंधन असले तरी त्या नियमाचे वेळप्रसंगी उल्लंघन करणे कल्याणकारी असते.''**

महाराजांचे हे बोलणे ऐकून पुंडलिकरावांनी ते वचन पूर्णपणे अंमलात आणण्याचे त्यांना आश्वासन दिले. पुढे महिनाही संपला नाही तोच त्यांना बरोबर चार मित्र घेऊन शिरडीस जाण्याचा योग आला. सर्व सामान आणि मुख्य म्हणजे आठवणीने नारळ घेतला व आनंदाने प्रवासास निघाले. पुढे मनमाड स्टेशनवर

तहान लागल्याने आणि कोपरगावला जाणाऱ्या गाडीला अवकाश असल्याने ते एका नाल्यावर गेले. अनशेपोटी पाणी पिऊन प्रकृती बिघडेल म्हणून कोणीतरी आणलेल्या चिवड्याचा आस्वाद घ्यायला त्यांनी सुरुवात केली. चिवडा फार तिखट लागल्याने एकाला चिवड्यात नारळ फोडून त्याचे खोबरे त्यात मिसळवून खाण्याची युक्ती सुचली. नारळ म्हणताच नारळ काढला आणि फोडला. चिवडा अधिक रूचकर लागला. नारळ कोणाचा हा विचार त्यावेळी कोणालाच सुचला नाही. पुढे कोपरगावच्या गाडीत बसल्यावर पुंडलिकरावांना नारळाची आठवण झाली आणि आपल्या हातून फार मोठी चूक झाली, हे लक्षात येऊन ते फार घाबरले, स्वत:ला दूषणे देऊ लागले, आपल्या हातून संतांचा अपमान झाला म्हणून खिन्न झाले. पुढे बाबांचे दर्शन घेताच बाबा त्यांना म्हणाले,

**''माझ्या बंधूकडून आणलेली माझी वस्तू आण!''**

पुंडलिकरावांनी बाबांचे चरण पकडले व म्हणाले,

''अजाणतेपणी माझ्याकडून घोर अपराध घडला आहे. मी महान अपराधी आहे. हे पाप फेडण्याचा काही उपाय असेल का?''

त्यावर बाबा हसून म्हणाले,

**''व्यवस्थित ठेवता येत नव्हता तर हा नारळ हातात घेतलास कशाला? तुम्ही माझी वस्तू मला न चुकता द्याल, असे वाटून माझ्या बंधूने तुमच्यावर विश्वास ठेवला. आता इतर कितीही दिले तरी त्या श्रीफळाची बरोबरी होणे शक्य नाही. घडावयाचे ते घडून गेले. स्वामींनी जो नारळ दिला ती माझीच इच्छा होती आणि तो माझ्या इच्छेमुळेच फुटला. तेव्हा, कर्तेपणाचा अभिमान विनाकारण तू कशाला धरतोस? कोणत्याही गोष्टीचे कर्तृत्व किंवा कर्तेपणा माझ्याकडे नाही, असे मनात आण! निरहंकारी वृत्ती ठेव! म्हणजे सगळी उपाधी चुकेल.''**

श्री वासुदेवानंद सरस्वतींनी श्री साईबाबांच्या संदर्भात श्री बाबांचे एक थोर परमभक्त श्री. सगुण मेरू नाईक (यांनी बाबांच्या आज्ञेवरून शिरडीत खानावळ सुरू केली होती. ते गोव्याचे रहाणारे होते. श्री बाबांच्या वेळेस ते शिरडीस आले व तेथेच त्यांनी मग कायमचे वास्तव्य केले.) यांना एक अप्रतिम अनुभव दिला होता. ते १७-१८ वर्षांचे असताना काहीतरी कामधंदा करून नाव मिळवावे, या उद्देश्याने घर सोडून बेळगावास आले. तेथे बाळकुंद्री दत्तोपंत महाराज या सत्पुरुषाची भेट होऊन धार्मिक प्रवृत्ती बळावल्याने फिरत फिरत नरसोबाच्या वाडीस आले. तेथे टेंबेस्वामींची गाठ पडली. ते त्यांना नेहमी म्हणत,

''अरे, तुला कोणी बोलावं! तू तर मोठ्या दरबारचा माणूस आहेस.'' सगुण मेरूंना मात्र त्यावेळी 'मोठ्या दरबारची' ही गूढ भाषा काही उमगली नाही. पुढे अनेक तीर्थयात्रा करीत ते २-३ वर्षांनी हैद्राबादेस आले. त्यावेळेस एका फौजदारामार्फत त्यांची एका साईभक्त सावकाराशी ओळख होऊन ते शिरडीस आले. त्यांना पाहाताच बाबांनी कानडीत नेहमीप्रमाणे गूढ भाषेत विचारले,

**''कुठून आलास? कुठे जायचे? पुढे काय करायचे?''**

बाबा काय म्हणाले याचा उलगडा काही सगुण मेरूंना होईना. पुढे ४-५ दिवसांनी बाबांनी त्यांना काही पूर्वी घडलेल्या घटनांच्या खुणा पटवून दिल्या आणि म्हणाले,

**''अरे, असा वेड्यासारखा पहातोस काय माझ्याकडे! आपले आईबाप इथेच आहेत. तेव्हा आपण इथेच रहाणार बरं का! तू मला सांभाळ! मी तुला सांभाळीन.''** हे ऐकून मेरू नाईकांना टेंबेमहाराजांच्या शब्दांची आठवण झाली आणि संतांच्या सर्वव्यापकत्वाची व त्यांच्या देवत्वाची खात्री पटली.

'प्रसाद' मासिकाच्या 'श्री साईबाबा विशेषांक, ऑगस्ट १९७९' मध्ये 'असे घडले ज्यांना साईदर्शन' या मथळ्याखाली श्री साईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि त्यांच्या कृपेचा अनुभव घेतलेल्या काही वयोवृद्ध व्यक्तींच्या मुलाखती प्रसिद्ध झाल्या होत्या. श्री. डी. के. जोगळेकर, मुंबई हे त्यापैकीच एक. (ईश्वरकृपेने त्यांना अत्युत्तम आयुष्य लाभले. ऑगस्ट ७९ मध्ये त्यांना १०० वर्षे पूर्ण होऊन १०१व्या वर्षात पदार्पण करण्याचं भाग्य त्यांना लाभलं.) त्यांनी सांगितलेल्या स्वानुभवावरूनही श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या आणि श्री साईबाबांच्या अत्युच्च कोटीतील बंधुप्रेमाची साक्ष पटते. ते म्हणतात....

''इ.स. १९१४ मध्ये परमहंस श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी यांनी आपला देह गरूडेश्वरला नर्मदाजलात विसर्जित केला. त्या सुमारास योगायोगाने मी गरूडेश्वर येथे होतो. श्री स्वामींच्या ठायी माझी निष्ठा होती. त्यांना मी विचारले,

''स्वामीजी, अपल्या महाप्रयाणाबरोबर आमचा चालता-बोलता आसरा, आमचा आधारच नाहीसा होणार; मग आपल्या पश्चात मार्गदर्शनासाठी आम्ही कोणाकडे जावे?'' त्यावर स्वामीजी उद्गारले,

''शिरडीला आमचे बंधू आहेत, त्यांच्याकडे जावे''

श्री साईसच्चरिताच्या ११ व्या अध्यायात संतासंतांच्या एकात्मतेचे एक उत्तम उदाहरण आले आहे. डॉ. पंडित या तात्यासाहेब नूलकरांच्या स्नेह्याने त्यांचे गुरु धोपेश्वरीचे रघुनाथ सिद्ध उर्फ काका पुराणिक समजून बाबांची त्यांच्या कपाळावर त्रिपुंड्र रेखून पूजा केली. कारण बाबांच्या रूपात त्यांनी त्यांचा गुरुच पाहिले. म्हणून बाबांना ही लीला दाखवावी लागली. बाबा तेव्हा दादा केळकरांना म्हणाले,

''आणि केले मज तेणे.''

श्री साईसच्चरिताच्या १२ व्या अध्यायात असलेली कर्मठ मुळेशास्त्रींना बाबांनी दिलेला 'संत घोलप महाराज' यांच्या दर्शनाची गोष्ट काय किंवा अध्याय २१ मध्ये आलेला 'पीर मौलाना साब' आणि अध्याय ४१ मध्ये आलेला 'बाबा अब्दुल रहिमान' यांचा उल्लेख काय किंवा एके दिवशी माधवरावांकडे (शामा) बोलताना 'क्षिणेस असलेले सोन्याचे झाड' म्हणून केलेला 'बाबा ताजुद्दीन' यांचा उल्लेख बाबांचा ह्या सर्वसंतांशी असलेल्या 'अदृश्य' आणि अलौकिक संबंधांचीच ग्वाही देतो.

थोडक्यात, सर्व संत हे महान, थोर, अंतर्ज्ञानी, दुसऱ्याच्या मनातील गुप्त गोष्ट जाणू शकण्याचे दिव्य, अलौकिक दृष्टी

असलेले, असे असतात. ते शुद्ध-बुद्ध-मुक्त स्वरूपाचे असतात. या ब्रह्माण्डात ते स्वैर संचार करू शकतात. त्यांच्यापासून लपविण्यासारखे या जगात काहीही नसते. त्यांच्या भव्य कृतीतून आणि दिव्य वाणीतून ते भक्तांना सतत पारमार्थिक शिक्षण देत असतात.

श्री साईसच्चरितात उल्लेखिलेल्या वरील साधुसंतांव्यतिरिक्त आणखी काही तत्कालीन संतांविषयी बाबांच्या संदर्भात काही माहिती उपलब्ध आहे.

बाबांचे समकालीन **'श्री रामानंद बीडकर महाराज'** यांचे नाव या संदर्भात प्रामुख्याने घ्यावे लागेल. बाबांच्या प्राथमिक काळात साईबाबांची ज्यांना पारख होती अशा साधुसंतांपैकी पुण्याचे बीडकर महाराज हे एक होत. बीडकर महाराज हे श्री अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थ महाराजांचे सच्छिष्य होते. त्यांनी १८७३ मध्ये साईबाबांची भेट घेतली, असे बीडकर महाराजांनी त्यांचे भक्त श्री. काशीनाथ खंडेराव गर्दे, सबजज्ञ यांना सांगितल्याचे श्री. गर्दे यांनी श्री नरसिंहस्वामी, मद्रास यांना दिलेल्या निवेदनात म्हटलेले आहे.

**'श्री संत राममारूती महाराज'** नावाचे लोकोत्तर पुरुष हेही श्री साईबाबांचे समकालीन होते. त्यांचे वास्तव्य मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी येथे असे. हे नाथपंथी होते. ते बाबांना गुरुवत् पूज्य मानीत व

''बालमुकुंदस्वामी हे आमचे गुरु खरे; पण बाबा हे आम्हाला आदिनाथाच्या ठिकाणी होत'', असे वारंवार बोलून दाखवीत असत. श्री राममारूती महाराज अगदी लहानपणी बाबांना भेटले होते. पुढे १९१० साली ह्या उभयतांची पुन्हा शिरडी येथे भेट झाली आणि या संतसमागमाचा अप्रतिम सोहळा लोकांना प्रत्यक्ष अनुभवण्याचे भाग्य त्यानंतर कित्येकदा प्राप्त झाले. ते येणार, हे आधीच ओळखून बाबा

**''अरे, उद्या माझी दिवाळी आहे रे! अरे, उद्या माझा सोन्याचा दिवस आहे रे!''** असे वारंवार म्हणून जणू आनंदाने नाचले होते. (या भेटीचे सविस्तर वर्णन 'श्री साईलीला'च्या जुलै-ऑगस्ट, १९९३ च्या अंकात पान २१ वर आलेले आहे.)

याप्रमाणे श्री राममारूती महाराज शिरडीस त्या खेपेस चौदा दिवस राहिले. आरतीनंतर सर्व मंडळी घरोघर गेली. महाराजांनी बाबांसाठी शिऱ्याचा नैवेद्य व्हावा, असा आदेश दिला. तो बनवून बाबांपुढे आणण्यास थोडा वेळ लागला. तोपर्यंत गावातील लोकांनी नैवेद्य आणून तयार ठेवले. अर्पण करण्यास प्रारंभ होणार, तोच बाबांनी सांगितले,

**''थांबा, आधी माझ्या राममारुतीनाथांचा नैवेद्य येऊ द्या! मग सर्व नैवेद्य होऊ द्या!''**

बाबांनी स्वतःच त्यांना 'नाथ' या उच्चाराने संबोधिले. नंतर त्यांचा नैवेद्य येताच प्रथम बाबांनी तो मोठ्या प्रेमाने ग्रहण केला. त्यानंतर त्या वास्तव्यात त्यांचे एकत्र बसणे, बोलणे, फिरणे मोठ्या प्रेमाने झाले. चावडीच्या मिरवणुकीच्या वेळी बाबांनी त्यांना मोठ्या प्रेमाने हातात हात घालून नेले. अशाप्रकारे महाराजांना चांगले चौदा दिवस आग्रहाने ठेवून घेतल्यावरच बाबांनी त्यांना परत जाण्यास परवानगी दिली.

१९११-१२ साली डिसेंबर व जानेवारी महिन्यातील काही दिवस महाराजांचे वास्तव्य शिरडीस होते. श्री. दादासाहेब खापर्डेंच्या 'शिरडी डायरी'मध्ये याचा उल्लेख आहे. १९ डिसेंबरच्या रोजनिशीत....

''दुपारी राममारुती बाबा आले. भजनाच्या वेळी ते नृत्य करीत व उड्याही मारीत असत,'' असे नमूद केलेले आहे. श्री. खापर्डे, श्री. बापूसाहेब जोग, उपासनी बाबा व श्री राममारुती महाराज मिळून 'योगवशिष्ठ', तसेच 'परमामृत' वाचत असल्याचा उल्लेखही वरचेवर आला आहे. त्या वर्षीच्या संक्रांतीलाही महाराज शिरडीतच होते. १८ जानेवारीच्या रोजनिशीत श्री. खापर्डे लिहितात....

''आज राममारुती बाबांना साईबाबांनी वर उचलले. राममारुती बाबांनी नंतर जाहीर केले की त्यांना त्यावेळेस अंतराळात असल्यासारखे वाटले व परमानंद झाला.''

आता, श्री बाबांचे एक जुने परमभक्त सगुण मेरू नाईकांना आलेला एक सुंदर अनुभव पाहू या. 'श्री संत साईमहाराजांचे चरित्र' या पुस्तकात लेखक श्री. कवडे यांनी तो अनुभव उद्धृत केला आहे. ते म्हणतात....

''सगुणरावांच्या खानावळीत ग्वाल्हेरचे एक सरदार उतरले होते. सगुणराव त्यांच्याबरोबर द्वारकामाईत गेले. सगुणरावांना पहाताच बाबा संतापून म्हणाले,

**''फुकटचा कारभार करण्यासाठी फिरतोस! कोणी उपाशी आहे की काय, हे पहात नाहीस.''** हे ऐकून सगुणराव द्वारकामाईतून निघाले. त्या काळी दीक्षितवाड्यात यात्रेकरू उतरत, तेथे ते तपासासाठी गेले. त्यावेळी कल्याणचे प्रसिद्ध साधु राममारुती हे श्री बाबांच्या भेटीसाठी आले होते. त्यांनी सगुणरावांना पहाताच ''राममारुती!'' ''राममारुती!'' म्हणून उड्या मारण्यास सुरुवात केली. त्यांच्याबरोबर काही माणसे होती. सगुणरावांनी त्यांची चौकशी केली असता त्यांनी सांगितले,

''आम्ही काल रात्रीपासून उपाशी आहोत.''

सगुणरावांनी त्यांची सर्व व्यवस्था केली.

यावरून श्री साईबाबा आणि श्री राममारुती महाराज यांच्या आत्यंतिक प्रेमसंबंधाची कल्पना येऊ शकेल. आश्चर्याची गोष्ट ही की ह्या दोन संतांनी अवघ्या काही दिवसांच्या अंतराने जगाचा निरोप घेतला. श्री साईबाबांनी १५ ऑक्टोबर, १९१८ रोजी समाधी घेतली, तर श्री राममारुती महाराजांनी त्याअगोदरच काही दिवस, म्हणजे २८ सप्टेंबर, १९१८ रोजी भक्तांचा निरोप घेतला.

श्री साईबाबांचे समकालीन असे आणखी कितीतरी साधुसंत होते की ज्यांची प्रत्यक्ष भेट कदाचित त्यांच्या भक्तगणांना पहायची आणि अनुभवायची संधी मिळाली नसेल; पण त्यांच्या बंधुत्वाच्या नात्याचा अनुभव त्यांना कोणत्या ना कोणत्यातरी रीतीने जरूर आला होता आणि त्यांनी तो अनुभवलाही होता.

उदाहरणार्थ, श्री. दादासाहेब खापर्डे आपल्या डायरीत तारीख १०-१२-१९११ च्या रोजनिशीत लिहितात....

''नरसोबाच्या वाडीहून गोखले नावाचे

कोणी गृहस्थ आले आहेत. ते म्हणतात की त्यांना **'केडगावचे नारायण महाराज'** व साईमहाराज यांना भेटण्याची आज्ञा झाली आहे.''

तसेच, स्वत: श्री. दादासाहेब खापर्डे शिरडीस येण्यापूर्वी केडगावचे नारायण महाराज यांच्याकडे दर्शनासाठी व आशीर्वाद घेण्यासाठी बऱ्याच वेळा जात असत. त्यांची खापर्डेंवर फार मर्जी होती. महाराजांनी स्वत:च्या गळ्यातील माळ काढून त्यांच्या गळ्यात घातली होती. १७ नोव्हेंबर, १९११ रोजी, म्हणजे ते शिरडीस जाऊ लागल्यावर (श्री. खापर्डे प्रथम ५-१२-१९१० मध्ये शिरडीस गेले होते.) नारायण महाराजांनी त्यांना स्वहस्ते प्रसाद दिला व भोजनालाही जवळ बसवून घेतले. श्री. खापर्डे आपल्या रोजनिशीत लिहितात....

''माझ्या आनंदाला सीमाच उरली नाही.''

श्री. दादासाहेब खापर्डे जरी पुढे श्री साईबाबांचे भक्त बनले तरी नारायण महाराजांवरही त्यांची फार श्रद्धा होती. श्री. खापर्डे मोठे पुण्यवान गृहस्थ होते. साईबाबा आणि नारायण महाराज ह्या दोन्ही संतांच्या दरबारात त्यांना कायम मानाचे स्थान राहिले आणि ह्या दोन्ही संतांनी त्यांना आपल्या प्रेमाचे उत्कट अनुभव दिले.

केडगावच्या नारायण महाराजांच्या संदर्भात घडलेली आणखी एक सुंदर गोष्ट, जिचा संबंध श्री साईबाबांशी किती सुंदररीतीने आला, ती ('श्री साईलीला', जुलै-ऑगस्ट, १९९३) नुकतीच आपण वाचली असेलच. या अनुभवातून श्री. माधवराव देशपांडे आणि इतर भक्त यांना बाबांनी किती अप्रतिम पारमार्थिक धडा दिला, हे आपल्या लक्षात येते.

शेगावचे गजानन महाराजही साईबाबांचे समकालीन संत. या दिव्य सत्पुरुषाची साईबाबांशी कधी प्रत्यक्ष भेट झाल्याचे ऐकिवात किंवा वाचनात नाही; पण 'श्री गजानन विजय' या श्री दासगणू महाराजांनी लिहिलेल्या गजानन महाराजांच्या पोथीमध्ये अभिप्राय लिहिताना श्री. दादासाहेब खापर्डेंचे सर्वात ज्येष्ठ पुत्र श्री. बाबासाहेब खापर्डे म्हणतात....

''श्री साईबाबांची व महाराजांची वृत्ती समसमान होती, हे वरवर पहाणाऱ्यासही पटण्यासारखे होते. ते उभयता एकमेकांस अंत:साक्षीने ओळखीत असत, असे मानण्यास जागा आहे. जे दिवशी शेगावी महाराजांनी देह ठेविला, ते दिवशी साईबाबा दिवसभर शोक करीत होते. ज्या क्षणी श्री गजानन महाराजांचे देहावसान झाले त्यावेळी श्री साईबाबा गडाबडा लोळले आणि माझा जीव चालला – मोठा जीव चालला, असे विव्हळून अनेकवार ओरडले, असे आमचे वडील सांगत असत. त्यांचे म्हणणे असेही होते की श्री गजानन महाराजांनी आपल्या परिवाराचे सर्व कल्याण देहत्याग करताना साईबाबांवर सोपविले म्हणून त्यानंतर तेव्हापासून ते स्वत: व आमच्या मातोश्री उभयतां श्री साईबाबांना गुरुस्थानी मानू लागले. अर्थात्, हा अंशत: श्रद्धेचाही प्रश्न असेल.''

वरील प्रसंग श्री दासगणू महाराजांच्या चरित्रातही आला आहे.

डहाणूचे एक अध्यात्मात अधिकार प्राप्त झालेले श्री. उद्धवेशबुवा यांना श्री साईबाबांकडे येण्याआधी ''माझा मोक्षगुरु मला कोठे व केव्हा भेटेल'', असा ध्यास लागला होता. एकदा ते व इतर मंडळी श्रीक्षेत्र रामेश्वर यात्रेस १९०४ साली वऱ्हाडातून पाय-रस्त्याने जात असता शेगावी परमहंस गजानन महाराजांचे दर्शन झाले. वरील प्रश्नावर त्यांच्या मुखातून पुढीलप्रमाणे वाणी निघाली....

''तुझा गुरु दक्षिण दिशेसच भेटेल.''

त्यानंतर पुढे त्यांची **हरिहर बुवांशी** 'शिवली' या गावी गाठ पडली. ते साधु मौन-व्रती 'हरिहर' या नावाशिवाय दुसरे शब्दच मुखावाटे काढीत नसत. त्यांना उद्धवेशबुवांनी पुन्हा तोच प्रश्न केला. त्यांनी खुणेने सांगितले....

''पश्चिम दिशा. लांब गेले की अशाच नावाचे गांवी.''

थोडक्यात, संत हे त्रिकालज्ञानी असतात आणि एकमेकांस ते अंत:साक्षीने ओळखत असतात.

श्री साईबाबांचे जुने आणि एक श्रेष्ठ परमभक्त कै. श्री. नानासाहेब चांदोरकरांना बाबांनी **पद्मालय महाराजांच्या** संदर्भात किती अप्रतिम अनुभव दिला तो आता येथे पाहू या. पूर्व खानदेशात पाचोऱ्यापासून ८-१० मैलावर 'पद्मालय' म्हणून एक रम्य स्थान आहे. तेथे गोविंदबुवा उर्फ पद्मालय महाराजांनी एक सुंदर गणपतीचे मंदिर बांधलेले असून त्यावर शंभर तोळे सोन्याचा कळस चढविलेला आहे. नानासाहेब खानदेशात दुसऱ्या एका तालुक्याचे मामलेदार होते. तेथून पाचोऱ्याला जाऊन पद्मालयापर्यंत जाणार म्हणून पाचोऱ्याच्या मामलेदारास टांगेवाल्याची सोय करण्यास सांगितले. नानासाहेब निघाले खरे, पण त्यांची गाडी चुकली व त्यामुळे नानासाहेब व त्यांच्याबरोबरची इतर मंडळी दुपारी पोहोचण्याऐवजी संध्याकाळी पोहोचली. तोपर्यंत टांगेवाला ह्या मंडळींची वाट पाहून निघून गेला होता. पायी चालण्याखेरीज गत्यंतर नसल्याने सर्व मंडळी चालत निघाली. रस्ता अत्यंत खराब व जंगलातील आडरस्ता होता आणि ८-१० मैल इतके चालण्याची सवयही नानासाहेबांस नव्हती. त्यांना याचा फार त्रास होऊ लागला. शिवाय, दुसरी अडचण अशी होती की गोविंदबुवा दिवसभर देवळात राहून पूजा-अर्चा करून येणाऱ्या-जाणाऱ्यांची जेवणाखाण्याची सोय करीत असत आणि रात्री दहा वाजल्यावर देवालयापासून काही अंतरावर असलेल्या आपल्या मठीत विश्रांतीसाठी जात असत. दहानंतर ही मंडळी थकूनभागून पोहचणार आणि तेव्हा त्यांची जेवणाखाण्याची सोय कशी होणार, याची त्या मंडळींना मोठी काळजी वाटू लागली. चालून चालून नानासाहेब खूपच थकले. थोडा वेळ चालावे, मध्येच विश्रांतीसाठी उभे रहावे, बसावे असा क्रम चालू होता. मध्येच एके ठिकाणी त्यांना काय वाटले कोणास ठाऊक, त्यांनी बाबांचा धावा केला....

''बाबा, आता मला जेवणखाण मिळाले नाही तरी चालेल; पण एक गडवाभर चहा मिळाला, तर काम भागेल.'' पण चहाची वर्दी त्या महाराजांना कोण पुरवणार, असे कोडे त्यांना पडले. शेवटी बाबांवर भार सोपवून सर्व मंडळी रात्री दहानंतर पद्मालयी पोहोचली. मंदिराशी येतात न येतात तोच बुवा हातात चहाचा तांब्या घेऊन उभे!

''नाना आलास काय'', असे म्हणून त्यांनी नानांचे स्वागत केले. नाना म्हणाले,

''होय महाराज! पण आपण यावेळी इथे कसे?''

तेव्हा गोविंदबुवा म्हणाले,

''अरे, **नाना फार लांबून पायी चालत येत असल्यामुळे तो अतिशय थकला आहे, त्याला फार भूक लागली आहे, त्याच्याकरिता एक मोठा तांब्याभर चहा तयार करून ठेव!** असा आत्ताच बाबांकडून मला बिनतारी संदेश आला आहे. म्हणून मी तुझ्याकरिता चहा घेऊन आलो आहे.''

बाबांचे ते अंतर्साक्षित्व आणि भक्तांविषयीची कळकळ पाहून नानासाहेबांचे नेत्र पाझरू लागले.

श्री साईबाबांच्या अंतर्साक्षित्वाची आणि सर्वव्यापकत्वाची प्रचिती नानासाहेबांना बाबांनी अनेकदा दिली. **बन्नुमाईचे दर्शन** ही त्यातलीच एक होय! नगर जिल्ह्यात 'बोधेगाव' म्हणून एक खेडेगाव आहे. तेथे बन्नुमाई नावाची एक यवन जातीची महासाध्वी, महाविरक्त आणि ज्ञानी व मोठ्या अधिकाराची कुमारिका रहात होती. ती बहुतेक गावात घरी आपल्या एकट्या आईच्या सोबतीने न रहाता जंगलात झाडाझुडपात रहात असे व तिला कोणी पहावयास, भेटावयास गेल्यास ती निवडुंगाच्या झुडपातून वाऱ्यासारखी धावत सुटे. त्यावेळी तिच्या अंगात पुष्कळ काटे टोचत असत. त्याची तिला दादही नसे. तिची आई क्वचित तिला भेटण्यासाठी येई. गावचे लोक तिला वेडीच समजत. अशा साध्वीचे दर्शन घ्यावे, अशी नानासाहेबांस प्रबळ लालसा झाली; पण तिचे दर्शन अशक्य कोटीतले, म्हणून त्यांनी ही गोष्ट बाबांच्या कानावर घातली व बाबा सांगतील तसे करावे, असे ठरविले. बाबा त्यांना म्हणाले,

**''तुला आता कोणाचे दर्शन कशास घ्यावयास पाहिजे? येथे सर्वकाही नाही का?''** तरी, नानांचा आग्रह पाहून बाबा म्हणाले,

**''दर्शन होईल, जा!''**

नाना आनंदाने निघाले. त्यांनी बोधेगावला जाण्यासाठी आपला सल्लागार बाबा खरवंडीकर यास तयारी करण्यास सांगितले. पाट, रांगोळीचे सामान, लुगडे, स्नानाचे सामान, कुंकू, मंगळसूत्र इत्यादी सामान घेऊन नाना खरवंडीकरासहित ते बोधेगावात आले. बन्नुमाई जंगलात आहे, असे कळल्यावरून शोध घेत घेत ते गावाबाहेर येऊन काटेरी अरण्यात धावू लागले. बराच वेळ झाला तरी दर्शन नाही. नानासाहेब थकले, निराश झाले. त्यांनी बाबांचे स्मरण केले आणि म्हणाले,

''दर्शन व्हावयाचे नव्हते, तर ''दर्शन होईल, जा'', असे का सांगितले? दर्शन झाल्याशिवाय मी येथून हलणार नाही'', असे म्हणून डोळे उघडतात, तोच बन्नुमाई दिगंबर अवस्थेत नानासाहेबांपुढे उभ्या! त्यांना फार आनंद झाला. त्यांनी तिला वंदन करून तिच्या अंगात शिरलेले काटे काढण्यास सुरूवात केली, तोच त्या वाऱ्यासारख्या पसार झाल्या. नानासाहेब थोडे खिन्न झाले. त्यांनी खरवंडीकरांना सांगितले,

''येथेच राहुटी ठोका! कनाती लावा! पाणी तापवा! राहुटीचे आत पाट मांडून भोवती रांगोळ्या काढा! स्नानाची तयारी ठेवा!''

खरवंडीकरांनी सर्व तयारी करण्यास सुरूवात केली, तो त्यात चोळी तेवढी कमी आहे, असे दिसून आले. इतक्यात, त्या गावचा बाजार आटोपून एक शिंपी घोड्यावरून परत आपल्या गावी जात असताना दिसला. त्याच्यापाशी चोळीही मिळून सर्व तयारी झाली. नानासाहेबांनी मग क्षणभर डोळे मिटून बाबांचे स्मरण केले व त्यांची करूणा भाकली आणि डोळे उघडून पहातात, तो काय चमत्कार! बन्नुमाई राहुटीत मांडलेल्या पाटावर स्नानाकरिता उभ्या! त्यांना अत्यानंद झाला. त्यांनी तिच्या अंगातील काटे काढले, सुगंधी तेल व उटणे लावून अभ्यंगस्नान घातले, तिचे अंग स्वच्छ पुसून चोळी-लुगडे नेसवले, तिची वेणी घातली, मंगळसूत्र घातले, कुंकू लावले व नंतर तिची पूजा करून हातावर नैवेद्य ठेवून तिला वंदन केले आणि दक्षिणा दिली. इतके होते न होते, तोच बन्नुमाईंनी ह्या सर्व वस्तूंचा त्याग करून जंगलात वायुवेगाने प्रयाण केले. लगेच ही बातमी गावात पसरली आणि बन्नुमाईंच्या आईने नानांवर बालीश घाणेरडे आरोप करून शिव्या देण्यास सुरूवात केली. नानासाहेबांनी तिला खूप समजावले आणि खरी वस्तुस्थिती सांगितली; तरी ती ऐकेना. शेवटी, बन्नुमाईच्या पूजेचे सर्व सामान तिला घरी घेऊन जाण्यास सांगितल्यावर तिचा राग शांत झाला. त्यानंतर नानासाहेब देवळात आपल्या मुक्कामी परत आले. पहाटेस परत जाण्याच्या वेळी बन्नुमाईंचे दर्शन पुन्हा कसे होईल, या विचारात ते गादीवर पडले. त्या रात्री बन्नुमाई आपल्या मातोश्रींकडे निजावयास आल्या. पहाटे ४-५ वाजता नानासाहेब जागे होऊन पहातात, तो बन्नुमाई आपल्या उशाशी बसलेल्या त्यांना आढळल्या. हे पाहून त्यांना बाबांच्या लीलेचे कौतुक वाटून परम आश्चर्य व परमानंद झाला. त्यावेळी त्यांनी पुन्हा बन्नुमाईंच्या चरणांवर डोके ठेवून वंदन केले. इतके होते न होते, तोच बन्नुमाई पुन्हा पसार झाल्या. बन्नुमाईंची आई म्हणून नानासाहेबांनी बन्नुमाईच्या आईची द्रव्यदानाने संभावना केली व तीही समाधानाने घरी गेली.

श्री दासगणू महाराजांच्या श्री संतलीलामृतात या महासाध्वी यवनजातीतील कुमारिका बन्नुमाई यांचा उल्लेख आहे.

श्री साईबाबांच्या प्रत्यक्ष सान्निध्यात आलेल्या, परंतु सामान्यजनांना अज्ञात राहिलेल्या अशा एका थोर विभूतीचा उल्लेख करणे येथे अपरिहार्य ठरते. ती महान व्यक्ती म्हणजे **'संत भाऊराव कुंभार'** हे होत. हे शिरडीत रस्ते झाडण्याचे काम करीत. हे गुप्त संत होते. ते पूर्ण विरक्त व अपरिग्रही होते. त्यांची वृत्ती निरिच्छ व वैराग्यशील होती. ते उत्सवाच्या वेळी कधीतरी भोजनास येत. मनात आल्यास अन्न, कपडा किंवा दक्षिणा मागत. कोणी दिल्यास घेतच असे नसे. दिलेल्या वस्तू किंवा पदार्थ स्वीकारीत आणि काही वेळ ठेवून नंतर कुत्र्यास, गाढवास, भिकाऱ्यांस वाटून टाकीत. शिरडीतील गावकऱ्यांच्या ते पूर्ण परिचयाचे होते आणि बाबांचे सर्व भक्तगण त्यांचा मान राखीत असत. ते जनलोकात 'भाऊ' किंवा 'भावड्या' या नावाने परिचित होते.

सातारचे **'श्री दादामहाराज'** (सातारकर) या थोर पुरुषाच्या व बाबांच्या भेटीचा प्रसंगही फार विलक्षण आहे. 'संतांचे अवतार' या पुस्तकात लेखक श्री. राहिकर यांनी तो फार सुंदररीतीने वर्णन केला आहे.

सन १९१३ किंवा त्या सुमाराची गोष्ट आहे. श्री दादामहाराज काही मंडळींसह बाबांच्या दर्शनाला गेले असता तेथील धुनीतील राख घेऊन ती साईमहाराजांनी सर्वांगाला लावली व ''तुझा परमार्थ सांग होईल'', असा आशीर्वाद दिला. त्यानंतर श्री साईबाबा व ते परमार्थाच्या गोष्टी बोलत बसले. इतक्यात एक महत्त्वाची गोष्ट घडली. एक भिकारीण बाबांपुढे येऊन उभी राहिली आणि ''बाबा, मला अंग झाकण्यास वस्त्र द्या! माझा धनी परदेशी आहे. मला मदत करा!'' असे काकुळतीला येऊन म्हणत होती. ते बोलणे ऐकून साईमहाराज म्हणाले,

**''बाई, तू भाग्यवान आहेस. तुझा मालक तुला परत येऊन भेटेल; पण माझा मालक अखंड माझ्याजवळ असूनही माझी पूसतपास करीत नाही की अंगाला एखादे फडकेही देत नाही. त्याने माझ्याशी बोलावे म्हणून त्याची मी अखंड विनवणी करतो; पण तो एक शब्दही प्रेमाचा बोलत नाही. माझा 'साई' माझ्यावर एवढा का रुसला आहे?''**

हे बोलताना बाबांना गहिवरून आले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. श्री दादामहाराजांनी बाबांचे ते प्रभूविरहाचे रूप पाहिले आणि आपणालाही प्रभूचा असा वेध लागावा, अशी प्रार्थना केली.

दुसरा अनुभव श्री दासगणू महाराजांनी आपल्या चरित्रात सांगितला आहे. ते म्हणतात....

''ज्ञानेश्वरीच्या अमृतानुभवावर मी ओवीबद्ध टीका लिहिणार होतो. सातारचे दादामहाराजांनी मला सांगितले की सदरहू ग्रंथ फार कठीण आहे. आमचेजवळ राहून तो समजून घ्या आणि नंतरच टीका लिहा!''

मी हटले,

''मी टीका लिहावी, अशी बाबांची इच्छा असेल तर तेच मला बुद्धीयोग देतील. दुसऱ्याजवळ मी शिकावयास जाणार नाही.''

दादामहाराजांस हे माझे म्हणणे पटले नाही. पुढे ती टीका तयार झाल्यावर ती दादामहाराजांनी पाहिली आणि सद्गदीत होऊन ते म्हणाले,

''बाबा खरे समर्थ आहेत. त्यांची तुमच्यावर कृपा आहे. म्हणूनच अशी टीका तुमचे हातून तयार झाली. तुम्हाला दुसऱ्याच्या मदतीची जरूरी नाही.''

१९१८ साली बाबांनी आपल्या महानिर्वाणाच्या दिवसाचे, तारखेचे रहस्य आपल्या नेहमीच्याच गूढ व सांकेतिक भाषेत औरंगाबादच्या बन्नेमिया फकिराला कसे आधीच सुचवून ठेवले होते ते पाहू या. हे **'बन्नेमिया फकीर'** उच्च पातळीवर पोचलेले एक सत्पुरुष होते.

इमामभाई छोटेखान या वैजापूरला औरंगाबाद जिल्ह्यात रहाणाऱ्या गृहस्थांनी प. पू. श्री नरसिंहस्वामींना बाबांविषयीचे त्यांचे अनुभव निवेदन केले. त्यात त्यांनी असे लिहिलेले आहे....

''इ.स. १९१८ मध्ये देहत्यागाआधी काही महिन्यांपूर्वी बडेबाबांच्या 'कासीम' नावाच्या मुलाला बाबांनी कोंबडीचे जेवण दिले आणि नंतर त्याला २५० रु. देऊन ते म्हणाले,

''औरंगाबादला जा! तेथे शमसुद्दीन मियाला भेट! तेथे मौलू व कव्वाली करा! नंतर बन्नूमियाँ फकिराकडे जा! त्याला हा शेवंतीचा हार घालून सांग **नऊ दिन नऊ तारीख. अल्लामिया अपनी धूनी ले जायेगा. मर्जी अल्ला की!''** असे सांगून बाबांनी एक शेवंतीचा हार देऊन मलाही कासीमबरोबर जाण्यास सांगितले. मग, कासीमचा नोकर अमीर यास घेऊन आम्ही निघालो, ते दुपारी ३ वाजता औरंगाबादला पोहोचलो. स्टेशनवर शमसुद्दीन फकीर आला होता. मी त्याला ओळखत होतो. ''साईफकिराकडून कोण पाहुणे आले आहेत'', याची तो चौकशी करू लागला. आम्ही त्यास नमस्कार केला व बाबांनी दिलेल्या सूचना सांगितल्या. नंतर त्यांनी आम्हास घरी नेले व भोजन दिले. आम्ही २५० रु. त्यांना दिले व त्यांनी अन्नदान व कव्वालीचा कार्यक्रम पार पाडला. बन्नेमियाँचे घर मला माहीत असल्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही त्यांच्याकडे गेलो. तेव्हा ते एक हात उंचावून उभे होते. तेथील अरबी लोकांनी त्यांच्याजवळ जाऊ नका, असे आम्हाला सांगितले. एक तासभर थांबल्यावर मीच मग धीर करून शेवंतीच्या फुलांचा हार त्यांना घातला. त्यांनी उंचावलेला हात खाली केला. मी त्यांच्याकडे बाबांनी सांगितलेले शब्द उच्चारले. बन्नेमियाँ आकाशाकडे पाहू लागले व त्यांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. त्यानंतर त्यांचा निरोप घेऊन आम्ही निघालो. यानंतर चार महिन्यांनी बाबांनी देह ठेवला. तो दिवस नवव्या महिन्याची (मोहरमची) नऊ तारीख होती.''

थोडक्यात, कितीतरी संत-महंतांशी बाबांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या विलक्षण संबंध होता. संबंध कसाही येवो त्यांची अंतर्मने एकमेकांशी जुळलेली होती. एकमेकांचे ते स्मरण करीत असत. हे स्मरण म्हणजेच त्यांची एकप्रकारची प्रत्यक्ष भेट असे. एकमेकांना ते बिनतारी संदेश पाठवीत असत. अंतर्साक्षीने ते एकमेकांस ओळखीत असत. त्यांच्या मुक्त देहातून बाहेर पडलेले विचार 'तात्काळ' दुसऱ्यास सहज कळत असत.

वर उल्लेख केलेल्या संत-महंतांनी आपल्या कृतीतून, वाणीतून श्री साईबाबांचे माहात्म्य, त्या परब्रह्माची महती जगाला उघड करून सांगितली.

वरील संतांव्यतिरिक्त आणखी कितीतरी संत श्री साईबाबांच्या काळात होऊन गेले. त्यांचाही एकमेकांशी आणि अर्थात् बाबांशीही अदृश्यपणे संवाद घडत असणारच. पण आपल्यासारख्या सामान्यांना पुराव्याअभावी याचे आकलन कसे होणार!

याशिवाय आणखीही काही थोर व्यक्तींनी त्या काळी बाबांच्या सहवासात आध्यात्मिक क्षेत्रात काही विशिष्ट पातळीपर्यंत प्रगती केली होती आणि साधकाचे 'सिद्ध होणे', हेच त्यांचे अंतिम लक्ष्य होते. पुढील काळात बाबांच्या कृपाशीर्वादाने त्यातील कित्येकजणांनी आपली परमोच्च उन्नती करून घेतली. उदाहरणादाखल ठोसर स्वामी (न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या बहिणीचे पुत्र), राधाकृष्णामाई, उपासनी बाबा, श्री दासगणू महाराज, रामबाबा, हरिद्वारचे सोमदेव स्वामी, नानावल्ली, स्वामी साईशरणानंद, कै. बापूसाहेब जोग, जव्हारअली अशी काही नावे चट्कन डोळ्यासमोर येतात.

ह्या सर्वांनी बाबांच्या अलौकिकत्वाचे त्यांच्या सान्निध्यात विलक्षण अनुभव घेतले व आपले जीवन सार्थक बनवू द्यायची परमोच्च संधी, सद्भाग्य बिल्कुल दवडू दिले नाही.

---

# भक्ताला भगवंताचा साक्षात्कार का होत नाही?

–श्री. एस्. ए. कुलकर्णी
मिरज, सांगली.

''सततं कीर्तयन्तो मां
यतन्तश्च दृढव्रत:।
नमस्यन्तश्च मां भक्त्या
नित्ययुक्ता उपासते॥''

भगवान श्रीकृष्णांनी भक्तीचं अनन्यसाधारण महत्त्व वरील शब्दांमध्ये आपला प्रिय भक्त अर्जुनाला सांगितलेलं आहे. सतत भगवंताचं गुणगान करणं, तेही दृढपणे, नित्य व्रताप्रमाणे, भावपूर्णतेनं भगवंताला शरण जाणं, त्याला नमस्कार करणं यालाच 'भक्ती' हे नाव आहे. ज्ञानदेव विवरण करताना म्हणतात:

''परि तेयांपासिं पांडवा।
मी हारतला गिवसांवा।
जेथ नामघोषु बरवा।
करिति ते माझा॥''

भगवंताला शोधायचं कुठे? केवळ मंदिर-मस्जिद-चर्चमध्येच का? नाही. काही सगुण-निर्गुण उपासना करण्यासाठी मानवाने तयार केलेली ही ठिकाणें; यामध्येच भगवंत बंदिस्त असतो, असं नाही; जिथे भगवंताचा नामघोष चालू असतो, यां ना त्या स्वरूपात, तिथेच भगवंताला शोधावं लागतं. मंदिर-मस्जिद काही विशिष्ट संप्रदायी-कुळे, जाती-वर्णाच्या लोकांसाठी मर्यादित असतात; आणि त्यावरून वादविवाद, कलह, मारामाऱ्या उद्भवतात. हा इतिहास आजपर्यंत अविरत घडत आलेला आहे. खुद्द पक्षपाती मानवानेच भगवंताला पक्षपाती बनविलेलं आहे. भगवंताचं सत्य स्वरूप वेगळं आहे. तो विश्वव्यापी आहे, विश्वचक्षु आहे, विश्वपाणी आहे, विश्वपाद आहे.

''समं सर्व भूतेषु तिष्टंतं परमेश्वरम्।
विनश्यत्स्व विनश्यन्तं य:
पश्यति स पश्यति॥''

''समोऽहं सर्वभूतेषु न मे
द्वेष्योऽस्ति न प्रिय:।
ये भजन्ति तु मां भक्त्या
मयि ते तेषु चाप्यहम्॥''

असं भगवंतांनी वारंवार आवर्जून सांगितलेलं आहे. सर्व भूतमात्रांमध्ये ज्याला परमेश्वर अनुभूत होतो, तोच खरा 'डोळस'; एरव्ही सारे आंधळेच! भगवंताला कुणाचा द्वेष नाही; त्याला कुणाबद्दल विशेष प्रेम आहे असा भगवंत बिलकूल पक्षपाती नाही. ज्ञानदेव विवरण करतात:

''ते वर्तत असति देहीं।
परि ते देहीं ना माझां ठांई।
आणि मी तेयांचा हृदयीं।
समग्रु असे॥
सविस्तर वटत्व जैसे।
एका बीजकणिकामाझि असे।
आणि बीजकणिका वसें।
वटीं जेवि॥''

भक्त देहाने वावरत असतात वरवर; परंतु ते देहामध्ये स्तिमित नसतात; ते माझ्यामध्ये विलीन झालेले असतात आणि मी त्यांच्यामध्ये. प्रचंड वृक्ष असला तरी त्याचे मूळ एका बीजात असते आणि बीज त्या वृक्षामध्येच फळाच्या अंतरंगांत असते. असा हा भक्त-भगवंताचा अनोन्य संबंध आहे. ''सबका मालिक एक'' असं श्री साईबाबांचं म्हणणं होतं. याचा अर्थ हाच! श्री गजानन महाराज म्हणायचे:

''गण गण गणांत बोते''

संपूर्ण विश्व त्या एकमेव परमेश्वरावर अधिष्ठित आहे, हे ओळखा, असा त्यांचा उपदेश आहे.

'देव भावाचा भुकेला आहे' हे तत्व त्रिकालाबाधित असं सत्यस्वरूपी आहे. पूजाअर्चेच्या साधनांचं देवाला आकर्षण नाही. भगवद्गीता सांगते:

''पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या
प्रयच्छति। तदहं भक्त्युपहृतमश्नामि
प्रयतात्मन:॥''

एखादं पान, फूल, फळ किंवा पळीभर पाणी भक्तिभावाने ईश्वराला अर्पण केलं तरी पुरेसं असतं. कुठल्याही अवडंबराची त्याला अपेक्षाच नसते. ज्ञानदेव विवरण करतात:

''पैं गा भक्ति एकि मी जाणें।
तेथ सानें थोर न म्हणे।
आम्हीं भावांचे पाहुणे।
भलेतेया॥''

भगवान श्रीकृष्णाला भेटण्यासाठी सुदामा द्वारकेला गेला. मूठभर पोह्यांची पुरचुंडी त्यानं आपल्याबरोबर नेली होती. ती पुरचुंडी घाईघाईने सोडून श्रीकृष्णाने ते मूठभर पोहे किती आतुरतेनं, किती अप्रूपीनं मटामट मुखात घातले! या साध्या घटनेमध्ये केवढा अर्थ आहे! दुर्योधनाने पंचपक्वान्नांचे जेवण तयार करून श्रीकृष्णाला आमंत्रित केले; ते सारं सोडून भगवान विदुराघरच्या कण्या खाण्यासाठी धावून गेले. श्री रामाने शबरीची उष्टी बोरे किती आवडीने खाल्ली!

''आत्मज्ञानी चोखडी।
संत माझी रूपडी।''

या ज्ञानदेवांच्या विवरणानुसार संत-सत्पुरुष भगवंताचीच रूपं असतात. या तत्वाला अनुसरूनच श्री साईबाबांना माळिणीनं आणलेलं जेवण खूप आवडायचं. पंचपक्वानांची ताटं सोडून श्री गजानन महाराज त्र्यंबकाच्या शिदोरीची वाट पहात बसले; शिदोरीत होतं काय? भाकरी, पिठलं, अंबाडयाची भाजी! आई आपल्या बाळाच्या अंगावर भरजरी कपडे घालते, नानाप्रकारचे सोन्या-चांदीचे अलंकार घालते खरं; पण तिंच प्रेम त्या कपडयावर किंवा अलंकारावर सर्वस्वी असतं का? नाही; ते बाळावरच असतं. उघडया अंगाने बाळाला न्हावू घातलं, त्याचं अंग टॉवेलनं पुसून काढलं की त्या क्षणी आई प्रेमानं भारावून जाते, अन् त्याला आपल्या मिठीत घेऊन त्याचे पटापट मुके घेते. भक्त आणि भगवंत यांच्यामधील संबंध हा असाच असतो.

भक्तीला उपाधीची आवश्यकता मुळीच नसते. चोखोबा विठ्ठलाच्या महाद्वारापुढे लांब अंतरावर उभं राहून विठ्ठलाचं चिंतन करीत, त्याचा नामघोष करीत. म्हणून विठ्ठलानं त्यांच्या झोपडीत जावून अप्रूपीनं दही-भाकरी स्वीकारली, ती इतक्या

घाईघाईनं की दही त्याच्या पितांबरावर सांडल्याचंही ध्यानी-मनी नव्हतं. गोरोबाकाका हाताने झाडाची एक फांदी धरून पायाने चिखल तुडवीत, इतक्या बेभानपणे की एकदा पायाखाली त्यांचं मूल तुडविलं जावून रक्तबंबाळ झालं तरी त्याची खबरबात त्यांना नव्हती. सारं चित्त-ध्यान विठ्ठलाच्या नामघोषात मग्न झालेलं होतं. बाल नामदेवाच्या आर्त भक्तीपुढे, आग्रही हट्टापुढे हार घेऊन विठ्ठलाला त्यानं आणलेलं दूध स्वीकारावं लागलं.

''नामदेवा हाते स्वये दूध प्याला''

''दळितां कांडितां।
तुज गाईन अनंता।''

अशी संत जनाबाईची भक्ती होती. म्हणून तर....

''झाडलोट करी जनी।
केर भरी चक्रपाणी॥''

अशा किरकोळ कामासाठी विठ्ठलाला तिच्या मदतीला धावून जावं लागलं. एकनाथ महाराजांच्या घरी श्रीखंड्या कावडीने पाणी भरीत होता.

''तुकोबांच्या कीर्तनमेळीं।
नाचे कल्लोळी स्वानंदे।''

विठ्ठल त्यांच्या इतका स्वाधीन झालेला होता. ज्या रामेश्वरशास्त्रींनी तुकोबांना अभंगाच्या वह्या इंद्रायणीमध्ये बुडविण्याची शिक्षा फर्मावली, तेच रामशास्त्री म्हणाले,

''जळीं दगडासहित वह्या।
तारियेल्या जैशा लाह्या।''

हा चमत्कार मान्य करावा लागला. दामाजीपंतांनी दुष्काळात सरकारी गुदामातील धान्य गोरगरीबांना मुक्तहस्ते वाटून टाकले. त्या धान्याची किंमत रोखीने बादशहापुढे मोजून देण्यासाठी विठू महार पुढे आला. बादशहाची दाढी करण्यासाठी संत सेना महाराजांची धोकटी घेऊन विठ्ठल राजवाड्यात दाखल झाला. मीराबाईसाठी श्रीकृष्णाने विषाचा प्याला स्वत:च्या घशात रिता केला. चोखोबांनी वर्णन केलं आहे:

''शिणले वेद चारी।
सारी नेणति निर्धारी॥
तो आपुलिया लाजा।
भक्तांचिया धांवे काजा॥
ज्ञानियाची भिंत ओढीं।
गोरोबाचे मडके घडी॥
माळी सावंत्यास।
खुरपू लागे सावकाश॥''

हे सर्व चमत्काराचे दाखले कदाचित तथाकथित बुद्धिवाद्यांना मान्य नसतील. परंतु अलिकडेच होऊन गेलेले श्री साईबाबांचे चमत्कार-दृष्टांत पुराव्यानिशी सिद्ध होत आले आहेत. पणतीमध्ये पाणी ओतून ज्योती पेटविल्या; कडुनिंबाची पाने गोड झाली वगैरे. श्री गजानन महाराजांनी साध्या काडीने चिलीम पेटविली, कोरड्या विहिरीत जलौघ चालू झाला, बापूना काळे यांना विठ्ठलदर्शन घडविले, बाळकृष्णबुवांना समर्थदर्शन घडविले वगैरे. सर्वसामान्य माणूस भक्तिप्रधानच असतो. तो भक्ती करतो; पण त्याला भगवंताचा साक्षात्कार का होत नाही सर्वत्र? या प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे.

श्रीमद्भगवद्‌गीतेमध्ये भक्तीचे चार प्रकार सांगितले गेले आहेत:

''चतुर्विधा भजन्ते मां
जना: सुकृतिनोऽर्जुन।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी
ज्ञानी च भरतर्षभ।''

ज्ञानदेव विवरण करतात:

''तो पहिला आर्तु म्हणिजे।
दुसरा जिज्ञासु बोलिजे।
तीजा अर्थार्थी जाणिजे।
ज्ञानियां चौथा॥
तेथ आर्तु तो आर्तिचेन व्याजें।
जिज्ञासु तो जाणावेया चि लागि भजे।
तीजेनि तेणें अर्थिजे।
अर्थसिद्धी॥
मग चौथेयाचां ठांइं।
कांहिं चि करणें नाहीं।
म्हणौनि भक्तु येकु पाइं।
ज्ञानिया जो॥''

माणूस कोणत्यातरी संकटात सापडला म्हणजे त्याला देवाची आठवण होते व तो मग देवाची भक्ती करतो. ती भक्ती आर्त भक्ती म्हटली जाते. जिज्ञासू म्हणजे आत्मज्ञानाची इच्छा करणारा जो भक्त, तो ज्ञानाकरिता माझी भक्ती करतो. (आत्मा म्हणजे काय? त्याचा परमात्म्याशी संबंध काय? हे जाणून घेण्यासाठी जिज्ञासेने केलेली भक्ती) तिसरा, त्या अर्थार्थी भक्ताकडून भोगाचे साधन असलेल्या द्रव्यादिकांच्या प्राप्तीची इच्छा केली जाते. चौथा, जो ज्ञानी भक्त, त्याच्याठिकाणी कोणताही स्वार्थ नसतो. ज्ञानी जो असतो तोच खरा भक्त. (तो भगवंताशी एकरूप झालेला असतो. 'अहं ब्रह्मास्मि'चा त्याला अनुभव असतो.) सर्वसाधारणपणे पाहिलं तर असंच दिसून येतं की भक्त आर्त तरी असतो किंवा अर्थार्थी तरी असतो. संकटकाळी ''देवा! देवा!'' म्हणून स्मरण करणाऱ्याची भक्ती तात्कालिक असते. प्रपंच सुखाचा-समृद्धीचा व्हावा, या उद्देशाने केलेली भक्ती ही अर्थार्थी; अर्थात, तात्कालिकच. हरदासी कीर्तनकार एक गोष्ट सांगतात....

एका बाईला मुलगा हवा होता. तिने नवस केला,

''देवा, मला मुलगा होऊ दे! मी तुला सोन्याची कुंची वाहीन.'' (ही भक्ती 'कंडिशनल' स्वरूपाची, देवघेवीच्या व्यापारी पद्धतीची) कर्मधर्मसंयोगाने तिला मुलगा झाला. सोन्याची कुंची बनवायला सोनं थोडं का लागणार? तेव्हा त्या कावेबाज स्त्रीने आपल्या मुलाचे नाव 'सोन्या' ठेवले व त्याची कापडाची कुंची तिने देवाला वाहिली. ही खरी भक्ती नव्हेच. ज्ञानदेव सांगतात:

''येर बहु जोडति किरीटी।
जेयांचीं भजनें भोगासाठीं।
जे आशातिमिरें दीठी।
मंद झाले॥
पैं जो जो जिये जिये देवतांतरीं।
भजावेया चाड धरी।
तेयातें ते चाड पूरी।
पुरविता मीं॥''

ईश्वर करूणानिधी आहे. त्याला आर्त हाक दिली तरी तो संकट दूर करतो. (द्रौपदीने वस्त्रहरणप्रसंगी हाक दिली– देव धावून आला; गजेंद्राला मगरीने पकडले– त्याने धावा केला– देव धावून आला.) देवाबद्दल भेदाभेदाचा विकल्प गृहित धरून देवतांतरांची भक्ती केली, तरी देव तसे तसे फळ देतो. (यजन्ते सात्विका देवान्यक्षरक्षांसि राजस:)

''प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा

जना:॥'' माणूस आपल्या वृत्तीनुसार भक्ती करतो – सात्विक देवाची, राजस अन्यांची, तर तामस प्रेत, भूत वगैरेंची. जिज्ञासू म्हणजे बुद्धिवादी वैज्ञानिकाप्रमाणे 'तत्व' जाणून घेण्यासाठी केलेली भक्ती – इथेच तो थांबतो – गूढ अनाकलनीयच ठरते. (''व्हेअर फिजिक्स एंड्स, मेटाफिजिक्स बिगिन्स'' असं म्हणतात, ते याच अर्थाने.) भजन करायचे ते आपण मोठे गायक आहोत याचे प्रदर्शन करण्यासाठी व अर्थप्राप्तीसाठी. संकटामध्ये निराशा टाळण्यासाठी भक्ती करणे, हेही स्वार्थाचेच दुसरे रूप. कर्मकांडाचा देखावा करण्याने ईश्वराची अनुभूति मुळीच होत नाही. ज्ञानदेव सांगतात:

''पाषाणीं वर्षिलें। भस्मी हवन केले।
कां खेंव दिधलें। साउलिये।''

पाषाणावर खूप पाऊस पडला, उपयोग नाही; राखेमध्ये आहुति दिल्या, उपयोग नाही; सावलीला आलिंगन दिले, उपयोग नाही; असा हा प्रकार आहे. तुकोबाराय तर रागारागाने म्हणतात:

''कीर्तनाचा करी विकरा।
त्याचा बाप म्हणावा दुसरा।''

कीर्तन-भजन यासाठी 'बिदागी' घेणे; वास्तव्यासाठी पंचतारांकित हॉटेलची मागणी करणे, सुग्रास भोजनाची अपेक्षा धरणे, फोटो काढून घेणे – ते नियतकालिकांत छापून येण्याची अपेक्षा बाळगणे, हे सारं खऱ्या भक्तीचं लक्षण नव्हे! भक्तिसंगीताला डझनावारी वाद्यांची साथ घेणे वा मागणे हे दूरदर्शनसाठी – खऱ्या भक्तीसाठी मुळीच नव्हे. जिज्ञासूपणाने तात्विक वादविवादात रमून जाणे हाही एक प्रकार 'अहंकारा'चा.

''तैसा देही अहंकारू नाथिला।
समूळ जेयाचा नासला।
तोचि परमात्मा येवून सांचला।
आधि चि आथि॥''

'अहंकार' निघून गेल्याखेरीज परमात्मा अनुभूत होत नाही. काम, लोभ, आशा हृदयी बाळगून केलेली भक्ती वायाच जाते. भक्ती नि:स्वार्थी, नि:र्लोभी, निरहंकारी असावी लागते. भगवंताशी एकरूप होणं, ही श्रेष्ठ भक्ती-ज्ञानभक्ती.

''जैसा वारा कां गगनीं विरें।
मग वारेयाचे वेगळेपण नुरे।
तेवि भक्तु हे पैज न सरे।
जरि ऐक्या आला॥''

वारा आकाशात विलीन झाला की त्याचे वेगळे अस्तित्व रहातच नाही. त्या भगवंताला सगुण स्वरूपात पाहायचे की निर्गुण स्वरूपात – हा एक वाद बाकी उरतोच. त्यातूनच तंटेबखेडे, मारामाऱ्या, दंगली होत आलेल्या आहेत, हे आजही आपण पाहतो. या संदर्भात आपल्या संतांनी खूप सांगून ठेवलेलं आहे. निवृत्तीनाथ म्हणतात:

''एक देव आहे हा भाव पैं सोपा।
द्वैतरूपी बापा पडसी नरकी॥
दुजेयाची निंदा दुजेपण सदा।
द्वैत तें गोविंद नावडे तया॥''

ज्ञानदेव म्हणतात:

''सगुणी निर्गुण निर्गुणी सगुण।
दोन्ही भिन्नपण नसे मुळी॥''

चोखोबा म्हणतात:

''भेदाभेद कर्म नकळे त्याचे वर्म।
वाऊगाची श्रम वाहतां जगीं॥''

चांगदेव म्हणतात:

''साकार पूजितां निराकार जाले।
शून्यीं बुडालें बाईये वो॥''

जनाबाई म्हणतात:

''वैष्णव तो कबीर चोखामेळा महार।
तिजा तो चांभार रोहिदास॥
सगन कसाई बाया तो कसाब।
वैष्णव तो शुद्ध एकनिष्ठ॥''

तुलसीदास म्हणतात:

''सियाराममय सब जग जग जानी।
करऊँ प्रणाम जोरी जुग पानी॥''

''सबसे रसिये सबसे बसिये सबका
लीजिये नाम।
हाँजी हाँजी करते रहिये बैठिये अपने
ठाम॥''

तुकाराम म्हणतात:

''विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म।
भेदाभेद भ्रम अमंगळ॥''

एकनाथ म्हणतात:

''निर्गुण निराकार।
तोचि जगीं पै ईश्वर॥
अभेदाचे उत्तम गुण।
तेची भक्ति तेची ज्ञान॥''

आणखी किती पुरावे हवेत?

एवढ्याचकरिता ज्ञानदेव 'जाणीव भक्तीचा' (ज्ञानभक्तीचा) पुकारा करतात. तो असा:

''कां द्रवपण चि नीर।
अवकाशू चि अंबर।
गोडी ते चि साकर।
आन नाहिं॥
वन्हि ते चि जाळ।
दळा चि नांव कमळ।
रूंखु ते चि डाहाळ –।
फळादिक॥
आगा हिंवें जें आकर्षिलें।
ते हिमवंतु जेवि जालें।
नाना दूध मुरालें।
दध्याकारें॥
म्हणौनि विश्वपण जावें।
मग मातें घेयावें।
तैसा नव्हें आघवें।
सकट चि मीं॥
ऐसेनि मातें जाणिजे।
तैं जाणीव भक्ति म्हणिजे।
एथ भेदु कांहिं देखिजे।
व्यभिचारू तो॥''

द्रवता आणि जल एकच, पोकळी आणि आकाश एकच, साखर आणि गोडी एकच, अग्नि आणि जाळ एकच, पाकळी आणि कमळ एकच, झाड-फांद्या-फळे एकच, दुधाचे दही, ताक, लोणी, तूप हे प्रकार एकच; म्हणून भगवंताला विश्वाबाहेर मानणे म्हणजे एकप्रकारचा व्यभिचार. विश्वातील प्रत्येक भूतमात्रामध्ये भगवंताला पाहणे, ही खरी श्रेष्ठ ज्ञानभक्ती.

''जें जें भेटे भूत।
तें तें मानिजे भगवंत।
हा भक्तियोग निश्चित।
जाण माझा॥''

भक्त आणि भगवंताचे खरे स्वरूप अशाप्रकारचे आहे. हे एकदा का ध्यानी-मनी-स्वप्नी पूर्णपणे ठसले, की मग 'वादा'चं कारणच उरत नाही. भगवंताला असेच भक्त आवडतात. संतांची चरित्रे अभ्यासिली तर हेच मूलभूत तत्वज्ञान जरूर आढळून येते.

''पार्था गा जगीं।
भक्त तो चि योगी।
उत्कंठा तेयांलागी।
सदा मज॥
तो तीर्थ तो क्षेत्र।
जगीं तो चि पवित्र।
भक्तिकथेशीं मैत्र।
जेयां पुरुषां॥
आम्ही करूं तेयाचें ध्यान।
तो आमुचे देवतार्चन।
तेयांवांचुनि आन।
गोमटे नाहि॥
तेयां आम्हा वेसन्‍।
तो आमुचे निधान।
किंबहुना समाधान।
तो मिळें तों॥''

भगवंताला असे ज्ञानी भक्त खूप आवडतात आणि भक्तांना असा ज्ञानयुक्त भगवंतच आवडतो. एकनाथांनी तहानलेल्या गाढवाला गंगेचे तीर्थ पाजले; भाकरी पळविणाऱ्या कुत्र्याच्या मागे नामदेव तुपाची वाटी घेऊन धावले; श्री साईबाबांनी दसरा साजरा केला अन् मोहरमही, श्री गजानन महाराज मेहताबशहाच्या ताटात एकत्र जेवले इत्यादी घटनांचे नेमके मर्म आणि वर्म जाणून घेतले की भक्तीचे सूत्र स्पष्ट होते. अबू बेन ॲडम हा एक खिस्ती चांभार. लोकांची पादत्राणे शिवून देण्यात त्याचा वेळ जाई; चर्चला जायला त्याला सवड मिळत नसे. एका रात्री त्याला एक देवदूत दिसला. तो ईश्वराची भक्ती करणाऱ्या भक्तांची यादी करीत होता. त्या यादीत अबूचे नाव नव्हते. अबूला वाईट वाटले, आपण चर्चला जात नसल्याबद्दल. दुसऱ्या रात्री दुसरा देवदूत त्याला दिसला. देवाची ज्यांच्यावर भक्ती आहे त्यांची नावे त्याच्या यादीत होती. त्या यादीत अबूचे नाव सर्वप्रथम होते. ही कथा किती अर्थपूर्ण आहे!

''विहित कर्म पांडवा।
आपुला अनन्यु ओळखावा।
हेचि परम सेवा।
सर्वात्मकाची॥''

याचा हाच अर्थ. सर्वांभूतीं ईश्वर मानून त्याची सेवा करणे, मनोभावे, हीच ज्ञानभक्ती, श्रेष्ठ भक्ती! मग मंदिर-मस्जिद-वाद शिल्लक उरतच नाही.

---

शिर्डीचे पाटील रामचंद्र दादा। झाले अति दुखणाईत एकदां। जीवास सोसवती न आपदा। अति तापदायक भोक्तृत्व॥४५॥ उपाय कांहीं बाकी न राहिला। पडेना जंव दुखण्यास आळा। आला जीविताचा कंटाळा। अति कदरले पाटील॥४६॥ होतां ऐसी मनाची स्थिती। एके दिवशीं मध्यरातीं। एकाएकीं बाबांची मूर्ति। त्यांचे उशागती प्रकटली॥४७॥ तंव ते पाटील पाय धरिती। निराश होऊनि बाबांस वदती। कधीं येईल मज मरण निश्चिती। एवढेंच मजप्रती वदा जी॥४८॥ आला आतां जीवाचा वीट। नाहीं मज मरणाचें संकट। मरण कधीं मज देईल भेट। पाहें मी वाट एवढीच॥४९॥ तंव त्या बाबा करुणामूर्ति। म्हणती न करीं चिंता चित्तीं। टळली तुझी गंडांतरभीति। किमर्थ खंती करिसी रे॥५०॥ तुजला नाहीं कांहींच भीती। तुझी हुंडी परतली पुरती। परी न तात्याची धडगती। दिसे मजप्रती रामचंद्रा॥५१॥ शके अठराशें चाळीस। दक्षिणायन आश्विनमास। विजयादशमी शुक्लपक्ष। पावेल अक्षयपद तात्या॥५२॥ परी न बोलावें तयापाशीं। होय घेऊनि बैसेल जीवाशीं। झुरणीस पडेल अहर्निशीं। मरण कोणासी आवडेना॥५३॥ अवघीं दोनच वर्षें उरलीं। तात्याची वेळा जवळी आली। रामचंद्रास काळजी उद्भवली। बाबांची बोली वज्रलेप॥५४॥ तात्यापासोनि गुप्त ठेवली। बाळा शिंप्याचे कानीं घातली। कोणा न कळवावी प्रार्थना केली। चिंता ती लागली उभयांतें॥५५॥ खरेंच रामचंद्र पाटील उठला। त्याचा बिछाना तेथूनि सुटला। दिवस मोजतां मोजतां लोटला। नकळत गेला तो काळ॥५६॥ नवल बाबांचे बोलाचा ताळा। चाळीसाचा भाद्रपद सरला। मास आश्विन डोकावूं लागला। तात्याबा पडला पथारीवर॥५७॥ तिकडे तात्या तापानें आजारी। इकडे बाबांस भरली शिरशिरी। तात्याचा भरंवसा बाबांवरी। बाबांचा श्रीहरि रक्षिता॥५८॥ सुटेना तात्याचा बिछाना। येववेना बाबांचे दर्शना। अनिवार देहाच्या यातना। सोसवेना तयातें॥५९॥ एक तों निजव्यथाव्यथित। बाबांपाशीं लागलें चित्त। नाहीं चालवत ना हालवत। दुखणेंही वाढत गेलें तें॥६०॥ इकडे बाबांचें कण्हणें कुंथणें। दिवसेंदिवस वाढलें द्विगुणें। हां हां म्हणतां तेंही दुखणें। अनावरपणें हटेना॥६१॥ म्हणतां म्हणतां जवळ आला। दिवस बाबांनीं जो भाकित केला। बाळा शिंप्यास घाम सुटला। तैसाच पाटिला रामचंद्रा॥६२॥ म्हणती बाबांचें खरें होतें। ऐसेंच आतां वाटूं लागलें तें। बरवें न कीं हें चिन्ह दिसतें। प्रमाण वाढतेंच दुखण्याचें॥६३॥ झालें आली शुद्ध दशमी। नाडी वाहूं लागली कमी। तात्या पडला मरणसंभ्रमीं। आप्तेष्ट श्रमी जाहले॥६४॥ असो पुढें नवल वर्तलें। तात्यांचेंही गंडांतर टळलें। तात्या राहिले बाबाच गेले। जणुं मोबदले केले कीं॥६५॥ पहा आतां बाबांची वाणी। नांव दिधलें तात्याचें लावुनी। केली तयारी निजप्रयाणीं। वेळा न चुकवुनी अणुभर॥६६॥ नाहीं म्हणावें तरी ही सूचना। देउनी आणिलें भविष्य निदर्शना। गोष्ट घडेपर्यंत ही रचना। दिसली न मना कवणाचे॥६७॥ जन म्हणती तात्यांचें मरण। निजदेहाचा बदला देऊन। बाबाँनीं ऐसें केलें निवारण। तयांचें विंदान त्यां ठावें॥६८॥

—अध्याय ४२, श्री साईसच्चरित

बाबांच्या कृपाप्रसादे भाग्य त्यांचे उदया आले!

शब्दांकन – के. श्री. बी. व्ही. नरसिंह स्वामी, मद्रास
मराठी भाषांतर – श्री. शं. बा. पटवर्धन

# "....पण मी मरू देतो काय त्याला!"

## मुकुंदशास्त्री लेले यांचा प्रत्यक्ष अनुभव

पुणे, दिनांक १७-६-१९३६: १९१२ साली मी बरेच वेळा शिरडीला गेलो होतो. एका वेळी नानासाहेब चांदोरकरांबरोबर टांग्यातून जात असताना घोडे एकदम उधळले व टांगा कोलमडून पडला. मात्र, मला व चांदोरकरांना काहीच दुखापत झाली नाही. यानंतर आठ दिवसांनी आम्ही शिरडीस गेलो, तेव्हा बापूसाहेब जोगांनी सांगितले की आठ दिवसांपूर्वी (ज्यावेळी टांगा कोलमडला त्यावेळी) बाबांनी शंखध्वनी केला व म्हणाले,

"नाना आता मरत होता; पण मी मरू देतो काय त्याला!"

व मला विचारले की,

"हे खरे काय?"

यावर मी "अगदी खरे", असे म्हणालो व ती हकीकत जोगांना सांगितली.

१९१४ साली माझी गरोदर पत्नी बाबांच्या दर्शनास आली असताना बाबांनी मला दोन बर्फीच्या वड्या दिल्या. घरी गेल्यावर ती सुखरूपपणे बाळंत झाली. मला सध्या चार मुले आहेत. मशिदीत बाबांची पूजा चालू असताना मला नारायणोपनिषद (तैतिरीय भाग) म्हणण्यास बाबांनी सांगितले होते. त्याप्रमाणे १० दिवस मी पाठ केला व ते उपनिषद काकासाहेब दीक्षितांना समजावून सांगितले. बाबांनी गीतेतील अपिचेत सुदुराचार... इत्यादी श्लोक माझ्यासमोर म्हणून दाखविले. त्यांना संस्कृत येत होते.

---

# बाबांच्या सर्वाभूती समभावाची खात्री पटली!

## करसेठजी शापुरजी पेस्तनजामास यांचा प्रत्यक्ष अनुभव

मुंबई, दिनांक ७-७-१९३६: मी शिरडीस जाऊन बाबांचे दर्शन घेतले व त्यावेळी ३/४ दिवस तेथे राहिलो. त्या एकाच वेळी काय ते बाबांच्या दर्शनास गेलो. त्यानंतर बाबांचे प्रत्यक्ष दर्शन करण्याचा योग काही आला नाही. त्यावेळच्या माझ्या शिरडीभेटीत माझा मेहुणा व माझी दीक्षितवाड्याच्या ओसरीवर सोय केली होती आणि माझ्या वरिष्ठांची व इतर श्रीमंतांची माडीवर हॉलमध्ये सुरेख व्यवस्था करण्यात आली होती. आम्ही बाबांच्या दर्शनास गेलो तेव्हा आमच्या मनात हीच गोष्ट घोळत होती....

"हा काय या दरबारचा न्याय! श्रीमंतांना सर्व सुखसोयी आणि आम्हा गरीबांकडे कोणाचे लक्ष नाही."

नेमक्या त्याचवेळी बाबा जवळच्या एकास म्हणाले,

"ह्या मंडळींना माडीवर घेऊन जा व तेथे त्यांची सोय करा!"

यावरून बाबांच्या सर्वसाक्षीत्वाची व सर्वाभूती समभावाची आम्हाला खात्री पटली. आम्ही निघालो तेव्हा बाहेर येऊन त्यांनी प्रेमाने हात हलवून आम्हास निरोप दिला.

"ईश्वर तुमचे भले करो," असेच त्यांना म्हणायचे होते.

---

# "पेराल तसे उगवेल!"

## बी. लघाटे यांचा प्रत्यक्ष अनुभव

पुणे, दिनांक २०-६-१९३६ : मी साधारणत: १९१३-१४ साली जेव्हा बाबांकडे गेलो, तेव्हा मोठ्या संकटात सापडलो होतो; आणि त्यातून सुटण्यासाठी मला बाबांच्या आशीर्वादाची अत्यंत आवश्यकता होती. मी त्यांच्याकडे गेल्यावर त्यांनी माझ्याकडे दक्षिणा मागितली. मी ती त्यांना लगेच दिली. मग बाबा म्हणाले,

"कडुलिंबाच्या बिया पेर व झाड आल्यावर ते कापून टाक!"

याचा अर्थ मला अजिबात उमगला नाही; आणि मला हवा होता तो आशीर्वाद हा निश्चितच नाही, म्हणून मी निराश झालो व पुन्हा तिकडे पाऊल टाकले नाही. मी त्यावेळी ३ वर्षे काकासाहेब दीक्षितांबरोबर राहात होतो. (लाच घेतल्याच्या आरोपावरून बी. लघाटे यांना मोठा दंड व तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. पुढे अपीलातही ती कायम झाली. अपील चालू असताना बी. लघाटे बाबांकडे आशीर्वादासाठी आले होते; पण बाबांनी त्यांना आपल्या पद्धतीने कर्म-सिद्धांत– "करावे तसे भरावे"– सांगितला–कडू बी पेरले तर फळही कडूच येते. म्हणून धैर्याने दुष्कर्माचे फळ भोगून ते नाहीसे करणे, हाच मार्ग त्यांच्यासाठी उरला होता.)

# बाबांच्या शिव्या व मार खाणे शेवटी कल्याणप्रदच असे !

## 'कुशाभाऊ' उर्फ कृष्णाजी काशिनाथ जोशी यांचा प्रत्यक्ष अनुभव

अहमदनगर, दिनांक २०-७-१९३६: माझे शिक्षण व्ह. फा. परीक्षा पास होऊन शाळामास्तरची नोकरी मिळण्याइतपतच होते. त्यावेळी मला ७ रु. पगार मिळत असे. त्याबरोबरच ग्रामजोशी असल्याने थोडीफार प्राप्ती होत असे. तरीही घरची परीस्थिती फार गरीब होती. अशा परिस्थितीतही मी भक्तिमार्गाकडे वळलो. याचवेळी मला दत्त महाराज नावाचे एक महान योगी सत्पुरुष भेटले. त्यांच्याकडून मी आसने, प्राणायाम करून कुंडलिनी जागृत करण्याचे तंत्र शिकलो; पण तारुण्याच्या मस्तीत एवढ्यावर संतुष्ट न होता, जारण, मारण, उच्चाटण, वशीकरण इत्यादींचे मंत्र शिकवा, असा गुरुजींकडे हट्ट धरून बसलो. केवळ माझ्या हट्टापायी गुरुजींनी नाईलाजाने जप व साधना करण्यास मला सांगितले. त्याप्रमाणे एक लोखंडी गोल कडे हातात घालून मी ती साधना केली व त्यामुळे ह्या क्षुद्र सिद्धी मला प्राप्त झाल्या. मी केवळ मंत्रोच्चारातून पेढा वगैरे मिठाई उत्पन्न करीत असे व मग ती इतरांना वाटून टाकीत असे. ती मिठाई मी मात्र खाऊ शकत नसे अगर विकू शकत नसे. मी दुसऱ्याने केलेल्या करणीचा परिहार करू शकत असे. पेढे उत्पन्न करणे, हे मी यक्षकिन्नर किंवा जिनच्या साहाय्याने करीत नव्हतो. हा मार्ग फार धोक्याचा आहे. मी बावीस वर्षाचा होतो तेव्हा ह्या सर्व सिद्धी माझ्याकडे होत्या. याचवेळी माझ्या गुरुंनी सर्वसंगपरित्याग करून हिमालयात आयुष्य घालविण्याचे ठरवले व ते मला दिल्लीपर्यंत घेऊन गेले. तेथे माझा शेवटचा निरोप घेताना त्यांनी सांगितले,

''शिरडीला साईबाबा नावाचे माझे वडिलभाऊ राहतात. तू त्यांच्याकडे जा व ते सांगतील तसे कर!'' एवढे बोलून ते गेले ते अद्यापपावेतो त्यांचा काहीच समाचार मला कळला नाही. मग मी १८८८ मध्ये शिरडीस बाबांकडे गेलो; पण मी हातातली लोखंडी पट्टी, तसेच मंत्रशक्तीने पेढे काढणे वगैरे प्रकार बंद करीपर्यंत ते मला मशिदीत वर चढू देईनात. मग मी ते लोखंडी कडे तुकडे तुकडे करून फेकून दिले व मंत्राने पेढे काढणे बंद केले. त्यामुळे उदरनिर्वाहाकरिता शिरडीत भिक्षा मागून राहिलो. बाबांनी मला मशिदीच्या एका कोपऱ्यात बसून दासबोध वाचीत जा, असे सांगितले. रात्री मिळेल त्या जागी मी झोपत असे.

त्यांनी मला किंवा इतरांनाही मंत्रोपदेश दिला नाही. तेव्हा अजून मुंबईचे लोंढे येण्यास सुरुवात झाली नव्हती. फक्त खेडूत लोकच त्यांच्याकडे येऊन आपल्या किरकोळ तक्रारी व आजार त्यांना सांगत असत. त्या सर्वांना बाबा उदी देऊन पाठवीत असत. त्यावेळी ते दक्षिणा मागत नसत; पण एखाद्याकडे ४/५ पैसे मागून सरपण वगैरे आणीत असत. मोठ्या लोकांपैकी नानासाहेब निमोणकर तेवढे त्यावेळी त्यांच्याकडे वरचेवर येत असत. त्यांच्या तोंडून ब्रह्म, माया, विवेक, साधना-चातुष्टय वगैरे शब्द मी कधीच ऐकले नाहीत. आपल्या दैवीसामर्थ्याने ते ईश्वराविषयी निष्ठा उत्पन्न करून, प्रत्येकाला त्याच्या त्याच्या इष्टदेवतेची उपासना करण्यास सांगून त्या त्या इष्टदेवतेचा साक्षात्कारही घडवीत असत. त्यावेळी संपूर्ण तीन वर्षे मी त्यांच्याजवळ राहिलो व नंतरच्या ९ वर्षात वरचेवर त्यांच्या दर्शनास जात होतो. त्यांनी मला तीन डोक्याच्या माणसाकडे जाण्यास सांगितले. याचा अर्थ मी गाणगापूरात जाऊन दत्तसेवा करावी, असा घेतला व दरवर्षी व्यासपौर्णिमा व माघी पौर्णिमेस गाणगापूरला जाऊ लागलो. नंतर बाबांनी मला पाच दिवसांत एक याप्रमाणे गुरुचरित्राची १०८ पारायणे करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी ११ महिने गाणगापूरास राहून ती पूर्ण केली. माझ्या सिद्धी त्यांनी काढून घेतल्या होत्या; पण त्यांनी मला दुसरे वरदान दिले, ते असे:

एका एकादशीच्या दिवशी मी त्यांच्याजवळ बसलो असता त्यांनी विचारले,

''आज काय खाणार?''

मी: काही नाही; कारण आज एकादशी आहे.

बाबा: एकादशीचा अर्थ काय?

मी: एकादशी म्हणजे उपवासाचा दिवस.

बाबा: उपवासाचा अर्थ काय?

मी: उपवास म्हणजे रोजे असतात तसेच.

बाबा: रोजे म्हणजे काय?

मी: कंदमूळाशिवाय काही खायचे नाही.

कंद म्हणजे रताळ्याच्या जातीचे एक फळ व असे फळ उपवासास खाण्याची प्रथा आहे. मग बाबांनी एक कांदा मला खाण्यास दिला (कंद व कांदा या नावातील साम्य लक्षात घेऊन); पण मी त्यांना सांगितले,

''कांदे तुम्ही सेवन केलेत तरच मी खाईन.''

मग बाबांनी काही कांदे खाल्ले व मीही त्यांचे अनुकरण केले. एव्हाना भक्तमंडळीही जमू लागली होती. त्यांच्याकडे वळून बाबा थट्टेने म्हणाले,

''बघा, हा बामन्या एकादशीलाही कांदे खात आहे.''

मी माझ्या कृतीच्या समर्थनासाठी म्हणालो,

''बाबांनी कांदे सेवन केले म्हणून मीही केले.''

त्यावर बाबांनी आपल्या सामर्थ्याची चुणूक दाखविली. ते म्हणाले की त्यांनी कांदे सेवन केलेच नव्हते आणि त्यांनी उलटी केल्याबरोबर रताळी बाहेर पडली.

बाबा म्हणाले,

''बघा, मी कांदे न खाता रताळी खाल्ली होती.''

ही संधी मी बरोबर साधली व ती रताळी प्रसाद मानून तोंडाने उचलून खाऊन टाकली. बाबांनी लगेच मला शिव्या देण्यास सुरुवात करून मारही दिला; पण मला त्याचे काही वाटले नाही; कारण मला माहीत होते की अक्कलकोटच्या स्वामी समर्थांप्रमाणेच बाबांच्या शिव्या व मार खाणे शेवटी कल्याणप्रदच असे. बाबांनी एखाद्याच्या

मस्तकाचे चुंबन घेऊन त्याला पाठविले तर ते अशुभ दर्शवीत असे. बाबाही लगेच शांत झाले आणि माझी त्यांच्यावर व्यक्त झालेली निष्ठा बघून आनंदाने त्यांनी आपला हात माझ्या मस्तकावर ठेवला व आशीर्वाद दिला.

ते म्हणाले,

''तू यापुढे माझे स्मरण करून हाताची ओंजळ पुढे करशील तेव्हा माझी प्रसादरूपी उदी तुला मिळत जाईल.''

(यावेळी कुशाभाऊंनी आपले हात पुढे करून, डोळे मिटून बाबांचे स्मरण केले आणि लगेच म्हणाले,

''ही उदी घ्या!''

असे म्हटल्यावर त्यांनी पुढे केलेल्या ओंजळीतून उदीची धार पडू लागली. ती मी (नरसिंह स्वामी) व अवस्थी यांनी कागदात घेतली.)

ही उदी मी भक्तमंडळींना देतो व त्या उदीने कष्ट निवारण होतात. करणी, पिशाचबाधा यांचा परिहार करण्याची मंत्रशक्ती मात्र मी वापरतो.

कारण ते लोककल्याणाचे काम आहे. गेल्या महिन्यातच राजमाचीकरांच्या नातवाच्या अंगावर व कपड्यांवर बिब्याच्या फुल्या येत होत्या. हा एक करणीचा प्रकार आहे. मला त्यांनी बोलावून घेतले. मी त्यांच्या घरी दत्तपूजा, आरती आणि मंत्रपठण केले. त्यामुळे फुल्या उमटण्याचा प्रकार कायमचा बंद झाला. मी बाबांजवळ ३ वर्षे राहिल्यानंतर माझे वडील आले व मला घेऊन गेले. निघताना बाबा म्हणाले,

''पुन्हा येशील तेव्हा दोघे मिळून या!''

त्यानंतर काही महिन्यांनी मी वडिलांना घेऊन शिरडीस बाबांच्या दर्शनास गेलो. तेव्हा बाबा मला म्हणाले,

''दोघे मिळून या, म्हणजे तू लग्न कर आणि बायकोला बरोबर घेऊन ये!''

गावी परत गेल्यावर माझे लग्न झाले तरी मला शिरडीची इतकी ओढ लागली होती की पुन्हा शिरडीस येऊन बरेच दिवस राहिलो. मग मला नेण्यास माझी पत्नी शिरडीस आली व तिच्याबरोबर मी गावी गेलो.

मला आता मुले व नातवंडे आहेत. असाच एकदा शिरडीस आलो असताना बाबा म्हणाले,

''तू माझ्या दर्शनासाठी इतक्या लांबून येण्याची दगदग का सोसतोस? मी तुझ्या गावीपण आहे.'' असे म्हणून त्यांनी आमच्या गावाबाहेरील एका विशिष्ट जागेचे वर्णन करून ते माझे घर आहे, असे सांगितले. मी जाऊन पाहिले तो तेथे निवडुंग दाट वाढला होता व मध्यावर एक समाधी होती. मी ती जागा विकत घेऊन निवडुंग साफ केला व त्या समाधीचे पूजन करू लागलो. तेथे बाबा मला दर्शन देतात. तेव्हापासून मी फक्त रामनवमीला शिरडीस जातो. मला उदी मिळण्याची जी सिद्धी मिळाली आहे, ती मी कोणासही देऊ शकतो; पण ती ज्याला मिळवायची असेल त्याने ६ महिने व्रतस्थ राहून कडक तपश्चर्या केली पाहिजे. मिरजगावला जे सत्पुरुष प्रगट होतात त्यांचे नाव फकीरशहा आहे. ज्या जागेत त्यांची समाधी आहे, ती त्यांना इनाम मिळाली होती. त्यांना कोणी वारसदार वा शिष्यगण नव्हते. ही जमीन सध्या माझ्या मालकीची आहे. हे सत्पुरुष साईबाबांपेक्षा निराळे आहेत. त्यांचे फक्त दर्शन आम्हास होते. सध्या चातुर्मास असल्याने त्यांचा फक्त आवाज ऐकू येतो; पण ते प्रगट होत नाहीत. पेढे उत्पन्न करण्याची क्रिया, म्हणजे पेढ्यांचे स्थलांतर होते. उदी मात्र बाबांचे स्मरण करताच मिळते. फकीरशहा आध्यात्मिक प्रगतीबद्दल काही सांगत नाहीत. फक्त श्रद्धा उत्पन्न व्हावी, या हेतूने ते प्रगट होतात. साईबाबा सध्या दुसरा देह धारण करून आहेत का नाही, याबद्दल ते काही खुलासा करीत नाहीत. फक्त ते व बाबा एकाच पंथाचे आहेत, एवढेच सांगतात.

---

# ''साईबाबा व मी निराळे नाही!''

## विनायक दाजी भावे यांचा विलक्षण अनुभव

कोल्हापूर, दिनांक १०-६-१९३६ : १९३२ साली मी द.म. ९० रु. पगारावर कारकून म्हणून काम करीत होतो. मला योग्य गुरू पाहिजे होता व त्यासाठी मी १३-४-१९३२ पासून एक महिनाभर गुरुगीता वाचत होतो; पण त्या मुदतीत कोणी गुरु भेटला नाही; म्हणून एका गुरुवारी मी दत्तमंदिरात गेलो. तेथे गेल्यावर दत्तमूर्तीऐवजी मला एक चौकोनी समाधी दिसू लागली. दुसऱ्या दिवशी एका मित्राकडे गेलो, तो तिथे अण्णासाहेब दाभोलकरकृत 'श्री साईसच्चरित' हा ग्रंथ सहज उघडून पाहिला, तो त्यात बाबांच्या समाधीचा दिलेला फोटो दिसला, तो पाहून मी चमकलो; कारण त्याच समाधीचे दत्तमंदिरात मला दर्शन झाले होते. यामुळे साईबाबा हेच माझे गुरू आहेत, असे मी समजलो. मग उदी घेतली आणि त्यांच्याविषयीची काही पुस्तके वाचली; पण समाधी गुरु कशी होऊ शकेल, असा संभ्रम झाल्याने पुन्हा गुरुगीता-पारायणास सुरुवात केली. आठ दिवसांनी केडगांवचे नारायण महाराज स्वप्नात आले. या स्वप्नदृष्टांतामुळे तेच माझे गुरु आहेत, असे समजून मी केडगांवला गेलो. तेथे रात्री स्वप्न पडले व स्वप्नात नारायण महाराज येऊन म्हणाले,

''साईबाबा व मी निराळे नाही. तू शिरडीस का जात नाहीस?''

यावर मी म्हणालो,

''तेथे मार्गदर्शन करण्यास कोणी नाही.''

त्यानंतर काही दिवसांनी मी शिरडीस गेलो व बाबांनाच गुरु मानू लागलो. एका साधूने माझा हात बघून सांगितले की साईबाबा हेच माझे गुरु आहेत.

१९३३ साली माझ्या मुलास प्लेग झाला होता; पण बाबांच्या उदीने तो वाचला.

माझ्या बहिणीने एका तथाकथित महाराजांना १०० रु. व एक चांदीचा पेला दिला होता. काय तर म्हणे त्या महाराजांनी तिला रामाचे दर्शन घडवून देतो, असे वचन दिले होते; पण दर्शन काही घडले नाही. मग तिने असा नवस केला की त्या महाराजांनी १०० रु. व चांदीचा पेला परत केला, तर तो ती साईबाबांच्या शिरडी संस्थानला अर्पण करील. त्या वस्तू परत मिळाल्यावर तिने शिरडीस जाऊन नवस फेडला.

तसे मला बाबांचे नाव १९१६ पासून माहीत होते. माझी आई अन्नपूर्णाबाई बाबांच्या दर्शनास गेली असता बाबांनी तिला मशिदीत येऊ दिले नाही.

''मशिद विटाळू नको'', असे बाबा म्हणाले.

ती येवल्यास परत गेल्यावर तिची सून (माझ्या भावाची पत्नी) आदल्या दिवशीच निधन पावल्याचे पत्र येऊन पडले होते; आणि बाबांना हे माहीत असल्यामुळे तिला त्यांनी मशिदीत येऊ दिले नव्हते. माझ्या आईचे निधन झाल्यावर दहाव्या दिवशी पिंड तयार केले; पण कावळा अजिबात पिंडास शिवेना. मग माझी बहीण म्हणाली की कावळा पिंडास शिवला, तर ती ५० रु. साईबाबांच्या शिरडीस पाठवील. हा संकल्प सोडल्यावर ताबडतोब कावळा पिंडास शिवला.

## श्री साईबाबांच्या जीवनकथा

— चकोर आजगांवकर

(मागील अंकात पृष्ठ क्र. ४९ वर 'श्री साईबाबांच्या जीवनकथा' या सदरातील काही भाग अनवधानाने प्रसिद्ध करायचा राहून गेला आहे. पृष्ठ क्र. ४९ वर तिसऱ्या कॉलममध्ये

....देवतांत भरून दशांगुळे वर उरला आहे.

या ओळीनंतर येणारा व

बाबा: अरे गणू, खोटी निष्ठा दाखवू....

या ओळीच्या अगोदर संपणारा 'तो' भाग आम्ही येथे प्रथम प्रसिद्ध करीत आहोत. वाचकांच्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत.)

**साठे:** बाबा, मी गुरुदत्तांचा भक्त! तुम्ही मला गुरुचरित्रसेवा शिकविलीत. मला गुरुचरित्र वाचण्याचा आपण आदेश देऊन माझी उपासना स्थिर केली. नाहीतर मी उपजिल्हाधिकारी व जमाबंदी अधिकारी म्हणून सरकारी दप्तरातच अडकून पडलो असतो.

**बाबा:** मेघा, तुझ्या साठेसाहेबांचे व माझे ऋणानुबंध जुने आहेत. त्यांना मी गुरुचरित्राचा अर्थ काही वर्षांनी स्वत: सांगणार आहे. गुरुचे मौन हे व्याख्यान आहे, हे त्याला कळत नाही. म्हणूनच मला त्याच्यासाठी भाष्य आणि प्रवचन करावे लागेल.

**शामा:** बाबा, तुम्ही साठ्यांना तुमची गुरु समजून पूजा करावयास परवानगी द्या! मेघा जशी शिव म्हणून आपली पाद्यपूजा करतो, तशी साहेबांना गुरु समजून पूजा करू द्यात.

**बाबा:** मेघाचा भाव अगदी भोळा आहे. त्याला जसे करायचे तसे मी करू देतो, साहेबाला त्याची जरूर नाही. ते जाणते व शिकलेले आहेत.

**साठे:** बाबा, तुम्ही म्हणता तसे गुरुराजही विश्वात विश्वात्मक असले तरी माणसाला ते तत्त्व समजत नाही. आपल्यासारख्या गुरुरूप महात्म्याचे चरण पूजिल्यावाचून गुरुभक्ताला समाधान वाटत नाही.

**बाबा:** भाऊ, तुझी भावना योग्य आहे. योग्य वेळी मी तुला गुरुपूजा करावयाची अनुज्ञा देईन, परंतु तो काळ अद्याप दूर आहे. आजपासून बरोबर एक हजार दिवसांनी तू या मशिदीतील या फकिराच्या गादीची आणि या धुनीसमोरील खांबाची पूजा करशील. गुरु ही एक व्यक्ती नाही, ती शक्ती आहे. ते ब्रह्म या स्तंभातून मी तुला प्राप्त करून देईन.

**शामा:** बाबा, सध्या ते वाडा बांधून भक्तांची सेवा करण्याचा संकल्प मनात धरून आहेत, तो पूर्ण व्हावा.

**बाबा:** साहेब, तू यथाशक्ती सेवाकार्य कर! तुझी वास्तू ही गुरुसेवेचे प्रतीक होईल. गुरुपादुकांच्या सान्निध्याचा योग येईल. माझे गुरु रोशनशहा यांच्या स्थानामुळे तुझा वाडा गुरुमंदिर बनेल.

**साठे:** सच्चिदानंद सद्गुरु, तुमची अशीच कृपा या कागदीसाहेबावर राहो!

**मेघा:** बाबा, मी तुम्हाला देहस्नान घालतो. (कलशभर पाणी ओतावयास लागतो.)

**बाबा:** अरे, शिरावर पाणी घाल! शीर्ष हेच शरीराचे कैलास! तुझा कैलासपति शंकर या शिर्षातील गुरुमंडळात, म्हणजे कैलासवर्तुळात रहातो. तेथेच त्याच्या सूर्यचंद्राकार पादुका आहेत.

**मेघा, साठे, केळकर, शामा:** चमत्कार, चमत्कार! मेघा, तुझ्या पाण्याने साईबाबा भिजलेले नाहीत. केवळ त्यांचे डोके तेवढे ओले झाले आहे.

**केळकर:** बाबा, काय ही लीला! (सारे नतमस्तक होतात.)

(१९०४-१९०५ चा हा प्रसंग आहे. त्यानंतर साठेवाड्याची निर्मिती, मेघाच्या उत्तम भक्तिसाधनेचा उत्कर्ष, शिरडीतील गुरुपूजा इत्यादी घटना १९०६ ते १९०८ च्या दरम्यान घडल्या. हे कालमापन तंतोतंत वा अचूक मानता येत नसले, तरी ते वास्तवतेच्या जवळपासचेच आहे. यापूर्वीच्या काळातील साईभक्त म्हणजे श्री. दामूशेठ रासने व पुरंदरे. हे दोघेही बाबांना प्राणप्रिय होते. रासने हे चांदोरकरपूर्वकाळातच साईभक्तीत रुजू झाले होते. त्यांना बाबांच्या कृपेने पुत्रसंतती झाली. शिरडीच्या रामनवमी उत्सवात रासन्यांचे निशाण मंदिरावर नियमितपणे झळकते. पुरंदरे हे दासगणूंच्या प्रभावी कीर्तनाने १९०३ नंतर आकृष्ट झाले व आपल्या उत्कट भक्तीने साईभक्त मंडळीत स्थिरावले.)

### आसक्ती देवाची – संसाराला निर्लेपपणे तोंड द्या!

वर्ष: १९०५) (स्थळ: शिरडीतील रस्त्यावर गणू गीत गात आहेत. नाना, शामा, म्हाळसापती व अब्दुल ऐकतानतेने ऐकत आहेत.)

**बाबा:** शामा, म्हाळसा आणि अब्दुल, तो गणू काय बरे गात आहे?

**गणू:** (प्रवेश करतात.) बाबा, मी आपले नामसंकीर्तन करीत आहे! नाम हीच आमची धनदौलत. संकीर्तनाच्या खजिन्यात आम्ही ती ठेवतो आणि श्रद्धा, प्रेम व सबुरीचा प्रसादरूप संदेश सर्वांना वाटतो.

**''शिरडी माझे पंढरपूर।**
**साईबाबा रमावर''** (गातात.)

**बाबा:** हे तू काय बरे सांगत आहेस?

**गणू:** बाबा, हा आपला महिमा आहे. आपण विष्णूचे, त्या विठोबाचेच अवतार आहात. ही शिरडी म्हणजे दुसरे पंढरपूरच, हे मी गात गात जगाला सांगतो आहे.

**बाबा:** हा नाना, खरोखर पंढरपूराहूनच आला आहे. नाना, तू पंढरपूरची ती प्रेमरूप चंद्रभागा पाहिली आहेस का? विठोबाच्या पायापाशी आलेली ती राधाकृष्णा आहे. गणू, तुला त्या प्रेमधारेचा, राधेचा भक्तीचा उत्कट वहाता भाव समजला आहे काय? अरे, मी केवळ कवीच्या काव्यमय शब्दांनी मोहून जाणारा नाही. मी हृदयातील श्रद्धाभक्तीची खोली मोजत असतो. त्या शिवरात्रीच्या दिवशी जेव्हा साक्षात् गंगामाई माझ्या पदांगुष्टातून प्रगट झाली, त्यावेळी